म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
स. क्र. ७६९

REFBK-0027477

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
वा. क्र. ७६९
२८४८८
३आ०५

संदर्भ
भू-प्रवास
७६९
२८४८८
१३।८।८९

भारतामधील तीर्थक्षेत्रे, पुष्प १

# हिमालयातील चारी धाम यात्रा

यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बदरीनाथ
या चारी धामांच्या यात्रेचे वर्णन
(हरिद्वार व ऋषिकेश यात्रा वर्णनासह)

लेखक
डॉ. शांताराम गजानन महाजन
(निवृत्त) ग्रंथपाल आणि प्राध्यापक,
जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ

REFBK-0027477

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४
१९९४

प्रकाशिका
सौ. सविता सु जोशी
उत्कर्ष प्रकाशन
रेणुका अपार्टमेंट
पुणे ४११००४

मुद्रक
सदाशिव म. जंगम
जंगम कलामुद्रण
१९६ पाषाण
पुणे ४११००८

© शां ग. महाजन

कव्हर डिझाइन रवि मुकुल

टाइपसेटिंग
इफेक्ट्स
२३, आयडिअल कॉलनी
कोथरूड, पुणे ४११०२९

ISBN

प्रथमावृत्ती . २६ जानेवारी १९९४

मूल्य ७५ रुपये

मुख्य नोंद
महाजन, शांताराम गजानन, १९३२
हिमालयातील चारी धाम यात्रा.
पहिली आवृत्ती पुणे : उत्कर्ष प्रकाशन, १९९४
पृ १३६ रंगीत चित्रे ८ पृ १ नकाशा.
भारतामधील तीर्थक्षेत्रे, पुष्प १
यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बदरीनाथ या चारी धामांच्या यात्रेचे वर्णन. हरिद्वार व ऋषिकेश यात्रा वर्णनासह

Cataloguing-in-publication data
Mahajan, Shantaram Gajanan, 1932-
Himalayatil chari dham yatra
First Edition Pune Utkarsha Prakashan, 1994
136 p 8 p col pl, 1 map,
Bharatamadhil tirthakshetre, Pushpa 1
Subject Headings Travel India Himalaya,
Yamunotri, Gangotri, Kedarnath, Badrinath,
Rishikesh, Haridwara.

# यात्रेकरूचे मनोगत

नगाधिराज हिमालय हजारो वर्षांपासून भारतीयांना आकर्षित करीत आहे. कारण तो देवभूमी आहे. तपोभूमी आहे. त्यामध्ये अनेक पवित्र तीर्थे आहेत. भारतीयाना जीवनदान देणाऱ्या पवित्र नद्यांचा उगम येथेच आहे. कांचनमय हिमशिखरे आणि निसर्गाची विविध रूपे तेथे पाहावयास मिळतात. हे वैभव पाहण्याचे भाग्य मला या वर्षी मे १९९३ मध्ये लाभले

यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बदरीनाथ या उत्तरखंडातील चारी धामाची यात्रा आम्ही पती पत्नींनी इतर यात्रेकरूसह पुरी केली. त्याशिवाय हरिद्वार आणि ऋषिकेश ही तीर्थक्षेत्रे पाहिली. या यात्रेचा वृत्तान्त वाचकांना खचितच आवडेल अशी आशा आहे यात्रावृत्तान्ताबरोबर तीर्थक्षेत्राचा इतिहास, माहात्म्य, सांस्कृतिक महत्त्व आणि प्रेक्षणीय स्थळे याची माहिती दिली आहे.

यात्रेचे निमित्ताने चिंतन झाले. ते महत्त्वाचे. तीर्थयात्रा म्हणजे काय, त्याचा उद्देश काय, यात्रा आणि पिकनिक यामधील फरक सांगून यात्रेचे फल काय याविषयी विचार मांडले आहेत हे विचार हजारो भारतीयापर्यंत पोचावे हा ग्रंथलेखनामागे आणखी एक उद्देश आहे

गुरुनाथ ट्रॅव्हेल्स या पुणे येथील यात्रा कंपनीतर्फे मी प्रवास केला त्याचे संचालक श्रीराम वैद्य आणि मार्गदर्शक अशोक जोशी यानी मोलाची माहिती दिली याबद्दल त्यांचा आभारी आहे. नवोदित छायाचित्रकार पद्मजा विजय करमरकर यानी बदरीनाथचा फोटो मुखपृष्ठावर छापण्यासाठी आनंदाने दिला याबद्दल अत्यंत आभारी आहे. यात्रावर्णनात तीर्थस्थानांची/गावाची उंची मीटर/फूटात दिली आहे. त्यामध्ये फरक असण्याचा संभव आहे उंचीचा अंदाज यावा हा प्रमुख हेतू आहे हे जाणून घ्यावे. वाचकांनी आपले अभिप्राय जरूर कळवावेत पुढील आवृत्तीमध्ये त्यामध्ये सुधारणा करता येतील.

विजयादशमी<br>२४ ऑक्टोबर १९९३.

शां. ग महाजन

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| यात्रेकरूचे मनोगत | ३ |
| अनुक्रमणिका | ५-६ |
| स्थल-व्यक्ती-नाम संदर्भ | ७ |
| लेखक परिचय | ८ |
| प्रकरण | |
| १ : चला यात्रेला | ९-१५ |
| २ : यमुना मैया की जय | १६-३७ |
| ३ : गंगा मैया की जय | ३७-६२ |
| ४ : केदारनाथ महाराज की जय | ६२-८९ |
| ५ : बदरीविशाल की जय | ९०-१०४ |
| ६ : ऋषिकेश व हरिद्वार दर्शन | १०४-११४ |
| ७ : यात्रेचा संदेश | ११५-१२२ |

# परिशिष्टे

१. संयुक्त रोटेशन यातायात व्यवस्था समिती, ऋषिकेश.
किराया तालिका

२. चारी धाम यात्रा वेळापत्रक/कार्यक्रम.

३. चावला ट्रॅव्हल्स, ऋषिकेश. टॅक्सी-वेळापत्रक.

४. गढवाल मंडल विकास निगम, ऋषिकेश-यात्रा पॅकेज टूर्स.

५. चारी धाम यात्रेला आलेला खर्च.

६ प्रवासात लागलेली औषधे.

७ प्रवासात दिसलेल्या पाट्या.

८. निवडक यात्रा कपन्यांचे पत्ते

९. निवडक ग्रंथ, लेख, संदर्भग्रंथ.
नकाशा - चारी धाम यात्रेमधील ठिकाणे दर्शविणारा नकाशा.
(पृ. १३२-१३३)

# स्थल/व्यक्ती नाम संदर्भ

(टीप - नावापुढे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.)

अलकनंदा ९८ आरती : गगा ५७ शकर ८९ बदरीनाथ ९९ उखी मठ ७१,१०४ उत्तर काशी ३९,६४ उडन खटोला ११३ ऋषिकेश १५,१०४ कणखल १०८ कमलेश्वरजी ४४ कर्णप्रयाग १०२ काली कमलीवाले १०५ काशी विश्वनाथ ६७,७२ केदारनाथ ६२,८२,८७,९९ केम्टी फॉल २३ खरसाली १०३ गणपती मंदीर ५६ गणेश, मुंडकटा ७६ गंगा ५८ गंगा की आरती १८ गगावतरण ६० गंगा नहानी ३९ गंगोत्री ४४ गुप्त काशी ६९ गौमुख ३८ गौरीकुंड ७७,८६ चार धाम ९ जडगंगा ४१ जयपूर मंदीर ६६ जानकी चट्टी ३४ जोशी मठ ९२,१०४ टिहरी ३९ डेहराडून २० तप्त कुंड ३२,३९,७७,९४ त्रियुगीनारायण ७३ दक्ष प्रजापती १०८ देवप्रयाग ५९ द्रोणाचार्य ७२ धरासू ३८ नर पर्वत ९५ नारायण पर्वत ९५ नीलकंठ पर्वत १०१ नीलकंठ महादेव १०५ नदप्रयाग १०२ पचकेदार ८७ पंचप्रयाग १०२ पारद शिवलिंग १११ पावनधाम १११ पार्वती ७६,८६, पाडव ७२,८७ पांडुकेश्वर १०१ पीपलकोटि ९२ प्रयाग ५९ फूलचट्टी ३० बडकोट २४,३८ बदरीनाथ ९३ मंदीर ९६ भगीरथ ४५ भगीरथ शीला ५४ भागीरथी ५४ भिलंगना ३८ भैरवघाटी ४२,५८ मंदाकिनी ७१ मन्सादेवी ११३ मसुरी २१ मुनी-की-रेती १५ मुखवा १०४ मुंडकटा गणेश ७६ यम ३५ यमुना नदी ३५ यमुना ब्रीज २३ यमुनोत्री ३०,३२ रामपूर ७३,८८ रामबाडा ७८ रुद्रप्रयाग ६८ रुद्राक्ष ११० लक्ष्मणझूला १०७ विष्णु ९४ शनी ३६ शंकर ७२ शंकराचार्य ८५,९५,९७ सगर ६० सती १०८ सीतापूर ७६ सोनप्रयाग ७६ श्रीनगर (गढवाल) ६७,१०३ हनुमान चट्टी (यमुनोत्री) २६ बदरीनाथ १०१ हनुमान मंदीर ९७ हरद्वार हरिद्वार १७,१०८ हरि की पैरी १७

# लेखक परिचय

**डॉ शांताराम गजानन महाजन (१९३२)**

**एम्.ए. पीएच्डी. मास्टर ऑफ लायब्ररी सायन्स**

ग्रथालय क्षेत्रामध्ये ४३ वर्षे स्पृहणीय कार्य. पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालयामधील ग्रंथपाल आणि प्राध्यापक तसेच ग्रथालय आणि माहितीशास्त्र विभाग प्रमुख म्हणून निवृत्त ग्रथालय आणि माहितीशास्त्र विषयक अनेक ग्रथ, लेख, निबध, लेखन. समेलने, परिषदा, कार्यशाळा यामध्ये भाग

ब्रिटिश कौन्सिलचे वतीने १९८८ साली इंग्लड आणि वेल्समधील ग्रथालयाचा अभ्यास दौरा पूर्ण पॅरिस येथील इंटरनॅशनल कॉंग्रेस ऑन आर्किव्हज मध्ये पुणे शहराच्या इतिहासाची साधने यावर निबध वाचन. त्यानतर स्थानीय इतिहास यावर लेखन पुणे शहराच्या इतिहासाची साधने: बृहत्सूची हा सशोधन प्रकल्प विद्यापीठ अनुदान मडळाचे साहाय्याने चालू. पुणे शहरातील ग्रथालयात सगणकाचा वापर व ग्रथालयाचे नेटवर्किंग या भारत सरकारने मान्य केलेल्या प्रकल्पाचे सचालक म्हणून कार्यरत.

महाराष्ट्रातील ग्रथालय चळवळीत सक्रिय भाग. हिस्टरी ऑफ दि पब्लिक लायब्ररी मूव्हमेंट इन महाराष्ट्र १८०५-१९२१ हा प्रबध प्रकाशित पुणे व मुबई विद्यापीठाचे बहिशाल शिक्षण मडळाचे व्याख्याते म्हणून मान्यता. सन १९९२ मध्ये इएॅटलिस या ग्रथालयशास्त्र शिक्षक सघटनेतर्फे बेस्ट टीचर अॅवॉर्ड प्राप्त.

**प्रकाशने** : १) महाराष्ट्रातील ग्रथालयाची सूची, २) महाराष्ट्रातील ग्रथपाल, ग्रथालयसेवक व ग्रथालयीन कार्यकर्ते याची सूची, ३) ग्रथालयीन तालिकीकरण · प्रात्यक्षिक, २ खड ४) तालिकीकरण प्रात्यक्षिक. ५) तालिकीकरण तात्विक, ६) द्विबिंदु वर्गीकरण, ७) वर्गीकरण: तात्त्विक, ८) ग्रथालयातील सदर्भसेवा - २ भाग, ९) मराठी दोलामुद्रिताची तालिका, १०) हिमालयातील चारी धाम यात्रा.

पत्ता: डॉ शा ग महाजन
सरस्वती विहार, २७ स्वस्तिश्री सोसायटी,
गणेशनगर, महाराष्ट्र बँकेमागे, अलकार पोलीस चौकीजवळ
पुणे ४११०५२

प्रचार ७८९ ग्रं. क्र. २८७७८ ३१०७८ शाखा (स्थल)

प्रकरण १

# चला यात्रेला

उन्हाळ्याची वा दिवाळीची सुटी सुरु झाली की अनेकजण सुटीमध्ये सहलीची योजना आखतात सहल, प्रवास यामुळे आपला देश पाहता येतो. तेथील शहरे, नद्या, विविध गावे, त्यामधील मंदीरे, प्रेक्षणीय व ऐतिहासिक वास्तू व स्थळे पाहून त्यामागचा इतिहास, परंपरा, समाजातील चालीरीती समजतात आणि निसर्ग सौंदर्य - विविध प्रकारचे - झाडे, पक्षी, प्राणी, नद्या, धबधबे, तळी, सरोवरे, थंड हवेची ठिकाणे, तेथील सूर्योदय आणि सूर्यास्त पाहता येते. या वर्षीच्या १९९३ मे महिन्यामध्ये आम्ही (मी व पत्नी) इतर यात्रेकरूंसह एक अनोखी यात्रा केली. ती म्हणजे यमुनोत्री, गगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ या चार धामाची आणि हरिद्वार, ऋषिकेश या पुण्यक्षेत्रांची, देवभूमीमध्ये जाऊन यात्रा केली. आयुष्यामध्ये किमान एकदा तरी ही चारी धाम यात्रा करावी असे म्हटले आहे. आम्ही यात्रा करून पावन झालो. त्या यात्रेचा वृत्तांत वाचकाना निश्चितच आवडेल.

**भारतामधील चार धाम**

भारतामध्ये चार मोठे पवित्र धाम आहेत

धाम म्हणजे तीर्थक्षेत्र, पवित्र क्षेत्र, पुण्य क्षेत्र.

भारताचे पूर्व दिशेस जगन्नाथपुरी मधील जगन्नाथ, पश्चिमेला द्वारका येथील रणछोड, दक्षिणेकडील, रामेश्वर आणि उत्तरेकडील हिमालयातील श्री बद्रीनाथ हे मोठे चार धाम आहेत याशिवाय सात पुरी पवित्र मानल्या आहेत अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार) काशी, कांची,

अवंतिका (उज्जैन). या तीर्थांची यात्रा केली म्हणजे भारत वर्षाची यात्रा होते. आपला भारत देश केवढा मोठा विस्तीर्ण आहे. त्याची परंपरा, संस्कृती, इतिहास केवढा स्फूर्तिदायक आहे हे कळते आणि या चारी दिशामध्ये राहणारा भारतीय समाज, त्यांचा धर्म, भाषा, पोशाख, चालीरीती त्याच्यातील मानवता आणि एकात्मता या प्रवासात प्रत्ययाला येते

**उत्तराखंडातील चार धाम**

या चार धामाशिवाय उत्तर प्रदेश राज्यामध्ये गढवाल भागामध्ये हिमालय पर्वतांच्या रांगामध्ये चार धाम आहेत ते म्हणजे यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ अथवा केदार, आणि बद्रीनाथ (बदरीनाथ). ही सर्वांत पवित्र स्थाने मानली जातात. त्यांचा उल्लेख आपल्या धर्मग्रंथांमध्ये, पुराणात वारंवार आढळतो. प्रत्येक हिंदू माणसाला आयुष्यातून एकदा तरी या ठिकाणी भेट देण्याची आतरिक इच्छा असते. म्हणून अनेक जण ही चार धाम यात्रा सर्व शक्ती पणाला लावून, भक्तीभावाने, अचल निष्ठेने करीत असतात. यातील यमुनोत्री आणि गंगोत्री ह्या आपल्या पवित्र नद्यांची उगमस्थाने आहेत. त्याना लोकमाता म्हणतात. गगोत्रीला उगमाच्या ठिकाणी भागीरथी म्हणतात. आणि केदार हे शिवाचे अथवा शकराचे वसतीस्थान मानले जाते ते मंदाकिनी नदीच्या काठावर वसले आहे आणि बद्रीनाथ भगवान विष्णुचे स्थान आहे. ते अलकनंदा नदीच्या तीरावर वसले आहे ह्या मधील भागीरथी, मंदाकिनी आणि अलकनंदा या नद्याचा संगम जेथे होतो तेथपासून गंगा नदी सुरू होते या गंगा नदीचे स्थान भारतीयांच्या जीवनात फार मोठे आहे गगा नदी हळू हळू पठारावर येते ती ७०० किलोमीटर वाहल्यानंतर गंगा आणि यमुना यांचा सगम प्रयाग अथवा अलाहाबाद येथे होतो.

ही चार क्षेत्रे जवळ जवळ एका रांगेमध्ये आहेत पश्चिमेकडे यमुनोत्री, नंतर गगोत्री, नतर केदारनाथ आणि शेवटी बदरीनाथ. त्यामधील नकाशाचे अतर फक्त १० किलोमीटर आहे म्हणजे यमुनोत्रीपासून गंगोत्री १० किलोमीटर आहे. गंगोत्रीपासून केदारनाथ १० किलोमिटर आहे. आणि केदारनाथ पासून बदरीनाथ १० किलोमीटर आहे. परंतु प्रत्यक्ष आपणाला

शेकडो किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. अथवा चालावे लागते. याचे कारण म्हणजे या प्रत्येक स्थानामध्ये अडथळे आहेत. घनदाट अरण्ये, बर्फाच्छादित पर्वतांच्या रांगा, अनेक चढउतार आणि छोट्या मोठ्या नद्यांचे प्रवाह खळखळत असतात हे सर्व ओलाडून आपणाला ही स्थाने पाहावी लागतात. हरद्वार हे पहिले मुक्कामाचे ठिकाण. येथून चारी धाम यात्रा सुरू होते. हरद्वारपासून निघून यात्रा पूर्ण करून परत हरद्वारला येण्यासाठी अंदाजे १५०० किलोमीटर प्रवास करावा लागतो यामधील ६० किलोमीटर प्रवास हा पायी वा घोड्यावरून वा दडी, कंडी या वाहनाद्वारा करावा लागतो. याशिवाय गंगोत्रीपासून गोमुख या पर्यंतचा प्रवास ४५ किलोमीटर पायी खडतर प्रवास आहे. अनेकजण हा करत नाहीत. बघाना म्हणले तर जवळ परंतु प्रत्यक्षात मात्र दूर किंवा अगम्यच होत. यमुनोत्रीला जाण्यासाठी पायी जावे लागते. गंगोत्रीला आता बस जाते. परंतु गंगोत्रीपासून आणखी पुढे गौमुख म्हणून स्थान आहे. तेथे खरा गंगेचा अथवा भागीरथीचा उगम होतो तो प्रवाह पायी वा घोड्यावरून परतु खडतर आहे केदारनाथला शेवटी पायी प्रवास करावा लागतो. बदरीनाथला शेवटपर्यंत बस जाते.

हा पायी प्रवास अनेक यात्रेकरू भक्तीभावाने अनेक आपत्ती सहन करून पुरा करतात. आणि प्रवास पुरा करून भगवंताचे, त्या जगन्नियंत्याचे दर्शन झाले की कृतकृत्य होतात. समाधान वाटते. परिपूर्णता वाटते आणि केलेला प्रवास, त्यामध्ये सोसलेल्या अडचणींचे सार्थक झाले असे भाव चेहऱ्यावर दिसतात. दर्शन करून परत जाताना सर्व जण यमुना मैया/ माता की जय, गंगा मैया। माता की जय, जय केदारनाथ, जय बदरीनाथ अशा घोषणा करीत सर्व यात्रेकरूंचे स्वागत करतात शुभेच्छा देतात. यामुळे यात्रेकरूंना उत्साह वाटतो चालण्यासाठी मन:शक्ती देते आनद देते.

हरिद्वार हे २९३ मीटर उचीवर आहे समुद्रसपाटीपासूनची ही उंची आहे. तेथून निघून यमुनोत्रीला पोचण्यासाठी ३२२३ मीटर उच जावे लागते तेथून धरासू या गावापर्यंत १०३६ मीटर खाली यावे लागते. नतर परत वर चढून ३१४० मीटर उंचीवर गगोत्री आहे. तेथून परत

खाली यावे लागते ५७९ मीटर उंचीवर श्रीनगर (गढवाल प्रदेश) येथे यावे लागते. तेथून परत केदार येथे जाण्यासाठी ३५८३ मीटर उंचीवर जावे लागते केदार पासून परत खाली यावे लागते. रुद्रप्रयाग येथे ६१० किलोमीटर उंचीवर येऊन परत वर चढावे लागते. बदरीनाथ ३११० मीटर उंचीवर आहे. तेथून परत खाली येऊन हरद्वारला येतो. काहीजण प्रथम ऋषिकेश व नतर हरद्वारला येतात ऋषिकेशहून हरिद्वार २६ किलोमीटर खाली आहे. या प्रवासामध्ये अनेक उच सखल भाग आहेत. चढण उतार सारखा असतो. हा चढ वा उतार अनेक ठिकाणी फार तीव्र असतो अनेक वळणे नागमोडी स्वरुपाची असतात. याप्रमाणे हा सव चढ पुरा केला तर आपण माऊंट एव्हरेस्ट च्या अधिक उची पूर्ण करत असतो किंवा कैलास पर्वतावर जाण्यासाठी जेवढा चढ चढावा लागतो त्याच्या दुप्पट चढण आपण पूर्ण करीत असतो. म्हणून आपण मनाने कैलासपती आपल्या मन.चक्षुपुढे आणावा त्याची मनोमन प्रार्थना करावी आणि चारी धाम यात्रा प्रवासाचे नियोजन करावे कोणत्याही चांगल्या कारणासाठी परमेश्वराचे अधिष्ठान लागते. या पर्वतराजींचा स्वामी, कैलासपती शिवशंकर पार्वतीचे ध्यान करावे. शिव पार्वतीचा मुलगा गजानन याचे स्मरणपूजन करावे. आपली यात्रा निश्चित पूर्ण होईल हा विश्वास बाळगावा

**यात्रेची तयारी**

या यात्रेमध्ये कोणती ठिकाणे आहेत. त्यांचे एकमेकांपासून अतर काय आहे. त्यासाठी भाडे काय लागते प्रवासात औषधे कोणती घ्यावीत त्याचप्रमाणे हा प्रवास कार्यक्रम कसा आखावा याचे वेळापत्रकही दिले आहे पॅकेज टूर्स कोणते आहेत आणि खर्च किती येईल याची माहिती पण दिली आहे त्यानुसार नोकरी करणाऱ्यांनी हक्काची रजा आधी मंजूर करून घ्यावी या सर्व माहितीसाठी नकाशा पाहावा व परिशिष्टे १ ते ५ पाहावीत.

परंतु सध्या स्वतंत्रपणे स्वत: नियोजन करण्यापेक्षा यात्रा कंपन्यामार्फत प्रवास करण्याकडे अनेकांचा कल आहे. यात्रा कपन्यांकडे पैसे भरले म्हणजे प्रवासातील रिझर्वेशन, निवासस्थान, चहा, जेवण, सामानाची

चढउतार याची व्यवस्था त्या करीत असल्यामुळे आपली काळजी कमी होते. अर्थात एक तोटा असतो तो म्हणजे आपल्या मनाप्रमाणे आपणाला सर्व ठिकाणे पाहता येत नाहीत त्यांनी निवडलेली ठिकाणेच पाहावी लागतात परतु हा मार्ग व्यवहार्य ठरतो

**यात्रा कंपनीची निवड**

यात्रा कंपन्याच्या जाहिराती वर्तमानपत्रात येत असतात त्यांचेकडून माहितीपत्रके मागवावीत. त्यातून आपल्या सोयीची वेळ निवडावी यात्रा कंपनीविषयी माहिती मिळवावी अनुभव किती, खात्रीलायकपणा किती याविषयी तसेच त्या कंपनीमार्फत ज्यांनी प्रवास केला, अनुभव घेतला त्यांचेकडून माहिती मिळवावी. हा अनुभव मोलाचा ठरतो. खात्री करून यात्रा कपनीची निवड करावी. मग पैसे भरावेत. ज्याना प्रवासासाठी ऑफिसमधून पैसे मिळतात, त्यानी यात्रा कपनीस लीव्ह फेअर कन्सेशन सर्टिफिकेट देण्यास मान्यता आहे का पाहावे. सेंट्रल गव्हर्नमेंटचे सेवकांना दोन महिने आधी बुकिंग केल्यास रेल्वे, विमानांची स्वतंत्र तिकीटे त्या देतात सहलीच्या एकूण रकमेपैकी ५०% रक्कम ग्राह्य धरली जाते. यात्रेआधी कॉलरा, टायफॉइड इत्यादींची प्रतिबंधक इंजेक्शने घ्यावीत. पुणे येथील विश्रामबागवाड्यामध्ये हे केंद्र आहे तेथे मोफत लस टोचतात. त्यांचा दाखला घ्यावा आपल्या बरोबर प्रवासात तो ठेवावा पैसे किती लागतील त्याचा अंदाज करून ते पण घ्यावेत.

**यात्रा क्रम**

IMP परपरेप्रमाणे दक्षिण भारतामधील रामेश्वराला भेट देऊन रामनामस्वामींचे आशीर्वादाने यात्रा सुरू करावी. तेथून सेतूमधील वाळू घ्यावी ती नतर गगामाईच्या सगमामध्ये सोडून द्यावी. गंगाजल आणावे आणि त्याने रामेश्वराला परत अभिषेक करावा. यामुळे यात्रेची समाप्ती होते.

परतु उत्तर भारतामधील लोक यात बदल करतात. ते प्रथम गगाजल आणतात म्हणजेच ते यमुनोत्री, गंगोत्री, केदार, बद्रीनाथ यात्रा करतात. हे गगाजळ रामेश्वराला नेऊन अभिषेक करतात रामेश्वराची वाळू घेऊन परत गंगेला अर्पण करतात. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे रामेश्वराची यात्रा केल्याशिवाय ही गंगायात्रा पूर्ण होत नाही. म्हणून चार धाम

यात्रा केल्यावर दक्षिण भारताची यात्रा करून गंगाजळ अर्पण करावे. काहीजण रामेश्वराची वाळू काशीला प्रयागच्या संगमामध्ये सोडतात. काहीजण परत हरद्वारला येऊन ती वाळू सोडतात ही चार क्षेत्रे एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात उघडतात व ती दिवाळीचे सुमारास बंद होतात. त्यानंतर तेथे ५/६ महिने बर्फ पडते. काहींचे मते या ठिकाणांना भेट देण्याचा उत्तम काळ म्हणजे ऑक्टोंबर-नोव्हेंबर पाऊस थांबल्यावर जावे. निसर्गसौंदर्य मनमोहक असते खूप झाडे फुले पाहावयास मिळतात. त्यावेळी भेट द्यावी म्हातारपण झाल्यावर ही यात्रा करण्यापेक्षा तरूणपणी ज्यावेळी हात पाय चांगले चालतात. त्यावेळी पायी यात्रा करावी पायी चालून निसर्ग सौंदर्य पाहणे यासारखी भाग्याची गोष्ट नाही.

उत्तराखंडातील चारी धामाचा क्रम सांगण्यासाठी मी एक युक्ती वापरतो. आपला डावा हात पालथा करावा. त्याची बोटे पाहावीत. प्रथम करंगळी. ती यमुनोत्री दुसरे बोट गंगोत्री. तिसरे बोट केदारनाथ चवथे बोट बदरीनाथ. अंगठ्याकडचा भाग म्हणजे व्हॅली ऑफ फ्लॉवर्स, हेमकुंड, जिम कार्बेट पार्क इत्यादी ठिकाणे दर्शविते. ह्यामुळे सर्व सामान्यांना हा क्रम समजतो. याचेमधील चढउतार ही बोटे दर्शवितात

या यात्रेची सुरूवात हरिद्वार येथे होते हरिद्वार येथे जाण्यासाठी प्रथम दिल्ली येथे जावयाचे येथून बस करून हरिद्वार येथे जावयाचे. दिल्ली ते हरिद्वार हे बसने अंतर २२२ किलोमीटर आहे रेल्वेने डेहराडून पर्यंत जाता येते त्याआधी हरिद्वार येथे उतरून यात्रा सुरू करता येते. काहीजण ही यात्रा ऋषिकेश पासून करतात. हरिद्वारपासून ऋषिकेश २६ किलोमीटर आहे. ऋषिकेशचा बस अड्डा डेपो महत्त्वाचा. खासगी प्रवासी कंपन्या पण यात्रा आयोजन करतात ह्या टॅक्सी पण पुरवतात. त्याचा दर खालीलप्रमाणे होता. टॅक्सीचा फायदा हा की प्रवास लवकर होतो आपल्याला पाहिजे तेथे थांबता येते. यात्रा कंपनीचे लोक सर्व ठिकाणे दाखवीत नाहीत म्हणून आपल्याला विशिष्ट ठिकाण पाहायचे असेल अथवा विशिष्ट ठिकाणी जास्त वेळ थांबावयाचे असल्यास थांबता येते. परंतु टॅक्सीला बस पेक्षा जास्त पैसे लागतात चावला ट्रॅव्हेल्स,

घाट रोड ऋषिकेश पिन २४६२०१ याचे दर खालीलप्रमाणे होते

चारी धाम यात्रा - एक गाडी, ५ माणसे, प्रत्येकी रु. ६८००/-

बद्रीकेदार यात्रा - एक गाडी, ५ माणसे प्रत्येकी रु. ३८००/-

त्यांचा कार्यक्रम परिशिष्ठ ३ मध्ये दिला आहे

ऋषिकेश येथे संयुक्त रोटेशन यातायात व्यवस्था समिती (चन्द्रभागा, ऋषिकेश) या नावाची सघटना आहे. या व्यवस्थापनाचे अंतर्गत अंदाजे १००० बसेस प्रवासासाठी उपलब्ध असतात त्यांचे दर परिशिष्ठ १ मध्ये दिले आहेत. या संघटनेतर्फे हरिद्वार (ऋषिकुल) येथ पासूनही बसेस मिळतात. याचा बस स्टँड मोठा आहे. तेथे विविध कौंटर आहेत त्या कौंटरवर तिकिटे विकत घ्यावयाची आणि दुसरे दिवशी सकाळी जसे प्रवासी येतात तसतशा बसेस भरतात आणि प्रवास सुरू होतो. बस भरण्यासाठी किमान २० प्रवासी लागतात टॅक्सीसाठी ४ माणसे लागतात.

याशिवाय गढवाल मंडळ विकास लिमिटेड या उत्तर प्रदेश सरकारने चालवलेल्या सस्थेमार्फत बस आणि टॅक्सीने पॅकेज टूर्स आयोजित केले जातात. हे टूर्स दिल्ली आणि ऋषिकेशपासून आयोजित करण्यात येतात. त्याचे वेळापत्रक आणि दरपत्रक परिशिष्ठ ४ मध्ये दिले आहे त्यामध्ये प्रवास, निवास, बेडिंग आणि मार्गदर्शन याचा समावेश आहे. जेवण, नाश्ता, चहा व घोडे, डोलीवाले याचा खर्च ज्याचा त्याने करावयाचा.

पत्ता Asstt General Manager (Tourism) Yatra office, Gadhwal Mandal Vikas Nigam, Muni-Ki- Reti, RISHIKESH Phone number 30372, 30357. General Manager (Tourism), Gadhwal Mandal Vikas Nigam, 74/1 Rajpur Road, DEHRADUN Uttar Pradesh Tel 26817, 24408

या पत्त्यावरून माहितीपत्रक एप्रिलचे शेवटच्या आठवड्यात मागवावे आवश्यक त्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट GARHWAL MANDAL VIKAS NIGAM Ltd या नावे ऋषिकेश येथे पाठवावा.

तर चला आपण यात्रेला निघू या

प्रकरण २

# यमुना मैया की जय

पुणे रेल्वे स्टेशनवर सर्व यात्रेकरू प्रवासी सामान सुमान घेऊन जमले होते. राखीव जागावर सामान चढवण्यात आले निरोप द्यायला अनेक नातेवाईक आले होते. आणि झेलमच्या गार्डने हिरवा झेंडा दाखवला. गाडी सुरू झाली यात्रेला सुरूवात झाली. पूर्वी यात्रेसाठी स्वतत्र डबे मिळायचे. पण आता ही पद्धत बद केली आहे. म्हणून रल्वेचे आरक्षण ४५ दिवस आधी करावे लागते त्याप्रमाणे यात्रा कंपनीने आरक्षणे केली होती. त्यामुळे प्रवासात इतर यात्रेकरूंची सोबत होती. दिल्लीपर्यंतच्या प्रवासात यात्रेकरूंची ओळख एकमेकाना थोडी फार झाली दुसरे दिवशी रात्री ९। वाजता दिल्ली स्टेशन आले. यात्रेकरू उतरले दिवसभराचे मे महिन्यातील प्रवासाने अंग आखडले होते. परतु तशीच पुढे झेप घेऊन आम्ही दिल्ली ते हरद्वार हा प्रवास स्वतंत्र बसने केला आणि पहाटे ४ वाजता हरद्वार येथील कणखल भागातील सद्चिदानद आश्रमाचे दरवाजापुढे बस थाबली काही यात्रेकरू झोपेत होते ते जागे झाले वीज गेली होती म्हणून टॉर्च काढून आम्हाला दिलेल्या खोल्यामध्ये शरीर लोटून दिले फॅमिलीला स्वतत्र खोली होती. थोडी फार विश्राती घेतली चहा आला नंतर नाश्ताही झाला आणि आम्ही हरद्वार येथील गगेत स्नान करण्यासाठी निघालो बरोबर कपडे, टॉवेल, कॅमेरा आणि इतर सामान शबनम बॅगेत घेतले होते. कणवटीला थोडे पैसे हवेत. हरद्वारला पहिला कार्यक्रम म्हणजे गंगास्नान. गंगामैयाचा आशीर्वाद घेऊन यात्रेचा शुभारभ होतो.

### हरिद्वार / हरद्वार

हरिद्वार हे दोन प्रकाराने संबोधले जाते. हरिद्वार आणि हरद्वार. हरि म्हणजे विष्णु. हरिद्वार म्हणजे श्री विष्णूचे दर्शन घेण्यासाठी जावयाचे प्रवेश द्वार बद्रीनाथ येथे श्री विष्णूचे वसती स्थान आहे तेथे जाण्याचा मार्ग येथे सुरू होतो. दुसरे नाव हरद्वार हर म्हणजे श्री शिवशंकर केदारनाथ हे श्री शिवशंकर पार्वती यांचे स्थान थोडक्यात हरि आणि हर या देवताचे दर्शन घेण्यासाठी जाण्याचे प्रवेशद्वार म्हणजे हरि/हर द्वार याला मायापुरी पण म्हणतात. गंगाद्वार ही म्हणतात कारण येथे गंगामैया पठारावर वाहायला लागली आहे. हे एक पुण्यक्षेत्र आहे

अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवन्तिका।
पुरी द्वारावती चैव, सप्तैता मोक्षदायिका॥

गरुडपुराणामध्ये भारतामधील सात मोक्षदायक तीर्थांचा उल्लेख केला आहे. त्यामधील मायापुरी म्हणजे हरिद्वार. हे एक तीर्थक्षेत्र आहे मायापुरी हा हरिद्वारचा एक भाग आहे

हरिद्वार येथील गंगेच्या प्रवाहात पितराच्या अस्थींचे विसर्जन केले असता पितराचा उद्धार होतो, त्यांना मोक्ष मिळतो अशी श्रद्धा आहे म्हणून हरिद्वारला मोक्षधाम असेही म्हणतात. मोक्ष देणारी - मोक्षदायिका - पुरी हरिद्वार आहे

### हरि की पायरी

हरिद्वार येथील सर्वात महत्त्वाचे स्थान म्हणजे गंगेच्या प्रवाहावर वसलेले हरि की पायरी हे स्थान. हरिद्वार येथे गंगा मैयाचा एक कालवा जरा बाजूला घेतला आहे. तो सथ आहे. अन्यथा मूळ प्रवाहाला फार जोर आहे. या प्रवाहामध्ये यात्रेकरूंना गंगा स्नान करणे सोपे जाते त्यासाठी घाट बांधले आहेत. त्याला पायऱ्या आहेत पाण्याची खोली पण कमी आहे. परंतु पाणी प्रवाही आहे. ठराविक अंतरावर साखळदंडही बांधले आहेत यदाकदाचित एखादा यात्रेकरू वाहत गेला तर त्याला येथे अडवले जाते हरि की पायरीला इतिहास आहे. येथे श्री विष्णूने पाय ठेवला होता म्हणून हरि की पायरी म्हणतात. दुसरे म्हणजे ज्यावेळी देव दानवामध्ये युद्ध झाले आणि

समुद्रमथनातून अमृत निघाले. अमृताचा कलश घेऊन देव धावत होते. त्यातील अमृत बारा ठिकाणी साडले. त्यातील आठ स्थाने स्वर्गात आहेत. चार स्थाने मात्र पृथ्वीवर भारतामध्ये आहेत. एक क्षिप्रा नदीकाठी वसलेले उज्जैन अथवा अवन्ती नगरी, दुसरे नाशिक येथील गोदावरी तिसरे हरिद्वार व चवथे प्रयागराज, उत्तर प्रदेश मधील प्रयागराज (अलाहाबाद) येथे दर बारा वर्षांनी कुभ मेळा भरतो. त्यामुळे येथे लाखो यात्रेकरू या पर्वणीमध्ये गगास्नान करण्यासाठी येतात.

हरि की पायरी परिसरात अनेक मदीरे आहेत. त्यातील गंगाजींची मदीरे प्रसिद्ध. गंगा मदीराचे दर्शन घेऊन यात्रेकरू पुढे जातात. इतरही मदीरे आहेत.

पडे लोक अथवा भटजी मंत्र सांगतात. नतर गंगास्नान केले जाते आपल्या पितरांचे पण स्मरण करतात. त्याना मोक्ष मिळावा ही प्रार्थना असते आपणाला आणि कुटुबियाना दीर्घ आयु, सतती, आरोग्य, धनधान्य, संपत्ती मिळो, भरभराट होवो, बालबच्चे सुखी राहोत आणि मनातील कामना आणि संकल्प पुरे होवो हा आशीर्वाद मिळतो.

येथे यात्रेकरूंचे सोयीसाठी अनेक खाण्यापिण्याची दुकाने आहेत. तसेच गंगाजळ नेण्यासाठी कलशही विकत मिळतात. रुद्राक्षाच्या माळा, गगा, हरिद्वार विषयीची पुस्तके - विविध वस्तू येथे विकत मिळतात. शिखांचा लंगर अथवा मोफत अन्नदान चालू असते

हरिद्वार परिसराचा विकास करण्यासाठी एक समिती आहे ते यात्रेकरूकडून पैसे गोळा करतात गंगास्नान करून आम्ही मुक्कामाचे ठिकाणी आलो. भोजन केले. विश्राती घेतली आणि परत चार वाजता गंगेच्या परिसरात जाण्यासाठी निघालो दोन हेतू होते. सूर्यास्ताचे वेळची गगेची आरती पाहणे आणि त्याआधी हिमालयातील प्रवासासाठी लागणारे साहित्य विकत घेणे

**गंगा की आरती**

हरिद्वार येथील सध्याकाळचे प्रमुख आकर्षण म्हणजे गगामैयाची पूजा/आरती. अनेक मोठ मोठे दिवे पेटवले जातात. त्याच्या साक्षीने गगा मदीरातील गगाजींची आरती होते. घंटानाद होतो. यावेळी यात्रेकरू

हजारो दिवे द्रोणात घालून नदीत सोडतात. हे दृश्य मनोहर असते. आपल्या वंशाचा दिवा आणि आपले कुटुंबीय याचा जीवन दीप या जीवन प्रवाहात विविध लाटांना तोंड देत सुखरूप प्रवास करो ही भावना या दीपदानामध्ये असावी

गंगेची आरती झाल्यावर यात्रेकरू तृप्त होतात. मनाने आणि डोळ्याने या तृप्ततेचा ढेकर देत यात्रेकरूच्या गाड्या मुक्कामाकडे अथवा पुढच्या प्रवासास निघतात परततांना गर्दी होऊ नये म्हणून पूल बांधले आहेत.

त्याआधी चारी धाम यात्रेच्या प्रवासाला लागणारे आवश्यक साहित्य यात्रेकरूंनी विकत घेतले. थडीसाठी हातमोजे, पायमोजे, कानटोपी, पावसासाठी बरसाती म्हणजे प्लॅस्टिकचे कापड - इरल्यासारखे. डोक्यावर घेण्यासाठी तसेच वळकटी बाधण्यासाठी (१० ते १५ रु प्रत्येकी), खाण्यासाठी मनुका, बेदाणे, बिस्किटे, चेहऱ्याला आणि ओठाला लावण्याचे क्रीम थंडीत ओठ फुटतात म्हणून ओठाला लावण्यासाठी आणि थंडीसाठी चेहऱ्याला लावायचे क्रीम कारण चेहरा तांबडा पडतो. त्यासाठी ही क्रीम्स असतात शिवाय औषधे विकत घेतली. हरिकी पेरीचे बाजूला ही अनेक दुकाने आहेत यमुनोत्री आणि केदारनाथ येथील एक दिवसाच्या प्रवासासाठी छोटी चेनची एअर बॅग ही घेतली.

दुसरे दिवशी खरी चारी धामाची यात्रा सुरू झाली. या यात्रेसाठी स्वतंत्र बस ठरविण्यात आली होती. त्यात ४० सीटस् होत्या, ३२ यात्रेकरू, मॅनेजर, यात्रा कपनीची ४ माणसे अधिक क्लीनर व ड्रायव्हर. एका बाजूला दोन सीट्स आणि दुसऱ्या बाजूला ३ सीटस् सर्वात पुढे १ सीट मॅनेजर साठी १ सीट ड्रायव्हरची

मोटारीपुढे नारळ फोडण्यात आला. पुष्प माला घालून तिची जोडप्याने पूजा केली आणि मनात प्रार्थना केली आमची यात्रा मगलमय होवो सुखद होवो आम्हाला सुखरूप परत आण. वाहन चालक गढवाली होता त्याला गंध लावले नारळाचा प्रसाद दिला. सर्वजण गाडीत बसले

यात्रेकरूंनी जयजयकार केला.

पुंडलीक वरदा हारि विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम

पढरीनाथमहाराज की जय
अवधूत महाराज की जय.
अवधूत चितन श्री गुरूदेव दत्त.
श्री यमुना मैया की जय
श्री गगा मैया की जय.
केदारनाथ महाराज की जय
बदरी विशाल की जय
सब संतोंकी जय
आणि शेवटी
भारत माता की जय।

गाडी सुरू झाली. हरद्वार सोडल्यावर ऋषिकेश मार्गावर विविध आश्रमाच्या पाट्या लागल्या. अनेक साधू सन्यासींनी येथे विस्तीर्ण आश्रम स्थापन केले आहेत हे आश्रम पाहत पाहत आम्ही ऋषिकेशला पोचलो

ऋषिकेश येथील भगवान आश्रमामध्ये आम्ही मुक्काम केला. या आश्रमामध्ये राहण्याची, आघोळीची झोपण्याची व्यवस्था करतात पाणी भरपूर होते. स्वच्छता गृहे स्वच्छ(?) होती. दोन मोठे चौक होते त्याला प्रशस्त व्हरांडे होते. त्याला जोडून विविध खोल्या होत्या. त्यामध्ये कॉट, बेड ही व्यवस्था होती. काही ठिकाणी अटॅच्ड संडास बाथरूम गीझरसह होत्या त्याचे दर वेगवेगळे होते. या आश्रमामध्ये नाश्ता केला. ऋषिकेशला यात्रेकरूंची यादी दोन प्रतीमध्ये सादर करावी लागते विशिष्ठ फॉर्ममध्ये प्रवास मार्ग, बसचा परवाना, ड्रायव्हरचे लायसेन्स, यात्रा कपनी याचेविषयी माहिती भरावी लागते. आणि प्रवास परवाना मिळवावा लागतो तो मिळण्यास दीड तास वेळ लागला नंतर प्रवास सुरू झाला.

ऋषिकेशहून यमुनोत्रीला आम्ही डेहराडून-मसुरी यमुना ब्रिज - नैनबाग, दामटा, मरोड, नैनगाव (नौगाव) बडकोट या मार्गाने गेलो. प्रथम डेहराडून हे थंड हवेचे ठिकाण लागते येथे सैनिकी अधिकाऱ्यांना शिक्षण देतात. त्यांची मिलिटरी अकॅडेमी येथे आहे. फॉरेस्ट रीसर्च

इन्स्टिट्यूट ही महत्त्वाची सशोधन सस्था येथे आहे लाकडांचे स्लीपर्स (रेल्वेसाठी) मोठ्या प्रमाणात दिसले येथे उत्तम प्रकारचा बासमती तादूळ मिळतो. डेहराडून एक्स्प्रेस येथून निघून दिल्लीमार्गे मुंबईला पोचते या रेल्वेमार्गावर हरद्वार स्टेशनही लागते. डेहराडूनचे खोऱ्याला डून व्हॅली असे म्हणतात हिरवीगार वनश्री, जाखरंड्याची झाडे भरपूर त्यावर व्हायोलेट रगाची टपोरेदार फुले सर्वत्र दिसतात. येथे चढ सुरू झाला. काही वेळा डेहराडून-मसुरी मार्ग बद असतो म्हणून इथे एक फलक आहे. 'डेहराडून-मसुरी मार्ग खुला आहे'. तो पाहून आम्ही पुढे सटकलो. नंतर मिलिटरी चेक पोस्ट लागते आणखी पुढे गेल्यावर प्रकाशेश्वर महादेवाचे मदीर आहे. सव्वा अकरा वाजता आणखी चढ सुरू झाला. आणि वळणे वळणे घेत आणखी एका तासाने मसुरी येथे पोहोचलो.

**मसुरी (उंची २००५ मीटर)**

मसुरी हे थड हवेचे ठिकाण आहे. आपल्या कडच्या महाबळेश्वर सारखे. हे उंच पर्वतावर वसले आहे येथे निसर्गरम्य ठिकाणे खूप आहेत म्हणून ते प्रवाशाचे माहेरघर बनले आहे

मसुरीचे डोंगराचा आकार कॅमल बॅक, उटाच्या पाठीसारखा आहे या सर्व भागाला पायी चालत वळसा घालून आजूबाजूने पर्वत, डोंगर, त्यावरील वनश्री पाहणे खरच आनंददायक वाटते. याशिवाय येथून हिमालयातील पर्वतांची हिमशिखरे दिसतात या पर्वतावर दाट झाडी आहे. बांबू व देवदाराच्या वृक्षराजी आहेत. पाण्याचे प्रवाह ठिकठिकाणी उसळत असतात ६४ चौरस किलोमीटर विस्ताराचा हा प्रदेश आहे. रात्रीचे वेळी येथून डून व्हॅलीचे दृश्य मजेदार दिसते.

**रोपवे आणि गन हिल पॉइंट**

येथील प्रवाशांचे आकर्षण म्हणजे रोप वे अथवा उडन खटोला यासाठी डबे आहेत ते मोठ्या आकाराचे आहेत तीन बाजूला बसायला बाके असतात डब्याला काचेच्या खिडक्या असतात एका वेळी ८/१० प्रवासी डब्यामध्ये घेतात. हरद्वार येथील मन्सादेवी येथील डब्यात मात्र ४ माणसे घेतात या रोप वे वरून डोंगराचे शिखरावर जाता येते. तेथून मसुरी आणि आजूबाजूच्या प्रदेशाचे दृश्य विहंगम होते मसुरीकडे

येताना वळणावळणाचे रस्ते आहेत ते येथून छान दिसतात डोंगरावर उतरल्यावर आपणाला निरनिराळ्या पोषाखांची दुकाने दिसतात. गढवाली, राजस्थानी, नागा, पहाडी प्रदेशाचे अनेक पोषाख मोठ्या माणसाचे, बायकाचे, मुलींचे असतात ते पोषाख घालून फोटो काढणे हा मजेदार कार्यक्रम चालतो. बुद्धे बुद्धीही ही हौस भागवतात. आम्ही पण फोटो काढले फोटोसाठी निम्मी रक्कम अनामत म्हणून द्यायची. डेव्हलप्ड फोटो व्ही. पी ने पाठवतात बाकीच्या रकमेची व्ही. पी सोडवून घ्यायची.

रोपवे वरून ज्या उंच शिखरावर जातो त्याला गन हिल पॉइंट असे म्हणतात. गावातील प्रमुख रस्ता माल रस्ता या रस्त्यापासून १ किलोमीटर पायी हा पॉइट आहे रोपवे ने गेल्यास ४०० मीटर आहे. तेथे जाण्यास पाच मिनिटे लागतात जाऊन येऊन तिकीट १० रुपये होते. याला गन हिल पॉइंट का म्हणतात याचा इतिहास आहे. ब्रिटिश अमदानीमध्ये १९ व्या शतकात येथे दुपारी बारा वाजता वेळ कळण्यासाठी बदूक उडवीत असत त्यानुसार लोक आपली घड्याळे लावीत. सन १९१९ नंतर ही प्रथा बंद पडली. रात्रीचे वेळी येथून डून व्हॉलीचे दृश्य मजेदार दिसते

**मार्केट**

रोप वे वरून खाली आल्यावर आपणाला मसुरीमधला मुख्य रस्ता 'माल' लागतो. येथे विविध प्रकारची दुकाने आहेत एम्पोरियम आहेत. येथे विविध प्रकारच्या वस्तू, कपडे, खेळणी विकत मिळतात विशेषत: ऊनी, लोकरीचे कपडे स्वस्त व छान मिळतात. आम्ही ३५ रुपयाला एक शाल विकत घेतली तीच शाल हरद्वार येथे ६० रुपयाला व श्रीनगर (गढवाल) येथे ५० रुपयाला होती. येथे माणसाने ओढण्याच्या गाड्या आहेत तांगे आहेत हॉटेल्स डोंगर उतारावर आहेत त्यामुळे तेथे जाण्यायेण्यास चढउतार करावी लागते. प्रवाशाना उपयुक्त पुस्तके, कानटाप्या, रनकोट, टोप्या, हातमोजे, पायमोजे, दुर्बिणी अशा अनेक वस्तू स्वस्तात मिळतात

### केम्टी फॉल

दुपारी जेवण करून आम्ही मसुरी सोडले. तेथून १३ किलोमीटरवर केम्टी फॉल हा मनोहर पाण्याचा धबधबा आहे. रस्त्याच्या वरचे बाजूला त्याची धार बारीक आहे परंतु रस्त्याचे खालचे बाजूला धबधबा अनेक धारांनी वाहतो. तेथे थोडे पाणी पण साठवले आहे. रस्ता ओलांडून ६०/७० पायऱ्या उतरून या पाण्यात पाय बुडविण्याचा मोह सर्वांना होतो तेथे चहा कॉफी तसेच थंड पेयांची दुकाने पण आहेत. तेथील गावाचे नाव केम्टी आहे म्हणून केम्टी फॉल हे नाव दिले आहे.

### यमुना ब्रिज

आता यमुनोत्रीकडे जाण्याचा मार्ग सुरू होतो माणसांची वस्ती नाही वाहने फक्त प्रवाशाची उन्हे उतरू लागली होती आणि आमची मोटर मसुरीच्या उंच ठिकाणावरून खाली खाली येत होती. वळणे धारेदार. मोटरचे ब्रेक वरचेवर लागत होते. काही वेळा श्वास रोखून गाडी वळणावर खाली कशी जाते हे पाहावे लागे.

काही किलोमीटर गेल्यावर सायंकाळी साडेपाच वाजता यमुनेचा पूल लागला. पूल ओलाडून गाडी दुसऱ्या पर्वतरांगांवर गेली. आता यमुना मैयाची सोबत शेवटपर्यंत प्रवासात होती डावीकडे यमुनेचा प्रवाह आणि उजवीकडे आमची बस अंतर कापीत होती. आता चढणीस सुरुवात झाली.

यमुनामैयाच्या प्रवाहाबरोबर ही उगमाची शोधयात्रा सुरू झाली. यमुनेचे खोऱ्यातील पर्वत वा डोंगर आपल्या सह्याद्रीच्या फत्तरासारखे कणखर नाहीत. हजारो फूट उंचीचा माती, गोटे, दगड, राखाडी चिखल याचा एकावर एक ठेवलेला सग्रह म्हणजे हे डोंगर वा पर्वत. काही ठिकाणी फत्तर आहेत परंतु हे फत्तर बारकेबारके लांब ६ इंच, ८ इच, ४ इंच, १२ इंच दगडी फरशा वा कपऱ्या याचा संग्रह त्यामुळे येथील दगड फुटला किंवा काढला तर त्याचे तिरकी टोके लागण्याचा सभव असतो हे भुसभुशीत आहेत. विशेषतः पाऊस पडला किंवा जोराचा धक्का बसला तर एकंदर डोंगराचा हजारोफूट उंचीचा भाग

त्यातील दगड, गोटे, माती, झाडे, याचेसह रस्त्यावर येतो त्याला लँड स्लाइड असे म्हणतात. आपल्यालाकडे पुणे-मुबई बोगद्यामध्ये पावसाळ्यात दरडी कोसळतात. त्यामुळे रस्ता बंद होतो. वाहतूक थांबते या बोगद्यातील दगड गोटे बाजूला केल्यानंतर परत रस्ता-वाहतूकीला खुला होतो तसेच हे प्रकरण आहे. परतु त्याचे प्रमाण येथे मोठे असते. म्हणून 'पत्थर गिरनेका भय है' 'धीरे चलो' 'हॉर्न दे' अशा पाट्या प्रवास सावधानीपूर्वक करण्यासाठी असतात.

हा प्रवास करताना आणखी एक अडथळा आम्हाला आला. तो म्हणजे या मार्गावरून जाणाऱ्या प्राण्यांचा - म्हशींचा, घोड्यांचा, खेचरांचा आणि त्यांचे बरोबर असणाऱ्या त्याच्या चालकाचा येथे हे प्राणी सावकाश चालताना दिसत हॉर्न दिले तरी जागचे हालत नसत. काही वेळा ते डोंगराकडे तोंड करून उभे राहत. ते सुद्धा डोंगराचे पुढे अतरावर २/४ फूट लाब. चौकशी अंती कळले की दरड कोसळण्याची सूचना प्राण्याना आधी कळते. दगड पडला तर तो आपल्या डोक्यावर पडू नये- 'सर सम्हालो' हे महत्त्वाचे. त्यामुळे इजा होऊ नये म्हणून प्राणी ही काळजी घेतात यामुळे प्रवासास वेळ लागला. आता यात्रेचा सीझन सुरू झाला म्हणून आपली वाहने घेऊन ही माणसे यमुनोत्रीचे मार्गास लागली असावीत. पौर्णिमेपर्यंत पोचणार. नतर यात्रा जोरात सुरू होते धदा करणार

अशा तऱ्हेने प्रवास करत नैनबाग, दामटा, मरोड, नैनगाव, नायगाव यात्रिक हॉटेल विकासनगर मार्गे रात्री ८/४५ वाजता बडकोट या मुक्कामाचे ठिकाणी आम्ही पोचलो या प्रवासात सूर्यास्त उशिरा म्हणजे सायंकाळी पावणे आठ वाजता झालेला आढळला

**बडकोट (१८२८) मीटर**

बडकोट हे यात्रेमधील निवासाचे ठिकाण पूर्वी वीज फक्त बडकोट पर्यंत होती त्यानतर रॉकेलाचे दिव्यात प्रवास करावा लागे येथे अनेक हॉटेल्स, लॉजेस आहेत यात्रेकरू येथे रात्रीचा मुक्काम करतात. विश्राती घेतात आणि ताजेतवाने होऊन पुढील प्रवासास निघतात हॉटेलमध्ये गरम पाणी मिळते. चहा, नाश्ता, जेवण मिळते झोपण्यासाठी उबदार

रजया मिळतात. आता रजयाचा जमाना सुरू झाला. थडीपासून रक्षण करण्यासाठी रजया आवश्यक असतात. त्याची धुडे उचलणे ही सर्कसच वाटे रात्री येथे आम्ही जेवण घेतले.

### यमुनेचे खोरे

बडकोट ते हनुमानचट्टी हे अंतर ३४ किलोमीटर आहे हनुमानचट्टी समुद्रसपाटीपासून २१३४ मीटर उंच आहे हे यमुनोत्रीला जाण्यासाठी लागणारे पायथ्याशी असणारे गाव. येथून पायी प्रवास सुरू होतो. बडकोट पासूनचे पुढचा प्रदेश म्हणजे यमुनेचे खोरे खोरे म्हणजे अनेक डोंगराच्या रांगा. उजवीकडे डोंगर. डावीकडे डोंगर समोर लाबवर डोंगर. या डोंगराचे पायथ्या जवळून यमुनेचा प्रवाह धो धो आवाज करीत वाहत आहे. चोवीस तास, बारा महिने. वर्षोन् वर्षे त्या पाण्यातील लहान मोठे दगड, बाजूला उंच उंच चीड वृक्षाची झाडे, अधूनमधून डोगरातून वाहणारे निर्झर, पडणारे धबधबे, पक्षी फारसे दिसत नाहीत या वृक्षाची सलामी घेत पाण्याच्या धो धो आवाजात पुढचे डोंगर मागे करत आम्ही जात होतो यमुना मैयाचा उगमाचा शोध घेण्यासाठी काही ठिकाणी पूल होते. हे पूल लांबीने छोटे आणि एक बस गाडी जातील एवढे अरूद होते एका डोंगरावरून दुसऱ्या डोंगरावर जाण्यासाठी या पुलाचा उपयोग होतो ते पूर्वी रस्सीचे असत. एका बाजूस आधार, दुसऱ्या बाजूस आधार आणि त्यावर तरंगत रस्सीचा झूला आता त्याऐवजी लोखडाचा वापर करतात

मधूनमधून डोंगरातून पाण्याचे ओघळ अथवा धारा दिसत. त्या धारा यमुनेच्या पाण्यास मिळतात. ही धारा डोंगरावरून पडून त्या रस्त्यावरून आपण जेव्हा जातो त्यावेळी परमेश्वराची प्रार्थना करीतच गाडी पुढे जाणे अवश्य असते. या पाण्यामुळे रस्ता खचला तर, कोठे गोटा गडगडला तर? धीरे चले सावधानीसे चले. यापुढे घनदाट अरण्ये, झाडावरील टोकदार पाने, खुरटी फुले यांना आस्वाद मिळतो. हे वृक्ष गोलाकार आहेत जसे निसर्गाने दिलेली वाहिलेली वृक्ष सुमने.

### आणि हिमशिखरे दिसली

पाऊण एक प्रवास केल्यावर अचानक एका वळणावर समोर बर्फाच्छादित

शिखर दिसले. त्यावर सूर्याचे किरण पडले होते आणि सर्वच प्रवासी आनंदित झाले बर्फाच्छादित शिखरे, त्याचे सौंदर्य हे या हिमालय प्रवासातील प्रमुख आकर्षण आहे. ही शुभ्र हिमशिखरे सतत पाहावीशी वाटतात त्यावरील नजर दूर करावीशी वाटत नाही जरा वेळाने वळणावर परत एक शिखर दिसले आणि ही उत्कठा वाढतच गेली अशा तऱ्हेने दोन तास निसर्गसौंदर्याचा आनद लुटून आम्ही हनुमानचट्टीला पोहोचलो त्यावेळी १०॥ वाजले होते या प्रवासात १५/१६ पूल लागले होते.

## हनुमानचट्टी

हनुमानचट्टी हे २१३४ मीटर उंचीवर आहे. तेथील एका हॉटेलमध्ये विसावलो हॉटेलचे मागे यमुना नदी वाहते आहे. येथे गरम चहा, कॉफी, नाश्ता सतत मिळत असतो. बसायला बाकडी टाकली होती

## यात्रेकरूंची विभागणी

येथे यात्रेकरूंची विभागणी होते. पायी चालणारे हे एका गटात. त्याचेजवळ किमान सामान असावे ही अपेक्षा हातात काठी हवी ती ६ रु ला मिळाली. या काठीचे खाली त्रिकोणी लोखंडी टोपण असते हे जमिनीमध्ये रुतून बसते. माणसाला आधार मिळतो या काठ्या प्रवास झाल्यावर काही लोक टाकून देतात पण काही यात्रेकरू प्रसाद म्हणनू घरी नेतात. छोटे सामान म्हणजे एक शबनम पिशवी गळ्यात अडकवायला सोपी त्यात पाण्याची बाटली, बिस्किटे, ग्लुकोज, औषधे, पावसासाठी बरसाती, स्पेअर टॉवेल, टॉर्च, घडीची छत्री. यमुना मैयाकी जय म्हणून हा गट वाटचाल करू लागला. लोकांनी बूटाच्या दोऱ्या नीट बाधल्या. उत्साहाने चढण सुरू झाली सूचना दिली होती की कोणी शर्यतीसारखे चालायचे नाही थकवा वाटला की लगेच थांबायचे १० मिनिटानी परत चालू लागायचे शक्यतो गटागटाने जायचे म्हणजे चुकामूक होणार नाही अडचण वाटली, अपघात झाला तर लगेच एकमेकाना मदत करायची

## दुसरा गट

घोडे/खेचरे यावर जाणाऱ्यांचा काहींना घोड्याची भीती वाटते परंतु

घोड्यांचा वेग जास्त असतो व त्यासाठी पैसेही कमी लागतात. परंतु घोड्यावर चालताना पथ्येही पाळावी लागतात. घोड्यावर जीन असते त्याचे पुढचे टोक एका हाताने धरायचे आणि जीनचे मागचे टोक दुसरे हाताने धरायचे हे करताना नजर समोर घोड्यावर आणि घोड्याचा लगाम धरणाऱ्या घोडेवाल्याकडे अनेक घोड्यांना घोडे वाले म्हणजे लहानगी मुले असत. या प्रवासात शरीराला नाही म्हणले तरी त्रास होतो व पाय, मांड्या दुखतात. पाठ दुखते. हाताला रग लागते आणि मनावर थोडे फार टेन्शन असतेच लगाम धरून घोडे चालविणे शक्य नसते ही घोडी अतरा अंतराने थांबतात. पाणी पितात. याना गूळाचे खडे चारतात म्हणून हनुमानचट्टीला दुकानात गुळाचे खडे विकायला ठेवलेले आढळले

### दंडी कंडीवाले

तिसरा गट, दंडीकंडी वा डोलीवाले यांचा. डोली लाकडाची केलेली असते मध्ये खुर्चीसारखे बैठक पुढे सामान ठेवण्यासाठी व पाय ठेवण्यासाठी जागा. त्या पुढे एक दांडू असतो. मागे एक दांडू असतो. त्याला दोर बाधलेला असतो तो डोलीच्या पुढच्या आणि मागच्या भागास बाधलेला असतो. यामध्ये यात्रेकरू बसतो आम्ही ब्लँकेट्स घेतली होती. ती पाठीला रग लागू नये म्हणून टाकली. बरोबर बरसाती, वॉटरबॅग, इतर खाण्याचे सामान, औषधे, टॉर्च, पर्स हे सामान होतेच. या डोलीला चार लोक लागतात. हे मजूर नेपाळ, उत्तर काशी, गढवाल या पहाडी भागामधून आलेले असतात १८-२५ वयोगटातील बरेचसे तरूण. हिंदी भाषा समजते सर्व हिंदू. पायात बूट, पँट, मॅनिका स्वेटर, व डोक्यावर खाद्यावर एखादी शाल अथवा कापडाची घडी. जी खाद्याला आधार म्हणून दांडूच्या खाली ठेवता येते त्यांना काम करण्यासाठी परवाना काढावा लागतो दरमहा ४५/५० रु फी असते. या डोली परत एका मोठ्या मालकाच्या मालकीच्या असतात. त्यांना ते दररोजचे भाडे देतात. राहिलेले पैसे पोटापाण्यासाठी, कपड्यासाठी आणि विशेषत. आपल्या गावी आई, वडिल, भाऊ, बहीण यांना पाठवण्यासाठी. एका तऱ्हेने कोकणातून जसे माणसे पोटापाण्यासाठी मुबईला

येतात त्याचे उलट गावांमधून शहरामधून ही माणसे पोटापाण्यासाठी या यमुनोत्रीचे पायथ्याशी येतात. सहा महिने धंदा करतात परत जातात. परत पुढील वर्षांचे मे महिन्याची वाट पाहत.

## मजुरांचे ठेकेदार

येथे या मजूरांचे ठेकेदार असतात एका डोलीला ४ माणसे त्याचे आज व उद्याचे जाऊन येऊन ११८० रुपये ठरले २० रु. ठेकेदाराचे कमिशन. सर्व रोख व्यवहार पैसे आधी द्यायचे. पावती मिळते या मजूराची सघटना आहे. मजूरांनी यात्रेकरूंना फसवू नये, लुबाडू नये, काही अपघात झाल्यास जबाबदारी या संघांची असते लाऊड स्पीकरवर शिक्का नंबर आणि डोली नंबर पुकारली. आम्ही आमच्या डोलीत बसलो. मजूरानी 'यमुना मैया की जय' असा पुकार करून डोली पालखीचा प्रवास सुरू झाला. मी प्रार्थना केली. यमुना मैया, माझा प्रवास सुखरूप होऊ दे.

## प्रवासातील दंडक

येथील रस्ते/वाट छोटी आहे. काही ठिकाणी ६ फूट ८ फूट १० फूट पायाखाली माती, गोटे आहेत. शेजारी डोंगर, डोंगराचे दगड काही ठिकाणी बाहेर आलेले त्यामुळे 'सर साभाळो' हा प्रवासातील पहिला दंडक. याच रस्त्यावरून समोरून घोडे डोलीवाले येतात. तसेच मागची माणसे पण पुढे जाऊ इच्छितात त्याना 'साइड देणे' आवश्यक असते. साईट साईट म्हणून ही माणसे ओरडत असतात अशा वेळी डोंगराचे बाजूस सरकणे हा दुसरा दडक. दरीचे बाजूला लघवीला सुद्धा जाऊ नये. तिसरा दंडक म्हणजे प्रवास उपाशी पोटी करू नये येथील पाणी हार्ड आहे म्हणून काहीतरी आधी खावे- बिस्किटे, ग्लुकोज, इलेक्ट्राल, मनुका, बेदाणे. म्हणून आम्ही बरोबर घेतले होते पचनाला पाणी जड असल्यामुळे काही न खाता पाणी पिल्यास जुलाब सुरू होतात म्हणून ही काळजी घेणे आवश्यक आहे चवथा दंडक प्रवास करताना खाली दरीत पाहू नका समोर पाहा. काही वेळा आकाशात पहा. दरीमध्ये पाहिल्यामुळे काहींना भोवळ येते, चक्कर येते म्हणून ही सूचना पाचवा दडक म्हणजे थकवा वाटला की

लगेच थांबावे. दहा मिनिटे विश्रांती घ्यायची परत चालू लागायचे. समजा पाऊस सुरू झाला तर डोंगराचे कडेस थांबा परंतु १५/२० मिनिटेच त्यानतर पावसात छत्री घेऊन वा बरसाती घेऊन चालत राहणे आवश्यक, हा सहावा दंडक

**डोलीवाले**

प्रवास कटाळवाणा नको म्हणून या डोलीवाल्यांशी मी गप्पा सुरू केल्या तुम्ही कोठून आला घरी कोण कोण आहेत आई, वडिल, भाऊ, बहिणी काय करतात शिक्षण किती झाले? या गप्पामुळे आमच्यामधील अंतर कमी झाले. त्यांनीही प्रश्न विचारले. आपण कोठून आला मी पुण्याहून आलो सांगितले. पण त्यांना पुणे गाव कोठे आहे हे समजले नाही. बम्बई के पास पूना शहर है हे म्हटल्यावर त्याना समजले. माझे वय त्यांनी विचारले मातार्जीची (माझी पत्नी सौ प्रभा) चौकशी केली मुले बाळे किती केवढी आहेत विचारले. बघा कोणीही नवीन माणूस भेटला तर तो हीच चौकशी करतो माझा व्यवसाय शिक्षकाचा आहे म्हटल्यानतर त्याना आदर वाटला. अजूनही शिक्षकाविषयी समाजामध्ये विशेषतः सामान्य माणूस आणि खालचे थरातील लोकांना आदर वाटतो. आपुलकी वाटते आपल्या मुलाना शिक्षण देऊन मोठा करणारा माणूस म्हणजे शिक्षक तसेच शिक्षणामुळे प्रगती होते. जास्त पैसे मिळतात हे त्याना पटले आहे दोन मैल गेल्यावर आम्ही थांबलो. डोली जमिनीवर टेकली डोलीवाल्यांचा आधार घेऊन मी उठलो. पाणी प्याले, मनुका, बेदाणे खाल्ले.

**बडकोट ते यमुनोत्री**


बडकोट १८२८ मीटर उच आहे. त्यानतर सयाना चट्टी १९८२ मीटर आणि नंतर हनुमानचट्टी २१३४ मीटर उचीवर आहे. यमुनोत्री ३३२३ मीटर उचीवर आहे. ११८९ मीटर उच १३ किलोमीटर अतरामध्ये जावयास लागते.

**आगे बढो**

येथे अंतराअतरावर छोट्या मोठ्या चट्ट्या असतात. खरे म्हटले तर चहापाण्याची नाश्त्याची ही दुकाने वा हॉटेल्स वा झोपड्या आहेत.

डोंगराच्या आधाराने थोडा पठारी भाग ते पाहतात. खाली विविध दगड घालून सपाट भाग करतात त्यावर बाबूच्या पट्ट्या बाधून त्यावर पत्रे वा प्लॅस्टिकचे कापड व झाडांची पाने घालतात त्यांची उंची थोडी असते पूर्ण उभे राहता येत नाही. थोडे वाकून बसावे लागते जमिनीवर पण बाबूच्या चटया, त्यावर अंथरूण घातलेले असते. आम्ही गरम गरम चहा घेतला. मजूरांनी बिड्या पिणे सुरू केले. बिड्या पिण्यामुळे गरम वाटते. या मजूराचा चहा पाण्यासाठी खर्च प्रवाशानी करायचा असा दडकच अलिखित स्वरूपात होऊन गेला आहे. पायी जाणारे प्रवासी येथे भेटले. घोड्यावर जाणारे पण भेटले. प्रत्येकाची खुशाली विचारली

## बडकोट ते यमुनोत्री ऊंचाई




आता परत पुढचा प्रवास सुरू झाला. आता डोंगर मोठाले होते त्यावरील झाडीही बरीच होती. मोठमोठे चीड वृक्ष होते. काही ठिकाणी ते उलटे होऊन पडलेले होते त्याचा आधार काही मोठ्या दगडांनी

घेतला होता.

निम्मे अंतर गेल्यावर आम्ही जानकी चट्टी येथे पोहोचलो. ही एक छोटी वस्ती आहे येथे दोन मजली घरे आहेत. हॉटेल्स, लॉजेस आहेत. दुकाने आहेत. घोडे ठेवण्यासाठी जागा आहे डोल्या तेथेच मोकळ्या जागेत उंच करून ठेवतात. चोरीस जाण्याची भीती नाही. आम्ही अरविंद आश्रम या लॉजमध्ये उतरलो होतो ते दोन मजली होते. वरच्या मजल्यावर लाकडी तुळया होत्या. खाली काँक्रीट इमारत होती खोल्यांमध्ये कॉट (लाकडी), त्यावर बेड, बेडशीट, रजई, उशा खाली मॅटिंग आणि शेजारी संडास बाथरूम प्रशस्त, वर लाकडी छप्पर अशी आमची खोली होती. आम्ही दोन कुटुंबे त्यात विसावलो. पायातले बूट काढवत नव्हते थडी वाढत होती.

आम्हास सूचना दिली होती की आम्ही जरी तेथे इतरापेक्षा लवकर पोचलो तरी उगीच इकडे तिकडे हिंडू फिरू नका. आपल्या खोलीत रजई घेऊन पडून राहा. समुद्रसपाटीपासून आपण बरेच वर येतो त्यामुळे हवा विरळ होते. ऑक्सिजनचा पुरवठा कमी पडतो. हे जुळवून घेण्यास वेळ लागतो म्हणून सर्वांनी दोन तास आपल्या खोलीत बसावे हा दंडक. डोलीवाले आले घोडेवाले आले. आणि नतर पायी चालणारे एक एक जण आले त्याचे स्वागत यमुना मैया की जय म्हणून करत असू.

रात्री तेथेच जेवण घेतले. थडी वाढत होती. कानटोप्या, मफलर, स्वेटर्स, शाली बाहेर आल्या आणि सर्वांनी रजयामध्ये गुडाळून घेतले. वीज रात्री ९ वाजेपर्यंतच होती जनरेटर लावला होता तो बंद झाला

## यमुनोत्रीकडे (३३२३ मीटर)

आज लवकर उठलो चहा घेतला, स्नानाचे सामान घेतले आणि ६ वाजता डोलीत बसलो हातमोजे घातले. नाकावर गरम रुमाल लावला. अगावर कोट घातला आणि निघालो. आकाश स्वच्छ होते सूर्याचे ऊन दिसत नव्हते पण कोठेतरी सूर्योदय झाला होता. आता शेजारच्या डोंगरावर मोठी झाडे, पाण्याचे झरे जास्त प्रमाणात दिसू लागले. काही ठिकाणी आम्ही उतरलो. मग पायी चाललो कारण

वाट अरूंद होती वरून डोंगरावरून पाणी पडत होते. म्हणून रस्ता खराब झाला होता अशा वेळी आम्ही पायी प्रवास केला.

**यमुनोत्री**

आणि आता समोर यमुनोत्रीचे मंदीर दिसले. आनद वाटला आपल्याला जे पाहायचे आहे ते दृष्टीपथात आले होते. डोलीतून उतरलो. घोड्याची पागा तेथेच होती डोलीवाल्यांनी सागितले यापुढे डोली न्यावयाची नाही. त्यानी डोल्या डोंगराचे कडेला लावल्या आणि आंघोळीचे सामान घेऊन आम्ही यमुना मैयाचे दर्शनासाठी निघालो.

**तप्त पाण्याचे कुंड - यमुनाबाई कुंड**

निसर्गाची किमया पाहा दमलेल्या भागलेल्या यात्रेकरूंचे साठी गरम पाण्याची सोय निसर्गाने करून ठेवली आहे. या कुंडात आघोळ केली त्यांची खोली ५ फूट आहे. त्याआधी २/३ फूट उंचीवर पायऱ्या पण आहेत तेथे बसून प्रथम पाण्यात शिरायचे. शेजारी महिलासाठी पत्र्याची शेड बांधून स्नानाची व्यवस्था केली आहे. स्नान केल्यामुळे ताजतवाने वाटते डोक्याला लावायला खोबरेल तेल होते ते गाठले होते म्हणून गरम पाण्यात पातळ करून डोक्याला, पायाला लावले स्नान करून कपडे बदलून आम्ही कुडाच्या वरचे भागाला असलेल्या दिव्य शीलेकडे निघालो. हातात पूजा साहित्याची ताटे होती येथे पूजेची ताटे विकत मिळतात. ११ रु, २१रु, ३१रु, ५१रु या विविध दराची ही ताटे ताटामध्ये हळदीकुंकवाचा पुड्या, बागड्या, पुष्प, फळ, गोटा नारळ वाहत. ओटीचे सामानही खण नारळ, विकत मिळतात. मुरमुरे, लाह्या, हरबऱ्याची डाळ प्रसादात असते.

**दिव्यशीला**

येथील शीला अथवा फरशा दगडाच्या आहेत त्या गरम लागतात कारण त्याखालून गरम पाणी वाहत असते त्यावर बसून पती पत्नी समत्रक या शीलेची पूजा करतात. या डोंगरात दोन भोके आहेत त्याना नेत्र म्हणतात. त्यामधून गरम पाणी फुसफस् आवाज करून बाहेर येत असते. त्यापुढे यमुनेची मूर्ती ठेवलेली आहे. भटजी महाराष्ट्रीय होते ५० रु दक्षिणा दिली. या शीलेचे पूजन केल्यावर यमुना मातेचे



यात्रा मगलमय हो । हरि





पहाडी वेषामध्ये
गुलहौशी प्रवासी - मसुरी

वळणा - वळणाचा रस्ता - मसुरी



रोपवे व
उडन खटोला,
मसुरी





ना आणि गगा याच्या मूर्ती आणि पुजारी

नोत्री - तप्त पाण्याचे कुड





यमुनोत्री - उगमाजवळचा खळाळता प्रवाह




डोलीवाले - याच्यामुळे यमुनोत्री दर्शन घ



यमुनोत्री येथील धबधबे

हिमशिखरे - गगोत्र



गगोत्री मदीर





गंगास्नानाचा आनंद



पायऱ्या
पायऱ्याची शेती

गोमुख हिमनग - गंगेचे उगमस्थान



गुप्त काशी विश्वनाथ मंदीर



गुप्त काशी येथील
मंदीरासमोरील
यमुनाकुंड व गंगाकुंड



हिमनगावर स्वार



देखिए हिमशृंग - केदारनाथ
शेजारी शनीचे मदीर




हिमनगावरून प्रवास




पहाडी मुले



देवप्रयाग



बद्रीनाथ
पचायतन



बद्रीनाथ मदीर



काली कमलीवाले बाबा
स्वर्गाश्रम (ऋषिकेश)





नीळकठ दर्शन



बोटीतून
स्वर्गाश्रमाकडे

नीळकठ महादेव ऋषिकेश



मदीरात पूजा करावयाची असते

**सूर्यकुंड / तप्त कुंड**

त्या शेजारी आणखी एक ४ फूट बाय ४ फूट तप्त पाण्याचे कुड आहे तेथे एक बार ठेवला आहे. एका कापडात तांदूळ घालून त्याची पुरचुंडी बाधून पाण्यात बुडवून या बारला बाधून ठेवतात. दिव्य शीलेची पूजा होईस्तोवर तांदूळ शिजतो हा भात प्रसाद म्हणून घेतात त्यांना दक्षिणा दिली (५रुपये).

**यमुनाजीचे मंदीर**

त्यानंतर यमुना मैयाचे मंदीर आहे. तेथे यमुना आणि गगा याच्या मूर्ती आहेत. दर्शन घेतले. पुजाऱ्यासमवेत मंदीराचा फोटो काढला प्रदक्षिणा, घंटानाद होऊन नमस्कार केले कुंडाचे जरा पलीकडे संकट मोचन हनुमानजींचे मंदीर आहे. त्याना नमस्कार केले. तेथे एक विरागी होते. त्यांना नमस्कार केला. हिमालयात हनुमानाची मदीरे बरीच दिसतात त्यात सकट मोचन हनुमानाची मदीरे जास्त दिसतात येथे यमुना मैयाचा प्रवाह शुभ्र आहे त्याचा फोटो काढला उन वर आले होते. शेजारील डोंगरावर पाण्याचा प्रवाह. उफाळणारे पाणी पाण्यातील लहान मोठे गोटे या दृश्याचा फोटोही काढला एका धामाची यात्रा पुरी करून झाली याचा आनद तोंडावर होता. येथे अनेक दुकाने आहेत. एका हॉटेलमध्ये आम्हास शिरा दिला. छान होता चहा घेतला. ताजेतवाने झालो. प्रसाद म्हणून काही वस्तू घेतल्या.

**हनुमानचट्टीकडे परत**

यमुनोत्री ते हनुमानचट्टी: आता डोलीवाल्यांची पावले झपाझप पडू लागली. १४ किलोमीटर अतर पुरे करून दुपारचे वेळी हनुमानचट्टीला पोचायचे होते हिमालयातील हवा दुपारनतर बिघडते म्हणजे वारा वाहू लागतो, पाऊस पडतो काही वेळा बर्फ पडते म्हणून लवकरात लवकर चला म्हणून त्यांचा आग्रह होता २ किलोमीटरवर विश्राती घेतली एक फोटो घेतला. तेथून यमुनोत्रीचे मंदीर, एक पाण्याचा झरा आणि सर्वात वर हिमशिखरे आणि डाव्या उजव्या बाजूस वृक्षानी बहरलेले डोंगर. उत्कृष्ट दृश्य कॅमेऱ्याने टिपले. आणि जानकीचट्टी येथे पोचलो

तेथे खाण्याचे जिन्नस घेतले. पाठ टेकली. लवंडलो डोलीवाल्यानी हाफ डाल चावल खाल्ले आठ रुपयाना.

## जानकीचट्टी ते हनुमानचट्टी

परत प्रवास सुरू झाला. थोडा सखल प्रदेश होता. पाय झपझप पडत होते. थोडा पाऊसही झाला. या प्रवासात एक सुदर दृश्य दिसले पाण्याचा प्रवाह वाहत होता तो एका छोट्या गोलाकार दगडावर पडत होता ५/६ फूट उंचावरून आणि हे पाणी चक्राकार २५/३० धारानी परत खाली पडत होते कॅमेरा बरोबर होता. परंतु धोकादायक भाग असल्याने फोटो घेता आला नाही. येथे रस्ता वाढवण्याचे काम चालू होते जानकीचट्टीपर्यंत मोटारचा रस्ता हवा अशी उत्तर प्रदेशातील लोकांची मागणी आहे म्हणून गेले २/३ वर्षे हे काम चालू आहे. अजूनही २/३ वर्षे काम चालू राहील

उन वाढत होते डोलीवाल्याचे अगातून घामाच्या धारा वाहत होत्या. परतण्याची आतुरता होती. आणि शेवटी ३ वाजता आम्ही हनुमानचट्टीला पोहोचलो.

विश्रांती घेण्यासाठी हॉटेलातील खोल्या घेतल्या होत्या सामान ठेवून त्यावरून आम्ही पहुडलो नाश्ता म्हणून सामोसे होते. तर त्यावर चहा देण्यात आला हे डोलीवाले नसते तर आम्ही यमुना मैयाचे दर्शनच करू शकलो नसतो. एका जीवाची गरज दुसऱ्या जीवाची पोटाची भूक शमवीत होती ही आमची भावना होती. या डोलीवाल्याना जानकीचट्टी येथे जेवण्यासाठी ५० रु आम्ही दिले होते दुसरे दिवशी परत चहा नाश्ता, हाफ चावल यासाठी १००/१५० दिले होते. हे डोलीवाले नम्र दिसले. 'माताजी चिंता मत कीजिये।' आपल्या सहकाऱ्याना उतारावर 'आरामसे लो' म्हणून सांगत होते बाबाजी, हररोज हम यहाँ आते है। यात्रियोंकी खुषी हमारी खुषी। पेट के लिए करना पडता है। सामानाची काळजी करू नका असे अजीजीने, विश्वासाने सागत होते प्रामाणिकपणा कुठल्याही कामात असल्यास किती गोष्टी सुकर होतात एकमेकाना आधार देण्यासाठी मधुर सभाषण आवश्यक आहे. याची प्रचीती आली.

थोड्या थोड्या वेळाने घोडेवाले, पायी चालणारे, डोलीवाले यात्रेकरू येत होते. यमुना मैया की जय या जयजयकाराने त्यांचे स्वागत करीत होतो चहापाणी करून बसमध्ये बसलो आता यात्रेकरूची तोंडे सुरू झाली. सर्व प्रवासी आपणाला आलेले अनुभव वर्णन करीत होते. घोड्यावरून चालताना कसे वाटते, एका घोडेवाल्याने लक्ष कसे दिले नाही. दंडीवाल्यास पायाला ठेच लागल्यामुळे आपली दडी कशी आपटली आणि त्यातून त्या बाई सुखरूप कशा सुटल्या- विविध अनुभव सागत होते. यमुनोत्रीस पोचल्यानतर आघोळ करताना कसे वाटले सर्वजण अनुभव सागत होते. जरा कठीण हा प्रवास आहे हा भाव मात्र सर्वांचे मनात चेहऱ्यावर दिसत होता

**यमुनेचे माहात्म्य**

यमुना ही सूर्याची मुलगी व यमाची बहीण तिने आपल्या भावाला जेवायला बोलावले वर्ष दोन वर्षे झाली तरी त्याला वेळ झाला नाही म्हणून तिने सत्याग्रह केला. यम बहिणीकडे जेवायला आला. भाऊ तृप्त झाला "मी संतुष्ट झालो आहे वर माग" म्हणाला. प्रतिवर्षी समागच्छ भोजनार्थं तू मद्गृहे। आज कार्तिक शुद्ध द्वितीया आहे. हा दिवस तुझ्या भेटीची आठवण म्हणून यमद्वितीया म्हणजेच भाऊबीज नावाने प्रसिद्ध होईल. त्या दिवशी कोणी आपल्या बहिणीकडे जाऊन जेवतील त्याना सर्व प्रकारे सौख्यलाभ होईल. त्यादिवशी बहिणीच्या घरी जाता यावे म्हणून यम आपले काम बाजूला ठेवील.

श्रीकृष्ण हा पूर्णावतार. श्रीकृष्णाचा जन्म यमुनातीरी मथुरेत झाला. यमुनातीरीच्या त्याच्या बाललीलांनी तिच्या पावित्र्यात भर टाकली आहे

यमुनेचा उगम बदरपुच्छ पर्वतराशींमध्ये सापडतो त्याची उची २० हजार फूटाहून अधिक आहे १० हजार फूटावर आपणास यमुनोत्रीचे दर्शन घडते हे उगमस्थान अद्भूत आणि दैवी आहे. तेथे आजपर्यंत कोणी जाऊ शकले नाही. यमुनेचा गगेशी प्रयाग वा अलाहाबाद येथे झालेला सगम हा असाधारण आहे. भारतात एवढा मोठा सगम कोठे पाहावयास मिळत नाही. यमुनोत्रीपासून प्रयागपर्यंत तिची लाबी ८६० मैल आहे पाण्याचा प्रवाह एवढा मोठा आहे की तिचे पाट आणि

कालवे याची लाबी २००० मैल होते. शिवाय शतपट पाणी गंगेस मिळत आहे. यमुनेच्या काठी अनेक मुनींचे आश्रम होते. मोठमोठे यज्ञ झाले आहेत भारताची राजधानी दिल्लीला यमुनेचे पाणी मिळते प्रसिद्ध ताजमहाल यमुना तटाकीच बाधला आहे. यमुनामदीरात दोन मूर्ती आहेत भागीरथी गगेची व यमुनेची. अक्षय्यतृतीयेपासून अश्विन शुद्ध पौर्णिमा कोजागिरी पर्यंत ह्या मूर्तींची पूजा येथे होते बाकीच्या महिन्यात येथून ही मूर्ती हलवून खाली खरसाळी या गावी नेतात. तेथे पूजाअर्चा चालू राहते. खरसाळी गाव जानकीचट्टीचे जवळ अर्ध्या मैलावर आहे तेथे सपाटी आहे. घरे आहेत डोंगरपायथ्याशी आहे. यमुनेच्या वाटेकडील हे शेवटचे लोकवस्तीचे गाव येथून यमुनोत्री चार मैलावर आहे. यमुनेचे पंडे लोकाची वस्ती तेथे आहे या लोकानी येथे वस्ती केली आहे म्हणून आपणास यमुनोत्रीस जाता येते त्याचेकडे सहानुभूतीने पाहावे. दक्षणा द्यावी. यमुनेचा भाऊ शनी म्हणून खरसाळी येथे शनीचे देऊळ आहे अश्विन शुद्ध पौर्णिमेला यमुनोत्रीहून मूर्ती आणून शनीच्या देवळात ठेवतात

## प्रवासातील नाविन्य

या प्रवासातील सर्व वातावरण नवीन होते घोड्यावरचा प्रवास, डोलीतील प्रवास, पायी प्रवास, अरूद रस्ता, रस्त्याच्याकडे १४ मैल डोंगर, त्यावरील पुढे आलेले अणकूचीदार दगड, येणारे जाणारे प्रवासी, घोडे, डोलीवाले त्यांची साइट साइट म्हणून आरोळ्या, मधूनमधून भेटणाऱ्या चट्ट्या, खाणे पिणे, हवामान - सर्वच नवीन त्यात उत्सुकता होती, तशी भीतीही होती. ही भीती अगावर येऊनच आम्ही प्रवास पुरा केला सर्व यात्रेकरूनी दिलेल्या वेळात कोठेही अपघात न होता प्रवास पुरा केला हे महत्त्वाचे.

## एक धाम पूर्ण

एका प्रवाशाने उपमा दिली की ही चारी धाम यात्रा ही अवघड प्रश्नपत्रिका आहे यावरचे चार प्रश्न आहेत. हे सर्व कपलसरी आहेत. एवढेच नव्हे तर तो सोडवण्याचा क्रमही ठरलेला आहे प्रथम यमुनोत्री. तो पार पाडला की गगोत्री ती परीक्षा पार करून केदारनाथ आणि

शेवटी बद्रीनाथ. एका तऱ्हेने ही अडथळ्याची शर्यतही होईल. हा पहिला प्रश्न आम्ही समाधानकारकरित्या सोडविला. आत्मविश्वास वाढला. आपण ही अवघड प्रश्नपत्रिका, अडथळ्याची शर्यत पार करू.

या आत्मविश्वासाने आता गंगोत्री गाठायची आहे या विचाराने हनुमानचट्टीतून बडकोटला आलो. जेवण घेतले. आणि रजईमध्ये पहुडलो. सकाळी ४॥ वाजता उठण्यासाठी. परत सामानाची बाधाबाध आणि प्रतीक्षा आणखी एका धामाची गंगोत्रीच्या दर्शनाची. आणखी एका अनोख्या अनुभवाची.

## प्रकरण ३

# गंगा मैया की जय

### यमुनोत्री ते गंगोत्री – प्रवासमार्ग

| स्थान | अंतर (कि.मी) | उची (मीटर) |
|---|---|---|
| यमुनोत्री | ० पायी प्रवास | ३३२३ |
| हनुमानचट्टी | १३ | २१३४ |
| बडकोट | ४७ | १८२८ |
| धरासू | १०२ | १०३६ |
| उत्तर काशी | १२८ | ११५८ |
| भटवाडी | १५७ | १६७७ |

| | | |
|---|---|---|
| गगनानी | १७१ | १९८२ |
| हरसिल | २०२ | २५९१ |
| लाका | २१५ | २६५२ |
| भैरों घाटी | २१८ | २६५२ |
| गंगोत्री | २२८ | ३१४० |
| भोजवास | पायी प्रवास २४६ | ३७९२ |
| गौमुख | २५१ | ३८९२ |

## गंगोत्रीकडे आगेकूच

### बडकोट ते धरासू

बडकोट सोडले त्यावेळी सकाळी सवा आठ वाजले होते आता प्रवास गंगोत्रीकडचा. बडकोटहून प्रथम आम्ही ५५ किलोमीटर दूर धरासू या गावाला पोचलो. बडकोट ते धरासू या लांबलचक मार्गावर अनेक ठिकाणी दुतर्फा गर्द झाडी आढळली. या मार्गावर चीड वृक्ष असख्य आहेत ते दीपमाळेसारखे वाटतात. झाडाला मुख्य खोड जे असते ते सरळ उच वाढते. त्याला ठराविक अंतरावर चारी बाजूंना फांद्या फुटतात. या फांद्या जमिनीला समातर बऱ्याच असतात साधारणपणे एकाच ठिकाणी तीन/चार फांद्या फुटतात. त्याची पाने टोकदार असतात पाऊस, बर्फ त्यावरून लवकर खाली पडण्याची ही व्यवस्था होय पानाचा शेंडा आकाशाकडे वर आलेला असतो त्यामध्ये तांबडी गोबरी फुले हे दृश्य तास दीड तास पाहायला मिळाले. साधारणपणे साडे दहाला आम्ही धरासू येथे आलो तेथे हॉटेलचे गच्चीवर नाश्ता केला पोहे आणि चहा कॉफी हा बेत मस्त होता.

धरासू येथे भागीरथी नदी आहे. तिला तेथे भिलगना नदी मिळते अनेक यात्रेकरूनी नदीच्या पात्रामध्ये नाणी टाकली धरासूपासून गगोत्री १२६ किलोमीटर आहे. आम्ही ताजेतवाने होऊन उत्तर काशीकडे निघालो ११॥ वाजता पोचलो आजचा सपूर्ण दिवस बसमधून प्रवास करायचा होता सायकाळचे आत मुक्कामाला भैरवघाटीला जायचे होते गगोत्रीचे अलिकडे भैरवघाटी हे ठिकाण आहे. जितका वेळ चहा, नाश्ता,

जेवण थात आम्ही कमी घालवू तितक्या लवकर आम्ही मुक्कामाला पोचणार होतो.

### उत्तर काशी (११५८ मीटर उंच)

उत्तर काशी येथे साडे अकरा बारा वाजता पोचलो. तेथे थोडी विश्राती व हॉटेलमध्ये थाबून जेवण घेतले. आणि परत प्रवासास दोन वाजता सुरूवात केली हे मोठे गाव वाटले अनेक प्रवासी बसेस दिसत होत्या. शिवाय सैन्याचे ते ठाणे पण होते. समोर पोस्टाची पेटी होती पोस्ट कार्ड लिहून टाकले. आश्चर्य म्हणजे तीन दिवसात ते पुण्याला पोचले. येथे थोडी फळे विकत घेतली. जिरालिबू काहींनी घेतले परंतु कंपनीचे मॅनेजरने सागितले मुळीच घेऊ नका. मसाला वेगळा असतो. परिणामी जुलाब सुरू होतात. माझा कॅमेऱ्याचा रोल सपला होता म्हणून मार्केटमध्ये जाऊन एका फोटो स्टुडियोमध्ये रोल बदलून घेतला कारण आता मजेदार फोटो काढावयाचे होते उत्तर काशी भागीरथी नदीच्या तीरावर वसले आहे. येथे भागीरथीचा प्रवाह उत्तराभिमुख झाला आहे. नदीचे पात्र रुंद आहे. प्रवाह संथ आहे.

### उत्तर काशी ते भैरव घाटी

उत्तर काशी ते भैरवघाटी हा जवळ जवळ ९० किलोमीटरचा प्रवास आहे उत्तर काशी हून निघाल्यावर आम्हाला वाटेत मनेरी जलविद्युत योजनेचा भाग लागला. उत्तर प्रदेशात आम्हाला जलविद्युत प्रकल्प बरेच लागले बारमाही पाऊस आहे त्यामुळे पाणी अडवून त्या पासून वीजेची निर्मिती करण्याचे हे प्रयत्न आहेत निसर्गापासून मिळणारी उर्जा कमी होत आहे. जगले कमी झाली. लाकडे कमी पडतात. शिवाय आधुनिक कारखान्यांना वीज लागते. उत्तर काशी येथे गेल्या वर्षी भूकप झाला होता त्यावेळी पडलेल्या इमारती पाहिल्या. उत्तर काशीचा प्रमुख पूल पडला. तोही अजून तसाच आहे. परतु नवीन पूल लगेच बांधला आहे अशा तऱ्हेने भागीरथी नदीच्या किनारे किनारे चालत असता गंगनानी हे ठिकाण लागले

### गंगनानी अथवा गंगा + नहानी

सवातीनला आम्ही गंगनानी येथे पोचलो. येथे गरम पाण्याचे कुंड

आहे ज्याप्रमाणे यमुनोत्रीला पर्वतावर गरम पाण्याचे कुड आहे तसे कुंड गगोत्रीला नाही त्याऐवजी गंगा नहानी येथे तप्त पाण्याचे कुड आहे २४/२५ पायऱ्या चढून वर जावे लागते. स्नानास अर्धा तास दिला होता. येथे पण यमुनोत्रीप्रमाणे डोगरातून गरम पाण्याची धारा पडत होती त्या ठिकाणचा भाग हिरवा पिवळा झाला होता गरम पाणी पडताना ती थोडी थंड व्हायची कुंडाचे दोन भाग केले होते. पुरुषासाठी उघड्यावरचा भाग. स्त्रियांसाठी पत्र्याचे पार्टिशन करून दुसरा भाग केला होता गंधक युक्त पाणी आहे म्हणून डोक्यावर जास्त पाणी घ्यावयाचे नसते जास्त वेळ पाणी घेतले तर चक्कर येते स्नान केल्यावर पितराना पाणी दिले हे पाणी दिले असता पितरांना मोक्ष मिळतो ही श्रद्धा तेथे एक पाराशर आश्रम ऋषि मंदीर आहे. देवतांना नमस्कार केला. चहा/कॉफी झाली आणि परत मोटारीत चढलो चार वाजले होते येथे अनेक साधू बैरागी बसतात. त्याना यात्रेकरू दान करतात. त्यासाठी सुटे पैशाची एक पिशवीच एका यात्रेकरूने आणली होती काहींना १ रुपयाच्या १०० नोटा आणल्या होत्या. खरे म्हटले तर पोट भरण्याचाच हा मार्ग. उदरभरण कोणाला चुकले आहे? मग तो साधू असतो वा बैरागी असो

**गंगनानी ते भैरवघाटी**

स्नान आटोपून आता भैरव घाटीकडे निघालो. हा वळणा वळणाचा चढणीचा प्रवास आहे यमुनेचे खोरे जसे लाबलचक आहे तसेच गगेचे खोरे पण लाबलचक आहे येथेही प्रवासी डोंगराचे कडेने जातात आणि त्या प्रवासाच्या सतत साथ असते भागीरथीची. येथे गगा नदीला भागीरथी म्हणतात भागीरथीचा प्रवाह यमुनेच्या मानाने संथ वाटला. तिचे पात्र विविध ठिकाणी विस्तीर्ण होते काही ठिकाणी सखल भागही ४००/५०० मीटरपर्यंत लागला. परतु दगड गोटे मात्र मोठमोठे अर्ध्या फूटापासून २८/३० फूट लाब उंच परतु हे गोरेपान तांबूस केशरी दगड आल्हाददायक वाटतात.

गगेच्या खोऱ्यामध्ये 'पत्थर गिरनेका भय' होतेच धीरे चलो. सावधानीसे चलो. स्लाइड है या धोका दर्शविण्याच्या पाट्या ठिकठिकाणी होत्या

यमुनेपेक्षा गंगेचा डोंगर/पर्वत उंच होते. त्याचप्रमाणे तेथील दरडीही मोठमोठ्या होत्या. ५००/७०० फूट उचीचा भाग अनेक ठिकाणी पडलेला होता. त्यात मातीचे ढिगारे. उंच वृक्ष आणि लहान मोठे गोटे पण होते. एका ठिकाणी तर २० फूटी ३० फूटी दगड होते अशा वेळी पाणी थांबले जाते. त्यामुळे पाण्याची उंची वाढते आणि मग पाण्याच्या रेट्याने त्या ढिगाऱ्यामधून पाणी वाटही काढते. हे गेले हजारो वर्षे चालू आहे आणखी हजारो वर्षे चालूच राहणार.

या ठिकाणी अंधार लवकर पडतो असे दिसले. संध्याकाळी ५.५० वाजता अंधार पडू लागला त्यानतर हिमालयन रिसोर्सेस घरती हे ठिकाण लागले. येथे गिर्यारोहकांसाठी, यात्रेकरूंसाठी तबू मिळतात. झाडांचे सावलीला हे तबू उभारले आहेत. यानंतर आपल्याला हरसिल, लाका हा प्रदेश लागतो. येथे Hair Pin Bend आहेत. म्हणून 'मोडोंपर सतर्कता रखिये' या पाट्या सावध करीत होत्या.

अशा वेळी आम्हाला एक सुंदर दृश्य पाहावयास मिळाले. हिमालयात जडगंगा म्हणून नदी आहे ती येथे भागीरथी नदीला मिळते या नदीवर पूल बांधला आहे खालच्या पाण्याचे प्रवाहापासून पूल ५०० फूट उच आहे त्यावरून आमची गाडी व्यवस्थित गेली. याचे डाव्या बाजूला चीनची हद्द ३५ किलोमीटरवर आहे. आता आपल्याला देवदार वृक्ष दिसावयास लागतात पूर्वी हा पूल जाड दोरांचा होता. या दोराच्या पूलावरून ओलाडून जाणे हे जीवावरचे काम वाटे. ती सर्कस पार करून यात्रेकरू पुढे जात असा प्रवास करीत असता यमुनेच्या पेक्षा एक वेगळे दृश्य अनुभवायला आले ते म्हणजे रस्त्याच्या बाजूला बर्फाचे ग्लेशियर/हिमनग प्रथम जेव्हा आम्ही गाडीचे शेजारी हिमनग पाहिला त्यावेळी सर्वांनाच मजा वाटली एका ठिकाणीतर वरचे बाजूस बर्फ, खालचे बाजूला बर्फ आणि आमची गाडी बर्फ साफ केलेल्या रस्त्यावरून जात होती. ही दृश्ये भैरवघाटीमध्ये नवीन होती यमुनोत्रीला ही दृश्ये आम्हाला पाहायला मिळाली नव्हती

या घाटीमध्ये आम्हाला निसर्गाचे विविध रग दिसून आले. उन, पाऊस, पाऊस पडताना बर्फ. आणि डोंगरातून वाहणारे पाण्याचे झरने

संध्याकाळचे उन व त्यातून दिसणारी वनश्री

**भैरवघाटीचा मुक्काम (उंची २६५२ मीटर)**

भैरवघाटी मुक्कामाला गाडी टेकली आणि ६॥ वाजता पाऊस सुरू झाला आकाशात गडगडाट झाला. विजाही चमकू लागल्या. आम्ही लगेच छत्र्या/बरसाती काढल्या तेथून रेस्ट हाऊसपर्यंत रस्ता १०० मीटरचा. परंतू छत्रीचा उपयोग झाला लगेच टॉर्चही काढले कारण त्या निवासात अधार पडू लागला होता. वीज नव्हती. ऐन मोक्याचे वेळी टॉर्च सापडणे छत्री सापडणे, मेणबत्ती आणि काडेपेटी सापडणे ही यात्रेकरूची परीक्षा असते. कोणत्या वेळी कोणती वस्तू लागल्यास ती चटकन मिळावयास हवी या दृष्टीने सामानाची बाधाबाध हवी. उत्तर प्रदेश शासनाने वेगवेगळ्या ठिकाणी अशी विश्रामगृहे बांधली आहेत. अनेक खोल्या होत्या. प्रत्येक खोलीमध्ये तीन कॉट्स टाकल्या होत्या. प्रत्येकाला बेड, उशी, बेडशीट, रजई कदील होता. फरशीवर मॅटिंग होते. खिडक्यांना काचा होत्या रजईचा लोकांनी आश्रय घेतला. कारण आता जेवण तयार करण्यासाठी २/३ तास वेळ हवा होता

---

**भजनाचा आनंद**

असे विश्रांती घेत असता एका खोलीतून टाळाचे व भजनाचे आवाज आले. बंगलोर मुंबईची २ जोडपी होती त्यांनी भजने म्हणण्यास सुरूवात केली होती. मग आमच्यातीलही मडळी या भजन कार्यक्रमात सामील झाली आमच्या गटामध्ये काही गाणाऱ्या बायका होत्या काही सकाळी काकड आरतीला जाणाऱ्या. काही भजनी मडळात जाणाऱ्या, पालखीला जाणारी वारकरी मंडळीही होती त्यानी भजने म्हटली मी पण सामील झालो कारण दोन तीन तास वाट पाहत मुक्याने राहणे म्हणजे शिक्षाच. 'मन चिती ते वैरी न चिंती' या म्हणीची प्रचीती येथे आली. अनेक चांगले वाईट- वाईटच विचार मनात येत होते मनात शकाकुशंका येत होत्या रात्री पाऊस पडून बर्फ पडले तर सकाळी थंडी किती असेल. मग या थडीत आपण सकाळी

गंगास्नान कसे करणार? इतके जवळ येऊन गंगास्नान न करणे हा विचार मनाला पटत नव्हता परंतु पत्नीने स्नान करायचे नाही हे माझेकडून कबूल करून घेतले होते रात्री खूप पाऊस झाला आणि दरड कोसळली तर आपला प्रवास पुरा होईल का? या शका रजईत बसल्यामुळे येत होत्या. त्या भजनामध्ये सहभागी झाल्यामुळे कोठल्या कोठे पळाल्या 'काका, जेवायला चला' ही हाक केव्हा आली ते कळले नाही. खरे तर भजन, कीर्तन आणि भगवताचे पूजन स्मरण करण्यामुळे 'सकलही चिंता हरती' हे खरे. त्याची किंमत आणि महत्त्व या निर्जन ठिकाणी पाऊस पडत असताना, वारे वाहत असताना नि·शब्द शांततेमध्येच, कंदीलाच्या प्रकाशात कळले. धन्य त्या सत महात्म्यांचे की ज्यानी महाराष्ट्रातील आबाल वृद्धांना सतराव्या शतकात भजन कीर्तनाची गोडी लावली

---

जेवणे झाली .गरम पाण्याने हात धुतले. आणि सर्वजण निद्राधीन झाले दिवसभरचे प्रवासाने सर्वच थकले होते. जागे झाले ते पहाटे चार वाजताना.

येथे चार/साडेचार वाजता उजाडते. वृद्ध माणसे जागी झाली संडास बाथरूम कडे आवाज येऊ लागले. जरा वेळाने चहा आला. छान उजाडले होते. आकाश स्वच्छ व निरभ्र होते. समोर 'देखिए हिमश्रृग' त्यावर सोनेरी सूर्यकिरण. मनोहारी दृश्य मोठमोठे वृक्ष कॅमेऱ्याने ते टिपले

**गंगोत्रीकडे प्रयाण**

आठ वाजता गंगोत्रीकडे निघालो. २० मिनिटाचा प्रवास होता बरोबर स्नानाचे कपडे. येताना गंगाजळ आणण्याची योजना म्हणून प्लॅस्टिकच्या बाटल्या घेतल्या होत्या उत्सुकता होती गगामैयाच्य उगमाचे दर्शन घेण्याची थड पाण्यातील स्नानाचा अनुभव घेण्याची आणि गंगास्नान करून 'सकलही पापे हरती' सार्थ करण्याची. पुण्य गाठी बाधण्याची. शरीराने नव्हे तर मनाने पुण्यवान होण्यासाठी

## गंगोत्री

आमची बस गंगोत्री येथे सकाळी ८/२० वाजता पोचली आमच्या आधी अनेक बसेस, टॅक्सी, इतर पर्यटन वाहने आली होती त्यामुळे वाहनाच्या पार्किंगचा प्रश्न होता परंतु चालकाने आम्हाला प्रथम उतरविले आणि योग्य जागा पाहून वाहन थाबविले. यात्रेकरू उतरले म्होरक्याचे मागे आम्ही चालू लागलो. वाटेतील दुकानातून पूजेची ताटे घेतली. येथे गगाजीचे मंदीर आहे. त्यापुढे फरशी आहे. विस्तृत प्रांगण आहे. शिवाय काही खोल्या आहेत तेथे सतरंजी घालून सर्व यात्रेकरू बसले उन पडले होते आकाश स्वच्छ होते. बर्फशिखरे समोर सूर्यकिरणांत तळपत होती सोबत गगामैयाच्या प्रवाहाचा आवाज आणि यात्रेकरूंची वर्दळ.

## गंगोत्री दर्शन

येथील गगाजीचे मंदीराची व्यवस्था रावळ पाहतात. रावळ म्हणजे तीर्थस्थळाचे प्रमुख व्यवस्था पाहणारे. या मंदीराचे प्रमुख गुरू कमलेश्वरजी यांना विनती करण्यात आली होती की यात्रेकरूंना गंगाजीची जन्मकथा, गगाजीचे महत्त्व, गगास्थानाचे हिंदूंच्या आयुष्यातील स्थान, येथील स्थानमाहात्म्य याविषयी माहिती सांगावी

## गुरू कमलेश्वरजी

महतांचा पोषाख साधा होता दाढी वाढविली होती. केशकलाप विहरत होता अंगावर जाड वुलनचे कोट. कोटाच्या खालच्या दशा बाहेर आल्या होत्या त्याकडे त्यांचे लक्ष नव्हते. परतु डोळ्यात तेज होते पायात काही नव्हते. कपाळावर गध होते. प्रथम त्यांनी यात्रेकरूंचे स्वागत केले एवढे लाबवर आलांत तुमची यात्रेची मनोकामना सफल होवो अशी सदिच्छा व्यक्त केली

गुरू कमलेश्वरजी हे रावळ वशीय. रावळ वंशीयांची ही ६८वी पिढी वशपरंपरागत ते ही गादी चालवतात. त्याचेकडे अनेक ताम्रपट हस्तलिखिते इतर कागदपत्रे आहेत. त्याचा अभ्यास करून त्यांना येथे नेमले आहे.

**राजा भगीरथाचे प्रयत्न**

भगीरथ या नावाचा राजा होता. त्याने ५५०० वर्षे तप केले कोरडे सुके अन्न खाऊन. कशासाठी तर तेथे पाणी नव्हते. त्यामुळे दुष्काळ पडत होता. येथील प्रजेला/लोकाना निरतर पाणी मिळावे, धान्ये मिळावे, शेती फुलावी. त्याचे जीवन सुखी व्हावे. म्हणून कायमच्या पाण्याची व्यवस्था करणाऱ्या नदीचे पृथ्वीवर आणण्याचा वर द्यावा. त्यामुळे मानवाचे उदरभरण होईल. गुराना चारा मिळेल त्यामुळे भरपूर दूधदुभते मिळेल. विविध हरेभरे वृक्ष, वेली, फळे, फुले तिच्या कुशीत विसावतील. मोठी होतील. त्याना परत फळे येतील. परत जनन मरणाचा फेरा सुरू होईल. परत नवीन वृक्ष, लता, फुले, फळे याना बहर येईल. हे आनद चक्र सुरू होईल त्याच्या तपाला यश मिळाले. गगा नदी पृथ्वीतलावर आली. तिच्या स्नानाने आपल्या पूर्वजाचा उद्धार केला

**गंगेचे माहात्म्य**

गगेचे/भागीरथीचे माहात्म्य अनेक ग्रंथामध्ये वर्णन केले आहे पद्म पुराणात गंगा माहात्म्य सागितले आहे. तर स्कद पुराणामध्ये गंगेचा महिमा वर्णन केला आहे जगन्नाथ पडिताने श्री गंगालहरी हे ५३ श्लोकाचे काव्य लिहिले आहे वाल्मीकी कृत गगाष्टक प्रसिद्ध आहे. तर श्री गंगा चालीसा पण शिखानी लिहिला आहे गंगेच्या आरत्यामधून गगेचे माहात्म्य कळते या सर्व गोष्टी एकत्रितपणे "गगाजी की महिमा" सग्रह और सपादन रणधीणसिंह हरिद्वार, रणधीर बुक सेल्स (प्रकाशन) रु.१० या ग्रथात मिळते. हे पुस्तक हरिद्वार, गगोत्री येथे विकत मिळते. ते सर्व यात्रेकरूनी जरूर विकत घ्यावे

**तीर्थयात्रा का करावी ?**

**महंतांचा उपदेश**

गुरू कमलेश्वरजी यानी पुण्यक्षेत्रांना/तीर्थक्षेत्राना भेटी देऊन स्नान का करावयाचे याविषयी मार्मिक विवेचन केले हे विवेचन माझ्या मनावर बिंबले आहे माझ्या आयुष्यात अनेक प्राध्यापकांची, तत्वचितकाची नव्हे तर नोबेल पारितोषिक विजेत्या सशोधकाची पण व्याख्याने मी

ऐकली आहेत परंतु जीवनाचा हेतू काय? त्यात कर्म काय करावे आणि जीवनातील कर्मे कोणत्या निकषावर करावीत याचे थोडक्यात विवेचन त्यानी केले. हे विवेचन प्रत्येक भारतीयाने अत:करणावर कोरून ठेवावे वयाची ६० वर्षे पूर्ण केल्याने त्याचा गर्भितार्थ मनोमन कळला पटला इतराना सागावासा वाटतो म्हणून सागतो आहे

**१) कर्तव्य परायण होना।**

जीवनातील पहिले कर्म म्हणजे कर्तव्यपालन प्रत्येक व्यक्तीला पुरुष-स्त्री सामाजिक नाते असते Role असतो त्याचे भोवती समाज व त्यामधील लागेबांधे असतात या प्रत्येक नात्याचे एक कर्तव्य असते पती-पत्नी, माता-पिता, बंधू भगिनी ही कुटुंबातील नाती कुटुब या समाजाचा स्थायी घटक आहे कुटुब सुख, कुटुब स्वास्थ्य, कुटुंबवृद्धी, कुटुब परपरा ही प्रत्येक घटकाने आपल्याला जे कर्तव्य वाट्याला आले ते केल्याने होते/मिळते कर्तव्य हे कोणाला चुकले आहे? स्त्रीला स्वैपाक चुकला आहे का? पुरुषाला चरितार्थासाठी लागणारा पैसा आणण्याचे चुकले आहे का? विद्यार्थ्याला अभ्यास आणि गुरुजींना विद्यार्थ्यांना शिकवणे, मार्गदर्शन चुकले आहे का? कोणाला हे टाळता येत नाही मग जन्मवशात अथवा कर्मवशात आलेले कर्म, कर्तव्य मनापासून करावे त्यामध्ये जीव ओतावा मन ओतावे अंग चुकारपणा करू नये निवृत्त झालो म्हणजे काही काम करणार नाही ही कल्पना चुकीची आहे कर्तव्यपालनात काही वेळा चुका होतात. काही नकळत, काही समजून उमजून त्याची आठवण करावी आणि चुकाबद्दल प्रायश्चित्त घ्यावे गगेमध्ये स्नान केल्यामुळे हे प्रायश्चित्त मिळते त्याचा दोष जातो.

माझ्या आयुष्यात थोरला भाऊ हा रोल मला जन्मत: आला. माझ्या आधी एक मुलगी झाली होती परतु ती दीड वर्षाची झाली असता वारली. नतर मी, शांताराम, पाठची बहीण कुसुम नतर सुधाकर, सुरेश, रमेश ही भावडे वडील जुन्नर येथे कपौंडर म्हणून काम करीत होते नतर पुणे येथे आलो. १९३९ साली महायुद्ध सुरू झाले होते. महागाई वाढली होती त्यामुळे जमा खर्चाची तोंडमिळवणी होणे कठीण

होऊ लागले म्हणून आईने स्वस्तिक रबर प्रॉडक्टसमध्ये मजूर म्हणून काम केले. दिवसाला ४/५ आणे मिळत कामाची वेळ सकाळी ८ ते सायकाळी ५ काम करू लागली. म्हणून एस एस सी पर्यंतच शिक्षण घेऊ शकलो लगेच नोकरी शोधण्यासाठी वणवण हिंडू लागलो १५ ऑगस्ट १९४९ रोजी केसरी मराठा ग्रथशालेमध्ये नोकरी मिळाली. पगार ६१रु ४आणे वजा एक आणा रेव्हेन्यू स्टॅम्पचा. वडीलांना मदत करू लागलो. नतर धाकट्या बहिणीचे लग्न झाले (१९५३). तिच्या लग्नासाठी कर्ज काढून वडिलाना आधार देण्याचा प्रयत्न केला. परतु नोकरी करून शिकलो. १९५४ साली पुणे विद्यापीठामध्ये नोकरी मिळाली. शिकतच राहिलो. १९५८ साली विवाह झाला १९६२ साली वेगळा राहून माझा ससार स्वतंत्रपणे करू लागलो. नतर थोरला भाऊ म्हणूनच्या गोष्टी करता आल्या त्या केल्या. १९८२ साली वडील स्वर्गवासी झाले थोरला मुलगा म्हणून त्याना अग्नी दिला उत्तर कार्य केले. नंतर आई स्वर्गाघरी गेली. शेवटचे सहा महिने अथरूणावर होती परंतु तिची सेवा शुश्रुषा, कुरकुरत का होईना केली. विशेषत. रात्रीचे वेळी. माणसाला मृत्यू जवळ कसा करतो हे दिसले. परतु तिचे उत्तर कार्य करू शकलो नाही. कारण मी त्या दिवशी आजारी होतो म्हणून या यात्रेमध्ये बद्रीनाथ मुक्कामी वडिलाचे आणि आईचे पिंडदान केले. थोरल्या मुलाचे कर्तव्य मी केले. कर्तव्यपालनाचा हा अर्थ आहे. असावा

त्रियुगीनारायण येथे पितराना तर्पण केले पितर सुखी होवोत. त्यांची कृपादृष्टी आमच्यावर व पुढील पिढीवर होवो अशी प्रार्थना केली.

२) प्रायश्चित्त :-

दुसरा भाग म्हणजे पापाचे प्रायश्चित्त घेणे. कर्तव्य करताना माणूस चुकतो - काही अजाणता काही जाणून-बुजून. यालाच धर्मामध्ये पाप असे म्हटले आहे. पाप म्हणजे वाईट गोष्ट. आपल्या गत जीवनातील कार्याचा आढावा, तपासणी तीर्थक्षेत्री येताना करावयाची असते. "विचारी मना तूची शोधूनी पाहे" असे समर्थ रामदास म्हणतात. हे स्वयंमूल्याकन आहे. सेल्फ असेसमेंट आहे विचारी मना मधील 'विचारी' हे 'मना'चे

विशेषण आहे Rational mind. हे विचार-बुद्धीला आवाहन आहे काही वेळा विचार करताना त्यात विकार येतात हे विकार गाळून विचार कर 'तूची शोधून पाहे' स्वतःच शोध घे. आपण चुका करतो त्या इतर आपल्याला दाखवतात आपण केलेल्या चुकाबद्दल इतर दोष देत असतात काही वेळा आपल्याला ते पटते परंतु बऱ्याच वेळा पटत नाही कारण मनाचा अहंभाव तेथे आडवा येतो. प्रत्येक गोष्टीला किमान दोन बाजू असतात. हे आपण लक्षात घेत नाही. आपलेच बरोबर, इतरांचे चूक ही आपण मनाची भावना ठेवतो. परंतु इतर म्हणतात त्यात काहीतरी तथ्य आहे आपलेच चुकले ही कबुली देणे फार अवघड असते ही चुकीची कबुली देणे म्हणजे प्रायश्चित्त.

**प्रायश्चित्त म्हणजे सुधारण्याची संधी.** स्वतःच्या चुकांबद्दल ज्ञान होणे हे फार महत्त्वाचे असते. यापुढे अशा चुका मी करणार नाही. निदान चुका टाळण्याचा मी प्रयत्न करीन ही संकल्पना, हा निर्धार त्यामधून साकार होतो. ४०/४५ मैल भैरवघाटीच्या डोंगरामधून विविध वळणे घेत 'पत्थर गिरनेका भय है' अशा पाट्या वाचून प्रवास करताना, निसर्गाचे रौद्र स्वरूप आणि मनोहारी स्वरूप आणि या वातावरणातील मानवाचे क्षुद्रपण लक्षात घेऊन प्रत्येक माणसाने हे स्वयमूल्यांकन करावे अशी कल्पना आहे. ही कबूली आपण कोणासमोर देतो? एखाद्या न्यायाधीशासमोर, दंडाधिकाऱ्यासमोर, देत नाही. क्षमाशील, पापे पोटात घालणारी लोकमाता गंगामैयेच्या समोर. ही पापे या पुण्यजलाने नाहीशी होतात. अनेक लोकांची पापे पोटात घेऊन गंगा मैयाचा प्रवाह शुद्ध, निर्मळ संथ वाहतच राहिला आहे हे आम्हा भारतवासीयांचे महत्भाग्य आहे ख्रिस्ती धर्मात ख्रिस्ती धर्मवासी आपल्या धर्मगुरुंपुढे पापाची कबुली देतो असे म्हणतात तरीसुद्धा धर्मगुरू माणूस आहे तो त्या पापाचा उच्चार दुसऱ्याकडे करणार नाही कशावरून? त्याचा गैरफायदा घेणार नाही कशावरून? असा संशय येतोच परंतु हिंदूधर्मात मात्र ज्याच्यासमोर कबुली द्यावयाची ती गंगामैया या शंकेच्या पलीकडली आहे. हे हिंदुधर्माचे वैशिष्ट्य आहे

### ३) पापबुद्धी विनाशाय

प्रायश्चित्त घेताना आपण पाप काय केले याचा विचार करतो. परतु पाप का निर्माण होते? प्रथम पाप बुद्धी निर्माण होते. त्याचे फळ म्हणजे पाप कर्म. आपण खोटे बोलावे, याला फसवावे, लपवावे, कोणाकडून लाच घ्यावी, भ्रष्टाचार करावा, अगचुकारपणा करावा अशी पापबुद्धी निर्माण होते त्याची निष्पत्ती म्हणजे भ्रष्टाचार करणे, लाच घेणं, खोटे बोलणे, एवढेच नव्हे तर खून करणे ही पाप कर्मे होत. ही पापबुद्धी नष्ट होवो अशी प्रार्थना यावेळी करावयाची असते भारतामध्ये आपण पाहतो की भ्रष्टाचार बोकाळला आहे. अतिरेकी निरपराध लोकाचा रोज बळी घेत आहेत आणि अनेकाचा ससार उध्वस्त करीत आहेत सुनेला पैशासाठी जिवंत जाळणे चालू आहे. तर भाडणामुळे कोर्ट कचेऱ्यामध्ये हजारो नव्हे लाखो खटले वर्षानुवर्षे पडले आहेत हे सर्व पापबुद्धीचे फळ आहे ही पापबुद्धी निदान कमी झाली तरी समाजाला स्वास्थ्य लाभेल समाधान नांदेल. दोन जमातींमध्ये सलोखा राहील पापबुद्धी विनाशाय मी गंगास्नान करतो खरे म्हटले तर ही प्रतिज्ञा आहे भविष्यामधील वागणुकीसबधीची मनोमन चागल्या वर्तनाची ही घाण स्वच्छ करण्याचे साधन म्हणजे ही पवित्र, पुण्यदायी, मोक्षदायिनी गंगामैया अशा अनेक पापाना पोटात घेण्याची, या सर्वांना साभाळून आणि सामावून घेण्याची क्षमता गगामैयामध्ये आहे. असे असले तरी गगेचा प्रवाह गढूळ होत नाही. तो आपला शुद्ध पवित्रच. पापी लोकाना पवित्र करण्याची किमया या गगा प्रवाहात आहे श्री शिवशकरानी अमृत मथनामध्ये जे विष निर्माण झाले ते प्राशन केले तसेच हे विष प्राशन करण्याचे सामर्थ्य असणारी गंगा मैया आहे

पापबुद्धी आणि संस्कार, धार्मिक आचरण याचा फार सबध आहे धार्मिक परपरा, नीती अनीतीच्या कल्पना, सत्, असत्, पाप, पुण्य या कल्पनाचा उगम धर्मामध्ये आढळतो. भारताला अशा शुद्ध सात्त्विक विचाराचा ऋषी मुनी, तपस्वी याचा वारसा आहे. त्याचे स्मरण यावेळी होते. त्याचे स्मरण करून जीवनात पावित्र्य राखावे हा संदेश गंगामैयाच्या

थड प्रवाहात स्नान करताना प्रत्येक यात्रेकरूला देत असते

पापबुद्धीचे मित्र म्हणजे काम, क्रोध, राग, लोभ, मद, मत्सर हे षड्रिपु यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक होय. ही शिकवण या यात्रेमध्ये मिळते याचे शिक्षण व प्रत्यक्ष कार्यानुभव यात्रेमुळे मिळतो 'सर्वांचे चागले होवो' ही सदिच्छा मनात बाळगावी

सर्वेत्र सुखिन· सन्तु
सर्वे सन्तु निरामया· ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा काश्चत् दुःखम् आप्नुयात ॥

या संस्कृत श्लोकामध्ये ही भारतीयांची परपरा सामावलेली आहे

**४) दूसरोंपर उपकार करना : परोपकार**

या यात्रेचे काही संदेश आहेत मानवाने दुसऱ्यावर उपकार करावा. पर + उपकार परोपकारार्थ सता विभूतय असे म्हटले आहे राजा भगीरथाने उग्र तप करून मानवजातीसाठी सतत पाण्याचा पुरवठा करणारी, त्यामुळे समृद्ध शेती, वने, फुले, फळे ही बनसपदा देणारी, त्यावर सुखाने राहणारी प्राणीसृष्टी त्याचे जनन मरण हे चक्र पुष्ठ करणारी गगा, अवनी तळावर आणली नद्या या लोकमाता होत अनेक वर्षे सातत्याने भारतामधील लक्षावधी लोकांना जीवनदान देण्याचा उपक्रम त्या करीत आहेत कोणत्या फळाच्या अपेक्षेने? जगात गरीब, श्रीमत, दु खी, कष्टा, अपग, निराधार, अज्ञानी, निरक्षर अनेक लोक आहेत. त्यांना मदत करणे हे प्रत्येक सुखी, सज्ञानी, सुशिक्षित, सुस्थितीतील माणसाचे कर्तव्य होय. जीवन यात्रेमधील हे सहप्रवासी आहेत व्यक्ती आहेत, सस्था आहेत, सघटना आहेत तसेच राष्ट्रेही पण आहेत त्यांना मदत करा हा संदेश ही गंगामाता देते यमुनामैया देते ज्याप्रमाणे आपल्याजवळ असलेले ज्ञान दुसऱ्याला दिल्यास संपत नाही त्याचप्रमाणे दुसऱ्यावर उपकार केल्यास आपले वाईट होत नाही आपल्याकडचे सपत नाही दिल्याने वाढते अशी समजूत आहे माणसाला माणूसकीचा आधार देऊ या हा सदेश सर्वदूर पसरवू या धर्म, जात या गोष्टी मानवाने निर्माण केलेल्या आहेत. आपले कर्म करताना दुसऱ्याचा,

शेजाऱ्याचा विचार करावा ही शिकवण महत्त्वाची सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा यामुळे मिळते

### ५) दान

पुण्यक्षेत्री दान करावे असा पुढचा संदेश. याचा अर्थ मानवाने थोडे थोडे करून मिळवावे त्याचा उपयोगही स्वत:साठी करावा. तसा दुसऱ्यासाठीही करावा. मिळालेले सर्व खर्चू नये. थोडे शिल्लक ठेवावे.

आयुष्यातील जमाखर्चामध्ये तीन बाबी असाव्या प्रथम जमा. त्यातून खर्च आणि त्यामधून श्रीशिल्लक ठेवावी सर्व मिळवलेले उधळू नये या श्रीशिल्लकेतून समाजातील सत्पात्र व्यक्तींना, गुरूजनाना, ऋषीमुनींना, तपस्व्याला त्यांचे आश्रमाना, सस्थाना, उपक्रमांना साहाय्य करावे हल्लीचे जग अनुदानाचे आहे परतु त्याचा विनियोग नीटपणे होत नाही.

बाबा काली कमदीवाले यानी यात्रेकरूच्या सोयीसाठी लोकांकडून पैसा जमा करून अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळा स्थापल्या आहेत अनेक ठिकाणी यात्रेकरूना नि.शुल्क सेवा दिली जाते. अशा अनेक सस्था, उपक्रम समाजासाठी आवश्यक असतात यामध्ये समर्थ माणसानी आपल्या शक्तीनुसार भाग घ्यावयास हवा

मार्क्सने म्हटले आहे. To each according to his needs, but every body should contribute, produce/according to his ability

शिवाय आपण जे मिळवतो ते आपल्यासाठीच आहे ही कल्पना संकुचित आहे. ज्या समाजाने आपल्याला दिले त्या समाजाला काही परत द्यावयास हवे हा संदेश ही यात्रा देते. दान देताना ज्यास दान द्यावयाचे त्याचेकडून काही अपेक्षा करावयाची नसते. अर्थात् ते सत्पात्री द्यावे ही काळजी घ्यावयास हवी

### ६) संकल्प, प्रतिज्ञा करो

तीर्थक्षेत्री प्रत्येक यात्रेकरूनी संकल्प करावयाचे असतात अनेक यात्रेकरू आपली आवडती भाजी, फळे, खाण्याची वस्तू वगैरे सोडतात. परंतु मला हा अर्थ पटत नाही.

सकल्प कसला करायचा मी जी पापे केली तसली पापे परत

करणार नाही हा निश्चय करावा दुसरे मागणे मला पापबुद्धी देऊ नको कर्तव्य पालनात चुका होऊ नये आणि आयुष्यात परोपकार घडावा ही इच्छा मनात बाळगावी. आयुष्यात दान करीन ही महत्त्वाकांक्षा बाळगावी. परतु सकल्प एखाद्या नवीन कामाचा, उपक्रमाचा - ज्यामुळे समाजहित साधेल आणि राष्ट्रहितही साधेल

मला वाटते आपण सर्वांनी भारतमातेच्या सौभाग्य राखण्याचा संकल्प करावा. भारतमातेचे सौभाग्य म्हणजे तिचे स्वातत्र्य हे स्वातत्र्य टिकविणे भारत हे जगातील अग्रेसर राष्ट्र म्हणून गणले जावे यासाठी झटण्याचा सकल्प करावा हा संकल्प सहसा कोणी करीत नाही

राग, लोभ, मद, मोह, मत्सर हे घराघरामध्ये असतातच परतु ते ज्यावेळी समाजातील विविध गटात प्रसृत होतात त्यावेळी दगली होतात, आगी लागतात, खून होतात आणि समाजातील विविध गटात वैमनस्य निर्माण होते. यामुळे भारत माता दुर्बल बनते

धर्माधर्मांचे राजकारण वाईट या भारतमातेची एकात्मता कायम राखण्यासाठी हे राग, लोभ, मद, मोह, मत्सर कोण बाजूला ठेवणार? भ्रष्टाचार कोण निपटणार? प्रदूषण कोण रोखणार? परकीय मदतीमुळे येणारे मिंध्यापण कोण रोखणार? आपल्या पायावर आपण केव्हा उभे राहणार? याची चिंता कोण करणार? यासाठी निस्वार्थी बुद्धीने राष्ट्रमातेची पूजा करणारे स्वयंसेवक - कृत सकल्प - पुरुष-स्त्री, आबाल-वृद्ध हवेत त्याची संघटना बाधू या हा विचार तळागाळात पसरवू या

हा सकल्पाचा संदेश ही तीर्थयात्रा देते

## ७) संकल्प आणि सिद्धी

सकल्प केला की तो सिद्धीस नेण्यासाठी कष्ट करावे लागतात योजना करावी लागते अर्थसहाय्य जमा करावे लागते निरलसपणे काम करणारे, मार्गदर्शन करणारे नेतृत्व लागते. अडीअडचणीतून मार्ग काढावा लागतो मार्गामध्ये अनेक मोह हातात हात घालून उभे असतात. त्याना बाजूस सारून ध्येयाप्रत जायचे अशी ही बिकट वाट आहे परतु यात्रिकाने हा सकल्प करावा असे मी म्हणेन आणि संकल्प सिद्धीचा आढावा घेण्यासाठी २/४ वर्षांनी परत तीर्थस्थानी यावे हा

कार्यक्रम आजन्ममरण चालावा ही तीर्थयात्रेमागची प्रेरणा आहे. निदान मला समजली आहे. ती मी आपणापुढे माडतो.

**सत्प्रवृत्तीची वाढ**

हा सर्व उहापोह कशासाठी? तर जगामध्ये दोन प्रवृत्ती असतात सत् प्रवृत्ती आणि असत् अथवा अपप्रवृत्ती. काही जण याला देव प्रवृत्ती आणि राक्षसी प्रवृत्ती म्हणतात. म्हणून पूर्वी देव व दानव, सुर आणि असुर यांच्यात सतत भाडणे, युद्धे होत असत. शेवटी दानवी प्रवृत्तीचा संहार होतो त्यासाठी परमेश्वर निरनिराळी रूपे, अवतार धारण करतो. सत् प्रवृत्तीची वाढ मानवाला सुख, शाती, समाधान देण्यासाठी आवश्यक असते. ही सतप्रवृत्तीवाढ करण्याचे कार्य तीर्थक्षेत्रे पुण्यक्षेत्रे करतात म्हणून येथे येणाऱ्या संत महताची कीर्तने, प्रवचने, सहवास निदान दर्शन सहवास तरी घ्यावयाचे असते

समाजामध्ये ही देव प्रवृत्ती व दानव प्रवृत्ती यामधील (बॅलेन्स) तोल साभाळावयास हवा. अन्यथा विनाश होईल. म्हणून तीर्थयात्रा करावयाची. गुरु कमलेश्वरजी विवेचन करीत होते. पुढे ते म्हणाले, ''गगेत स्नान केले म्हणजे सर्व पापे नष्ट होतात असे सर्वजण सांगतात. याचा अर्थ खूप पापे करा, गगेत जा, स्नान करा, मग परत पापे करण्यास मोकळा हा काही पापे करण्याचा परवाना/परमिट नाही. असेही त्यानी सांगितले अनेक यात्रेकरूना हा संदेश कळत नाही म्हणून मी सकल्प केला की हा सदेश मी व्याख्याने, लेख, ग्रंथद्वारा उर्वरित आयुष्यात करून देईन

**गंगास्नान :-**

गुरु कमलेश्वरजी यांचा हा प्रभावी संदेश ऐकून आम्ही भागीरथी तीरावर स्नानासाठी गेलो. तेथे भटजी होते पतिपत्नींनी प्रथम गगेची पूजा केली मत्र म्हटले आणि पूर्वजाचे स्मरण केले आणि गगा स्नान केले

गगेचे पाणी पाढरे आहे गढूळ आहे. हिमालयामधून हे पाणी वाहते आहे. मध्ये पांढरे दगड गोटे आहेत ते ठिसूळ आहेत पाण्याच्या घर्षणामुळे त्यांचा वरचा थर निघतो. दगडगोट्याची पांढरी बारीक रेती

मिश्रित हे पाणी असते बर्फाचे हे पाणी आहे. त्यामुळे ते थड आहे मनात भीती होती की या थंड पाण्यामध्ये अघोळ केल्यास आपल्यास सर्दी-थंडी-पडसे होणार का? फार थंडी असल्यास स्नान करू नये असा सल्लाही देण्यात आला होता परंतु इतक्या जवळ आल्यावर स्नान न करणे करटेपणाचेच लक्षण मानावे लागेल

निश्चय केला बादली घेतली. गंगेच्या प्रवाहातील पाणी त्यात घेतले आणि डोळे मिटून गगेचे नाव घेऊन डोक्यावर ओतली आणि मग दोन-तीन बादल्या भडाभड अगावर घेतल्या आणि सर्व भीती गेली थडी गेली. परत अगावर पाणी घ्यावेसे वाटत होते. परतु हा मोह बाजूला ठेवला आणखी बादल्या भरून पत्नीचे अंगावर ओतल्या तिची पण भीती गेली पती पत्नीचे गगास्नान झाले होते सूर्याला वदन केल. कृतकृत्य झाले असे वाटत होते.

त्यानतर प्लॅस्टिकचे कटेनरमध्ये गंगाजल घेतले आणि त्या गगाजलाची सपत्नीक पूजा केली गगेस अर्घ्य दिला.

गगास्नान केल्यावर अनेक मातांनी नवीन साड्या परिधान केल्या होत्या

**भगीरथ शीला**

त्यानतर भगीरथ शीलेचे दर्शन घेतले. राजा भगीरथाच्या उग्र तपश्चर्येमुळे भागीरथी गंगा पृथ्वीवर आली राजा भगीरथाने येथे येऊन गंगेची पूजा केली असे सागतात त्या शीलेचे पूजन करून आम्ही गगाजीचे मदिरात दर्शनास गेलो. दर्शनास थोडी गर्दी होती रागेत यात्रेकरू जात होते दर्शन करीत होते प्रवेशद्वारी गुरू कमलेश्वरजी होते

**गंगाजीचे मंदीर**

गगाजीचे मदीर पुरातन आहे भगवान आद्य शकराचार्यांनी येथे स्नान करून गगोत्री-मदीराची प्रतिष्ठापना केली दगडी जोते उचावर आहे समोर मडप आहे मंदीराला प्रवेशद्वार छोटे आहे परंतु तेथून गाभाऱ्यातील मूर्ती छानपणे दिसतात. या मदीराचा जीर्णोद्धार अमरसिह थापा यानी केला तेथे गगा पचायतनाच्या मूर्ती होत्या त्यावर वस्त्रे, प्रावरणे, अलकार घातलेले होते

गंगाजीचे मंदीरात एकूण सात मूर्ती आहेत मध्यभागी सिंहासनस्थ भागीरथी गंगाजीची मूर्ती आहे याशिवाय लक्ष्मीजी, अन्नपूर्णाजी, सरस्वती, भगीरथ, यमुना, जान्हवी याच्या मूर्ती आहेत श्री दुर्गाजींची मूर्ती पण आहे. याला गंगा प्रतिष्ठान पंचायतन म्हणतात मदीराचे बाहेर श्री गणेशजीचे मंदीर आहे. पूजेचे सर्व सामान सोन्याचे आहे.

या मदीरातले पुजारीपण रावळ घराण्याकडे आहे रावळ कुटुबियाविषयी पतप्रधानाना तसेच राष्ट्रपतींना आपुलकी आहे त्याचे महत्त्व असाधारण आहे

याविषयी अशोकजींनी एक प्रसग सांगितला. १९९१ साली उत्तर काशी येथे भूकंप झाला त्यात पूल कोसळले होते, दरडी कोसळल्या आणि त्यामुळे रस्ते बद झाले. वाहतूक थांबली अनेक माणसे मृत्युमुखी पडली अनेक जखमी झाले हाते. यांना साहाय्य करण्यासाठी राष्ट्रपतीकडे, पंतप्रधानाकडे लोकानी धाव घेतली.

सैन्याने प्रथम जे मृत झाले त्याची प्रेते डेहराडून येथे नेण्याचा प्रस्ताव माडला आणि मदतकार्य सुरू केले. परतु पतप्रधानांनी रावळ कुटुबियाकडे विचारणा केली. त्यानी सांगितले, 'जे मेले ते मेले. त्याना बाहेर काढण्यात वेळ घालवू नका. येथे हजारो यात्रेकरू बसेसमध्ये अडकून पडले आहेत. त्याची आधी सुटका करा. त्याना डेहराडून येथे हेलिकॉप्टरने पोचवा भारतातल्या सर्व भागातून हे यात्रेकरू आले होते. त्यांच्या चौकशीविषयी फोन खणखणत होते. रावळ कुटुबियाचा सल्ला मानून सैन्याने जिवत यात्रेकरूची सुटका केली. रावळ याचे महत्त्व राष्ट्रपती आणि पतप्रधानांनी ओळखले आहे

## निसर्गसौंदर्याच्या राशी

स्वामी अखंडानदाना आलेला अनुभव त्याच्याच शब्दात वाचा. ते म्हणतात, ''मी गगोत्रीचे वाटेने जसजसा पुढे जात होतो तसतसे हिमालयाचे ते विराट अपरुप सौंदर्य माझ्या दृष्टीसमोर उलगडत होते समोर तोच बर्फ पाघरलेला कासवाच्या पाठीप्रमाणे फुगीर दिसणारा प्रचड पर्वत, ह्याच पर्वतावरून त्रिभुवनपावनी भागीरथी, नागमोडी वळणे घेत व कानठळ्या बसतील इतक्या मोठ्याने 'हर हर' असा निनाद

करीत आपल्या फेनधवल प्रवाहरूपाने मर्त्यलोकी अवतरली आहे. गगोत्रीला गगा मैय्याचा प्रवाह आहे बारीक, पण त्याला ओढ इतकी की शंभर ऐरावताना देखील क्षणात फरफटत नेईल गगामाईचा तो पाढराफेक पवित्र प्रवाह असख्य जीवाच्या उद्धाराच्या उत्कठेनेच जणु कुठेच न खोळबता इतक्या द्रुतगतीने उद्दाम नृत्याच्या तालाने भूलोकी प्रवेश करीत आहे. भागीरथीच्या दोन्ही तीरावरील उत्तुग पर्वतराजीचा वरील भाग बर्फाच्या मोठमोठ्या ढिगाऱ्याखाली झाकला आहे तर खालचा भाग गडद हिरव्या देवदार वृक्षाच्या अधोवस्त्रात लपेटलेला आहे. प्रवाहाच्या दोन्ही बाजूला पांढरे शुभ्र व गुळगुळीत शीलाखड वेदिकेप्रमाणे आपोआप रचल्यासारखे आढळतात ते अत्यंत सुदर दिसतात सभोवार पसरलेल्या प्राकृतिक सौंदर्याच्या राशीच्या राशी पाहून देहभान विसरून गेलो . सारे डोळे भरभरून पाहायचे असे ठरवून कितीतरी ठिकाणी पुन. पुन बसून मी त्या निसर्गसौंदर्याचे आकठ पान केले

**गंगोत्रीचा परिसर**

स्वच्छ उन पडले होते मंदीराचे समोर आम्ही जमलो अथर्वशीर्ष म्हटले आणि फोटो काढले. या मदीराचे उजव्या बाजूला भगीरथ शीला आहे. त्या पलीकडे गगेचा प्रवाह, प्रवाहावर पूल आणि समोर हिमशिखरे त्यांना सलामी देत आहेत देवदार वृक्षांनी सभारलेले पर्वत दोन्ही बाजूंना विलक्षण मोहक दृश्य होते त्यातील एका पर्वत रागेमध्ये गौमुख ग्लेशियरचे तोंड गोमुखासारखे आहे म्हणून त्यात गौमुख म्हणतात. तेथपर्यंत जाणे कठीण आहे. मार्ग दुर्गम आहे म्हणून आता गगोत्रीपर्यंत अनेक यात्रेकरू जातात या पर्वतशिखरांना नम्रभावे नमस्कार केला सतत बर्फाच्या पुरवठ्यामुळे सतत पाणी वाहते हे निसर्गाचे देणे मानवनिर्मित प्रयत्नाचे पलीकडचे आहे. या पर्वताचे ऋण मानावेत कारण त्यानी लाखो लोकाचे जीनव समृद्ध करणाऱ्या गंगामातेला जन्म दिला आहे

या मदीराशेजारी आणखी मदीरे आहेत श्रीगणेशजीचे मदीर आहे त्याना नमस्कार करून आम्ही परत निघालो. वाटेत विविध दुकाने आहेत तेथून पुस्तके विकत घेतली. गंगाजल ठेवण्याचे गडू घेतले. फोटो फ्रेम्स घेतल्या. आणि गाडीत बसलो 'गगा मैया की जय'

ही आरोळी सर्वांनी जोरात दिली

**परत येण्याची आस: मागे परतूनी पाहे**

मनात आनंदाश्रू होते. ही यात्रा पुरी झाली वाटत होते. आपण परत गंगा मैयाचे दर्शन करण्यासाठी यावे. परत मन म्हणत होते. परत येता येईल का नाही सांगता येत नाही आताच डोळे भरून पाहा बापड्या मागे वळून हा प्रदेश परत परत पाहत होतो. सासरी जाणाऱ्या मुलीकडे आई ज्या नजरेने पाहत असते त्या नजरेने मागे वळून पाहत होतो गंगोत्री ते भैरवघाटी २० मिनिटाचा रस्ता समोर मोठाले देवदार व चीड वृक्ष, मध्ये गंगेचा प्रवाह आणि पर्वताचे कडेकडेने वळणे घेत जाणारी आमची बस मध्ये काही पाण्याचे झरने, एखाद दुसरा पूल

परंतु मनामध्ये मात्र गंगा मैयाची आरती म्हणत होतो

आरती श्री गंगाजी की

ओम् जय गंगे माता। श्री जय गंगे माता।
जो नर तुमको ध्याता। मनवांछित फल पाता।
ओम जय गंगे माता॥१॥

चन्द्रसी ज्योती तुम्हारी। जल निर्मल आता।
शरण पडे जो तेरी। सो नर तर जाता।
ओम् जय गंगे माता॥२॥

पुत्र सगर के तारे। सब जग को ज्ञाता।
कृपा दृष्टी तुम्हारी। त्रिभुवन सुख दाता।
ओम् जय गंगे माता॥३॥

एकही बार जो तेरी। शरणागति आता।
यम की त्रास मिटाकर। परम गति पाता।
ओम् जय गंगे माता॥४॥

आरती मातृ तुम्हारी। जो जन नित्य गाता।
दास वही सहज मे। मुक्ति को पाता।
ओम् जय गंगे माता॥५॥

बोलो श्री गगा मैया की जय।

(टीप :- ही आरती श्री गंगाजीचे मंदीरासमोर एक मदीर आहे त्याचे भितीवर लावली आहे.)

मनामध्ये गंगेचे ध्यान केले

ओम् नमामि गगे तव पाद पकजं।
सुरा सुरैर् वन्दित दिव्य रुपम्॥
भुक्तिं च मुक्तिं च ददासि नित्यम्।
भावानुसारेण सदा नराणाम्॥

**भैरवघाटीला परत**

जिथे शिवशंकर तेथे कालभैरवाचे स्थान, निवास असणारच त्या भैरवाचे मदीरात दर्शन घेतले घटानाद केला. खरे म्हणले तर प्रथम कालभैरवाचे दर्शन घ्यावयाचे. नंतर गगोत्रीला जावयाचे. परंतु हा क्रम चुकला होता त्याचे साम्राज्य या भूमीवर आहे. त्याची परवानगी घेऊन म्हणजे त्याला वंदन करून या भूमीवर पाय ठेवायचा असतो. विहार करायचा असतो.

आकाशात पाहिले. ढग जमा होत होते अशोकजी म्हणाले आता पाऊस पडणार लवकर आवरा जेवणे आटोपली. आता दोन यात्रा पूर्ण झाल्या. निम्मा भाग पूर्ण झाला म्हणून आंबरसाचे जेवण केले होते सेवक आग्रह करकरून आंबरस वाढत होते. परतु सर्वांनी नंतरचा प्रवास लक्षात घेऊन जिभेवर नियंत्रण ठेवले होते पुरी, पोळी, वरण, भात, कोशिबीर, भाजी, छान बेत होता. सामानाची बाधाबाध केली. बसच्या टपावर सामान चढविले आणि परत गगा मैया की जय हा जयजयकार करून त्या पवित्र भूमीचा निरोप घेऊन आम्ही उताराला लागलो. एखादी कामना पूर्ण झाली अथवा कार्य पुरे केल्यावर मनात मोकळीक वाटते तसेच वाटत होते गगामैयाबरोबर केदारनाथजीचा जयजयकार केला. चलो केदारनाथ गाडी धावू लागली

**गंगा :**

गंगा नदी विषयी आपण थोडी माहिती घेऊ या भारतातील नद्यांचे पुढीलप्रमाणे दोन गट पडतात १) हिमालयात उगम पावणाऱ्या नद्या

आणि २) भारतीय पठारी प्रदेशातील नद्या. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांपैकी गगा ही भारतातील सर्वात मोठी नदी आहे. तिची लांबी १५१० कि. मी आहे गंगेचा उगम कुमाऊं भागात गगोत्री ह्या हिमनदीतून होतो. तिची लांबी ३० कि. मी. व रुंदी ३ कि मी आहे.

गगा नदी उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बगाल या राज्यातून वाहते व शेवटी बगालच्या उपसागरास मिळते जलवाहन क्षेत्र ८,३८,२०० चौरस किलोमीटर म्हणजे भारताच्या क्षेत्रफळाचा चौथा हिस्सा यमुना, शोण, गोमती व कोसी इत्यादि तिच्या उपनद्या आहेत

गगा व तिच्या उपनद्यामुळे सखल, सुपीक, विशाल मैदान तयार झाले आहे. जगातील सर्वात विस्तीर्ण ५८७५२ चौ किमीचा त्रिभुज प्रदेश तयार झाला आहे. हिमालयात आणखी दोन महानद्या उगम पावतात तिबेटमध्ये मान सरोवराजवळ सिंधू नदी उगम पावते ती जम्मू काश्मीर राज्यातून वाहते पुढे पाकिस्तानात प्रवेश करते झेलम, चिनाब, रावी, बियास, सतलज या प्रमुख उपनद्या होत मान सरोवराजवळील हिमनदीतून ब्रह्मपुत्रा नदीचा उगम होतो. आसाम राज्यातून वाहते. ती पुढे बागला देशात गगा नदीला मिळते. गगोत्रीपासून तिला भागीरथी गगा असे म्हणतात त्यापुढे देव प्रयाग येथे गगा हे नाव धारण केले आहे

गगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्याचा संगम प्रयाग (अलाहाबाद) येथे होतो. त्यास मोठा प्रयाग अथवा प्रयागराज म्हणतात याशिवाय अनेक सगम गंगेशी इतर नद्याचे झाले आहेत

**गंगा ॲक्शन प्लॅन**

गगेमध्ये अनेक यात्रेकरू स्नान करून पाणी घाण करतात तसेच त्यामध्ये अनेक शहराची घाण, मलमूत्र, काही कारखान्यांचे प्रदूषित पाणी, साखर कारखान्याची मळी इत्यादी सोडतात. त्यामुळे प्रदूषण वाढले आहे म्हणून राजीव गांधी यानी त्यांच्या कारकीर्दीत गंगा व इतर नद्या स्वच्छता मोहीम आखली त्याला गगा ॲक्शन प्लॅन म्हणतात याची कार्यवाही भारत सरकारचे पर्यावरण मंत्रालय करते.

### गंगावतरण कथा

गगोत्रीला आपण पूर्व दिशेला तोंड करून उभे राहिल्यानतर जो पर्वत दिसतो तो श्रीकठ पर्वत होय. तो सदैव हिमाच्छादित असतो. त्यावर आपल्या शापदग्ध पितराचा उद्धार व्हावा म्हणून राजा भगीरथाने गगा प्राप्तीकरिता उग्र तपश्चर्या केली त्याची कथा उद्बोधक आहे.

राजा सगर नावाचा एक सूर्यवशातील सम्राट होऊन गेला त्याला होत्या दोन राण्या वेदमी आणि शैव्या शैव्याचा पुत्र होता असमन्जस नावाचा दुसरी राणी वेदमी पुत्र होण्यासाठी तिने भगवान शकराची उपासना केली शकराचे वरदानाने तिला गर्भ राहिला शभर वर्षांनी तिच्या गर्भातून मासाचा गोळा बाहेर आला ती फार दु खी झाली. परत तिने शंकराची प्रार्थना केली शिवजी ब्राह्मणरुपाने तिच्याकडे गेले आणि त्याने मासाचा गोळ्याचे साठ हजार भाग केले या सर्व भागाचे रुपांतर पुत्रामध्ये झाले

नंतर सगर राजाने शभर अश्वमेध यज्ञ करण्याचे ठरविले शंभरावा यज्ञ चालू होता. तो यज्ञ पूर्ण झाला असता तर इन्द्रासन गेले असते म्हणून इद्राने अश्वमेघाचे घोडे कपिल मुनींच्या आश्रमामध्ये बांधले त्याचे कारण म्हणजे ऋषींच्या शापानेच सगर राजा नष्ट झाला असता कपिल मुनी सर्वश्रेष्ठ मुनी मानले जात त्याचे तेज सहन करण्याचे सामर्थ्य कोणत्याही राजामध्ये नव्हते. सगर राजाचे साठ हजार पुत्र घोड्याचा शोध घेत घेत कपिल मुनींच्या आश्रमात आले. घोडे पाहिल्यावर त्याना आनद झाला. परतु त्याचे हातून एक चूक घडली. मुनींना प्रणाम न करता त्याची परवानगी न घेता ते घोडे घेण्यासाठी गेले कपिल मुनींचा अनादर झाला म्हणून त्यांना राग आला त्याच्या क्रोधाने साठ हजार पुत्र भस्म झाले हा समाचार ऐकून राजा सगर कष्टी झाला ते जगलात गेले आपल्या भावांसाठी असमजस ने तपस्या केली. परतु ती फलद्रूप झाली नाही आणि मरण पावला असंमंजसाचा पुत्र अशुमान त्याने कपिल मुनींची सेवा करून अश्वमेघातील घोड्याला परत आणले त्यामुळे सगर राजाचा यज्ञ पूर्ण झाला.

परतु साठ हजार पुत्र जे भस्म झाले ते मुक्त झाले नाहीत कपिल

मुनींना त्याने विचारले. राजपुत्राच्या मुक्तीचा उपाय सांगा मुनींनी सांगितले ज्या वेळी गंगाजी पृथ्वीवर येईल त्यावेळी त्याचा उद्धार होईल अंशुमानाने प्रयत्न केले अंशुमानाचा पुत्र दिलीप यानेही प्रयत्न केले पण ते असफल झाले. दिलीप राजाचा मुलगा भगीरथ याने तपस्या करून भगवान शंकराला प्रसन्न केले. माझ्या पूर्वजांना मुक्ती द्या म्हणून विनती केली.

गंगा स्वर्गात होती. भगवानांनी गंगेला सांगितले हे सुरेश्वरी, तू आता भारतवर्षामध्ये जा आणि माझ्या आज्ञेनुसार सगराचे सर्व साठ हजार पुत्रांना जीवदान दे तेव्हा गंगाजीने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले गंगा पृथ्वीवर यावयास निघाली पण तिचा वेग भयंकर होता त्यामुळे पृथ्वी भंग पावली असती म्हणून शंकराने गंगावतरणाचा भार आपल्या मस्तकी धारण केला. यासाठी शंकराला गंगाधर म्हणतात परंतु शंकराच्या जटात गंगा गडप झाली परत भगीरथाने तप केले गंगा जटेमधून बाहेर पडली आणि भगीरथाचे मागे वाहू लागली भगीरथाने तिला जिथे सगर राजाचे साठ हजार पुत्र भस्म होऊन पडले होते तिथे आणले. गंगाजलाचा स्पर्श होऊन ते राजपुत्र वैकुंठाला गेले. आपल्या पूर्वजांचा उद्धार केला. भगीरथाने गंगाजीला पृथ्वीवर आणले म्हणून तिला भागीरथी असे म्हणतात. भागीरथी गंगा असेही म्हणतात

गंगा एका धारेने पृथ्वीवर शंकराचे मस्तकावर आली परंतु एकवीस धारा होऊन ती जटेमधून बाहेर पडली या धारांपैकी भगीरथाचे मागे जी आली तीच मुख्य धारा तिनेच भगीरथाच्या साठ हजार पितराचा उद्धार केला भगीरथाच्या मागे गंगा निघाल्यानंतर एक दिवस भगीरथाने गंगोत्री येथे वास्तव्य केले. आणि गंगेची कृतज्ञतेने पूजा केली या कारणाने गंगोत्रीस तीर्थमाहात्म्य प्राप्त झाले. आजही तेथे भगीरथ शीलेचे मंदीर आहे. त्या शीलेचे पूजन सर्व यात्रेकरू करतात ज्या दिवशी शंकराने गंगेस मुक्त केले तो दिवस ज्येष्ठ शुक्ल सप्तमी होता म्हणून तो दिवस गंगेच्या जन्मावताराचा असे समजतात या तिथीस दशहरा सप्तमी म्हणतात दहा दिवस गंगेचा उत्सव चालतो.

गंगेचा पुत्र देवव्रत भीष्म पितामह भीष्म म्हणून महाभारतामध्ये

त्याना स्थान मिळाले भीष्म प्रतिज्ञा ही सर्वांना माहीत आहे

गंगा ही हिमकन्या. हिमालयाच्या कुशीत अनेक नद्याचा उगम झाला आहे. त्यानाच गगेच्या धारा म्हणतात

प्रकरण ४

# केदारनाथ महाराज की जय

## गंगोत्री ते केदारनाथ -प्रवास मार्ग

| | अंतर किलोमीटरमध्ये | उंची समुद्रसपाटीपासून |
|---|---|---|
| गंगोत्री | ० | ३१४० |
| भैरवघाटी | १० | २६५२ |
| उत्तर काशी | १०० | ११५८ |
| धरासू | १२८ | १०३६ |
| टिहरी | १६५ | ७७० |
| श्रीनगर (गढवाल) | २२५ | ५७९ |
| रुद्रप्रयाग | २५९ | ६१० |
| गुप्त काशी | २९८ | १४७९ |
| रामपूर | ३२६ | १६४६ |
| सोनप्रयाग | ३२९ | १८२९ मी. |
| गौरीकुड | ३३४ | १९२२ मी. |
| केदारनाथ | ३४३ | ३५८३ |

गौरीकुंड ते केदारनाथ हा १४ किलोमीटरचा पायी प्रवास आहे. डोली करून, वा घोड्यावरून वा कंडी करून प्रवासी जातात. १४ किलोमीटर अतरामध्ये १६६१मीटर अथवा अदाजे ५००० फूट उच्च चढावे लागते.

**गंगोत्री ते केदारनाथ (३४३ किलोमीटर)**
**प्रवास कार्यक्रम**

दि. ८ मे १९९३
भैरवघाटी गंगोत्रीस प्रयाण सकाळी ८ वाजता पोच ८/२०
गंगा स्नान, दर्शन ८॥ ते ११॥
गंगोत्री ते भैरवघाटी परत १२ वाजता
भोजन विश्रांती उत्तरकाशी प्रयाण २॥ वाजता
उत्तरकाशी पोच ६ वाजता विश्रांती, भोजन, विश्राम

दिनाक ९ मे १९९३.
उत्तरकाशी -मंदीर -दर्शन ६-३० ते ७-३०
उत्तरकाशी ते गुप्त काशी पोच सायंकाळी ७ वाजता.
गुप्त काशी -विश्रांती, भोजन, निद्रा

दिनाक १० मे १९९३
गुप्त काशी - मंदीर दर्शन ७ ते ९
गुप्त काशी ते रामपूर ९ ते १२
रामपूर -त्रियुगीनारायण दर्शन - परत १२॥ ते २॥
भोजन विश्राती, रात्रीचे भोजन, निद्रा

दिनाक ११ मे १९९३
रामपूर ते गौरीकुड ७ ते ८
गौरीकुंड ते केदारनाथ पायी/ घोड्याने/ डोलीने ९ ते दुपारी ४
आरती रात्री ७ -७॥

दि. १२ मे १९९३
केदारनाथ मंदीर दर्शन, नाश्ता ७ ते १०
केदारनाथ ते गौरीकुंड परत १० ते ६
गौरीकुंड ते रामपूर ६ ते ७

**गंगोत्रीहून परत : भैरवघाटी ते उत्तर काशी**

दुपारी दोन सवा दोन वाजता आम्ही भैरवघाटी सोडली आता वाट केदारनाथाची बस उताराला लागली. तीच वळणे वळणे मध्येच बर्फाचे ग्लेशियर दिसत. आनंदाने ते बर्फ नग सर्वजण परत परत पाहत होते पावसाची भुरभुर सुरू झाली होती नंतर पाऊस येणार याची चिन्हे दिसत होती जोराचा पाऊस सुरू होण्याआधी घाटी ओलांडली म्हणजे जीव भाड्यात पडणार होता परमेश्वरापाशी प्रार्थना केली काही विघ्न संकट न येता आमची गाडी सुखरूप खाली जाऊ दे बाहेरचा निसर्ग पाहण्याचे मात्र औत्सुक्य होते भागीरथी गंगेचा प्रवाह काही ठिकाणी संथपणे काही ठिकाणी अवखळपणे वाहत होता. काय मजा पहा. निसर्ग १२ महिने चोवीस तास शुभ्र पाण्याचा पुरवठा मानवजातीस, वन्यजीवनाला आणि प्राणिमात्राला करीत होता सर्व मोफत. विना अपेक्षा प्रवासात गंगा नहानी केव्हा ओलांडली हे कळले नाही

भैरवघाटी पार पाडली आणि जोराचा पाऊस सुरू झाला आता थोडा फार सखल भाग आला होता. नंतर टिहरी डॅमचा भाग आणि नंतर उत्तरकाशी आहे तासाभराने पाऊस थांबला होता गाडीतून काही ठिकाणी अभिषेक चालू होता विंडो सीटवाले ओले झाले होते आणि ते आत सरकत होते. कारण खिडक्यातूनही पाणी आत येत होते काहींनी तेथे टॉवेल लावले

**उत्तर काशी (११५८ मीटर)**

हे मोक्याचे ठिकाण आहे येथे वस्ती बरीच आहे शिवाय ते सैन्याचे ठिकाण आहे बॉर्डर रोड्स् संघटन जे आहे त्याचे कार्यालय येथे आहे. आमची सोय दोन हॉटेल्समध्ये केली होती आज प्रत्येक जोडप्याला स्वतंत्र खोली मिळाली होती. जेवणाला वेळ होता म्हणून

काहीजण बाजारात जाऊन आले. विशेषत येथे पाढऱ्या आणि काळ्या रंगाच्या जाड शाली वा रग मिळतात त्या अनेकानी घेतल्या. भावाबाबत बरीच घासाघीस करावी लागते. काहींनी लगेच पुणे, नाशिक येथे घरच्या माणसाना खुशाली कळावी म्हणून फोन केले रात्री १० नतर एस टी डी बूथ मध्ये चांगली गर्दी होते. भारत सरकारचे टेलिकॉम विभागाने ही चागली सोय केली आहे. हे भागीरथी नदीच्या तीरावर आहे येथे वरुण आणि असि नद्याचा संगम आहे.

## अटॅची गिर गयी

मध्यतरी एक प्रकरण उद्भवले भैरवघाटीहून परत येताना बसचे टपावर जे सामान होते ते घाटातील वळणावर डोंगराचे कपारीला लागले त्यामुळे दोर तुटला ताडपत्री फाटली आणि दोन प्रवासी बॅगा खाली रस्त्यावर पडल्या. नशीब हे की त्या पलीकडे घरगळत भागीरथी नदीमध्ये पडल्या नाहीत. क्लीनरने सुदैवाने त्या पाहिल्या. हा क्लीनर फार चलाख प्रवासात तो सतत उभा असे आणि रस्ता कसा आहे हे तो ड्रायव्हरला सागे. तो ओरडला (अटॅची गिर गयी रोक लो) गाडी थांबली. आणि तो मागे गेला. त्याचे मागे काही प्रवासीही गेले. आपली बॅग पडली नाही ना? फक्त दोनच बॅगा पडल्या का? प्रवासी चिंताग्रस्त झाले ती सुटकेस एका महिला प्रवाशाची होती टूरिस्टर मोठ्या आकाराची बॅग ती वाकडी तिकडी झाली होती कुलूप तुटले होते. परंतु आतील साड्या वगैरे सामान सुखरूप होते. ते घेऊन गाडीत आलो गाडी सुरू झाली. त्या महिलेने प्रश्नाची सरबत्ती सुरू केली. ही सुनेची बॅग आहे. त्यात ११ सिल्क साड्या होत्या हजार रुपयाची बॅग मोडली माझी बॅग भरून द्या आणखीही काही बोलल्या. त्यामुळे वादावादी झाली अखेर उत्तर काशी येथे बाजारात जाऊन तशीच टूरिस्टर बॅग खरेदी केली व त्याना दिली अर्धी रक्कम मॅनेजरनी भरली. ते म्हणाले प्रवासात अपघात हे होतातच त्याला कपनी जबाबदार नसते तरी सुद्धा चागलेपणा राहावा म्हणून ही झीज सोसत आहे केवळ गुडविल म्हणून. आम्ही इतर प्रवाशांनीही रदबदली केली. सामान वाचले हे नशीब समजा सूटकेस गंगेत पडली

नाही हे सुख माना क्लीनरचे आभार माना. त्याला दिसली नसती तर उत्तर काशीला लक्षात आले असते मग परत कोण आले असते अशा धुवाधार पावसात?

माणूस तीर्थयात्रेला निघाला असला तरी त्याचा सारासार विवेक राहत नाही याचा हा अनुभव दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घेणे, त्यात काही तथ्य असते याचा विचारच तो करत नाही. शिवाय जिभेवर नियत्रण हवे 'मधुर वचन और व्यवहार सज्जनता है' या पाट्या रस्त्यावर होत्या. परंतु त्याप्रमाणे आचरण कठीण जाते. यात्रेकरूनी तेवढ्यात धोबीघाट केला. रात्री पिठले भात पोळी भाजी बेत छान वाटला. खोलीतील फॅनवर कपडे हडकले. दिवसभरचे श्रमाने रात्री झोप केव्हा लागली कळले नाही दुसरे दिवशी पहाटे ४ वाजता जाग आली चाय चाय म्हणून ओरडणाऱ्या माणसामुळे येथे जवळच बस अड्डा आहे तेथे पहाटे ४ पासून चहावाल्याचे आधण सुरू होते हॉटेलमध्ये प्रवाशाची सोय झाली आम्ही चहा घेतला नतर पाच रुपयाला एक बादली याप्रमाणे दोन बादल्या अघोळीसाठी घेतल्या. स्नान केले. सामानाची बांधाबाध केली टपावर ठेवायचे सामान खाली आणून ठेवले ६। वाजले होते छान उजाडले होते उत्तर काशी एक मोठे पवित्र तीर्थस्थान. काशीतल्याप्रमाणे येथेही ती मणिकर्णिका, तीच विश्वनाथ, अन्नपूर्णा व इतर देवदेवींची मदिरे असल्यामुळे यात्रेच्या दिवसात येथे गर्दी असते. जणू वाराणसी नगरीच या पर्वतमय प्रदेशात येऊन तपस्येत निमग्न झाली आहे.

### जयपूर मंदीर

जयपूर मदीर हे असे पुरातन मदीर आहे तेथे एकादश रुद्र म्हणजे अकरा महादेवाचे मदीर आहे. ११ पिंडी तेथे आहेत जयपूरचे महाराजानी याचा जीर्णोद्धार केला त्याची देखभाल, दैनंदिन खर्च ते करतात १८५६ साली राजस्थान सरकारने जीर्णोद्धार केला या मदीराचे आतील बाजूला श्री अंबिका देवीचे मंदीर आहे सर्व घटावर त्रिशूल आहे त्यावर चक्र आहे.

## काशी विश्वनाथाचे मंदीर

वाराणसी शहराला काशी असेही नाव आहे तेथील काशी विश्वनाथाचे मदीर बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे तेथे जाऊन दर्शन करणे भारतामधील सर्व यात्रेकरूंना शक्य होत नाही म्हणून उत्तर भारतीयाचे सोयीसाठी उत्तर काशीमधील काशी विश्वनाथजीचे मंदीर उभारले आहे दक्षिणेतील लोकांसाठी दक्षिण काशी असे म्हणतात कोल्हापूर, पैठण आणि त्र्यंबकेश्वर या तीर्थांना दक्षिण काशी तीर्थे म्हणतात हे मदीर जुने आहे आत गाभाऱ्यात मोठे लिंग आहे. १४/१५ माणसे एका वेळी दाटीवाटीने उभे राहू शकतात. तेथे आरती चालली होती आम्हीही सहभागी झालो

या मदीरापुढे वैशिष्ट्यपूर्ण त्रिशूळ आणि परशू याचे पण मंदीर आहे त्रिशूळ हे शकराचे आयुध. त्रिशूळ जमिनीपासून १०/१५ फूट उच्च आहे. जमिनीखाली तो खोल किती आहे हे लोकांना सागता येत नाही त्रिशूळाला १० फूटावर मोठा परशू आहे त्रिशूळाचे खालचे बाजूस ६ फूट उच वस्त्रे लावली आहेत. या दोन्ही मदीरामध्ये दर्शन करून आम्ही परत मुक्कामाचे ठिकाणी आलो प्रात काळी काशी विश्वनाथाचे दर्शन झाल्यामुळे मनास प्रसन्नता आली याशिवाय अनेक मंदीरे आहेत पण वेळेअभावी आम्ही पुढील प्रवासास सुरुवात केली.

## उत्तर काशी ते गुप्त काशी

उत्तर काशीचा निरोप घेऊन आम्ही प्रवासास सुरूवात केली. आता सखल भाग होता. मोठी झाडे नव्हती. तुरळक झाडे होती. दुपारी १ चे सुमारास श्रीनगर हे गढवाल रस्त्यावरील मोठे ठिकाण लागले तेथे डालमिया शेटजींनी मोठी धर्मशाळा बांधली आहे खोल्या मोठ्या होत्या त्याला जोडून सडास बाथरूम होते खोलीत फॅन होते दोन लाकडी पलंग होते खाली मॅटिंग होते तेथे ताटे माडून जेवणे झाली त्याचवेळी तेथे तिबेटी लोक शाली, डोक्याला बाधायच्या पट्ट्या, लोकरी कपडे विकायला आले होते घासाघीस करून ४० टक्के किमती कमी होतात काहींनी सामान खरेदी केले.

**श्रीनगर** अलकनंदा नदीच्या तीरावर वसले आहे पर्वतापायथ्याकडील

बरेच लोक व्यापारधंद्याच्या निमित्ताने येथे येऊन राहिल्यामुळे त्या नगराची भरभराट झाली आहे बद्रीनाथाच्या यात्रेसमयी भारताच्या निरनिराळ्या राज्यामधून आलेल्या यात्रेकरूंमुळे हे ठिकाण फुलून जाते प्रमुख बाजारातून एक प्रशस्त रस्ता गेला आहे त्याचे दोन्ही बाजूंनी बरीच हॉटेल्स आहेत तेथे यात्रेकरूची रहदारी सतत असते. तेथे कमलेश्वर महादेवाचे मदीर आहे दुपारी अडीच वाजता आम्ही निघालो परतु आम्हाला अर्धा तास थाबावे लागले कारण तेथे डोंगरावर वीजेचे पोल उभारणे चालू होते आणि त्यातील पत्थर खाली पडत होते. पोल उभारल्यावर आम्हास जावयास मिळाले.

**रुद्रप्रयाग**

श्रीनगर सोडल्यावर रुद्रप्रयाग हे ठिकाण लागले येथे अलकनंदा आणि मदाकिनी या नद्यांचा संगम झाला आहे अलकनदा ही मोठी नदी बदरीनाथाहून ती आली आहे तिचे पाणी निळे काळे हिरवे आणि मदाकिनी नदीचे पाणी ताबडे गढूळ हे दोन वेगवेगळे प्रवाह आपणाला स्वतत्रपणे दिसतात यावर पूल बांधला आहे यापुढे मदाकिनी नदीचे अस्तित्व संपले अलकनंदा नदी हे या दोन नद्याच्या एकत्र प्रवाहाचे नाव मुलगी सासरी गेल्यानतर माहेरचे नाव विसरते आणि सासरचे माणसात स्वत ला विसरून जाते. विलीन करून राहते, तसे

स्वामी अखडानदानी या सगमाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे

'घननीळ वर्णाची, कलकल निनाद करणारी मदाकिनी, देवाधिदेव केदारनाथाची चरणकमले धुऊन झाल्यावर, अलकापुरीहून येणाऱ्या शुभ्रसलिला अलकानदेला मिठी मारत असल्यामुळे माझ्या दृष्टीसमोर हरिहरांची पवित्र मूर्ती उभी राहिली. श्यामल वर्णाची मंदाकिनी अलकानदेच्या गळ्यात हात टाकते व दोघीही पतितपावनी भागीरथीला भेटण्यासाठी तातडीने देवप्रयागाकडे धावत सुटतात '

**रुद्रप्रयाग ते गुप्त काशी**

नंतरचा प्रवास मजेदार झाला आता आंब्याची झाडे पण दिसू लागली. घरे जवळ जवळ होती शेती पण दिसू लागली. बांध घालून माती साठवून सखल प्रदेश केला आहे त्यांना मी पायऱ्या

पायऱ्यांची शेती म्हणतो सुदर दिसत. काही ठिकाणी जास्त सखल जागा असली तर अर्ध वर्तुळाकार शेत दिसते. गगेच्या खोऱ्यामध्ये जसे डोंगर होते तसे डोंगर काही ठिकाणी होते वरून पत्थर गिरने का भय होते. परतु आता या प्रकारच्या दृश्याची सवय होत चालली होती. अशा तऱ्हेने प्रवास करीत रात्री ७ वाजता आम्ही गुप्त काशी येथे पोचलो वाटेत अगस्त्य मुनि क्षेत्र लागले. रुद्रप्रयागपर्यंत अलकांनदेच्या तीरातीराने रस्ता गेला होता. रुद्रप्रयागानंतर मदाकिनीची सोबत होती नगाधिराज हिमालयाच्या अंतरंगात आम्ही जसा प्रवेश करू लागलो, आम्ही वर चढू लागलो, तसतसे रत्नगर्भ हिमालयाचे बहुविध दर्शन घडू लागले. वळणावळणावर हिमशिखरे दिसत होती हवा स्वच्छ होती ढग नव्हते म्हणून ही शिखरे सूर्यप्रकाशात चकचकत होती. उनही छान होते सोनेरी सूर्यकिरणाचे पर्वत दिसत होते. असे अतिसुदर आणि रमणीय दृश्य एक दीड तास दिसत होते. प्रकृतिसौंदर्याचा आनद घेण्यासाठीच तर ही हिमालय यात्रा आहे याची प्रचिती आली.

## गुप्त काशी (१४७९ मीटर)

आमची व्यवस्था हॉटेल त्रिवेणी टुरिस्ट कॉम्प्लेक्स मध्ये केली होती. हॉटेल दुमजली होते पहिला मजला रस्त्याच्या खाली होता. दुसरा मजला रस्त्याच्या पातळीला होता कॉंक्रीटच्या खोल्या होत्या. सीझन नुकताच सूरू झाला म्हणून भिंतींना पाढरी सफेदी मारली होती. नळाची कनेक्शन्स जोडली होती बिजलीसाठी नवीन 'बलब' आणले होते आम्ही पहिल्या मजल्यावर होतो. १२/१४ पायऱ्या उतरून जावयाचे आमच्या खोलीत तीन जोडपी होती काही खोलीत दोन जोडपी होती. सडासबाथरूम स्वतत्र परतु प्रशस्त होते. वृद्ध यात्रेकरूची सोय वरचे मजलेवर केली होती. सायकाळचे ७ वाजले तरी अधार पडला नव्हता.

येथून निसर्गाची सुदर रुपे दिसून येतात. तीनही बाजूला हिमशिखरे दिसैतात. समोरचे डोंगराचे बाजूला पायऱ्या पायऱ्याची शेती दिसत होती. डोंगराचे उतारावर थोडा सखल भाग करावयाचा त्या मातीला आधारासाठी ४/५ फूट उचीचा दगडाचा बधारा बाधायचा. वरचा

बाजूला पडणारी पाणी खालच्या पायरीवरच्या शेतीला द्यावयाचे अशी रचना केली होती. त्या छोट्या जागेत पीक घ्यायचे.

दुसऱ्या बाजूला डोंगराचे बाजूबाजूला घरे बांधली होती. त्यामध्ये वीज होती. रात्री ९चे सुमारास छोटे छोटे दिवे लुकलुकत होते अन्यथा सर्वत्र नीरव शांतता थंडी वाढत होती.

रात्रीचे जेवण खोलीतच घेतले टॉर्च मेणबत्या बाहेर काढल्या. रात्री वीज जाण्याची शक्यता जेवण करून रजई अंगावर ओढली

**अंघोळीचे पाणी आमचे आहे**

सकाळी ५ वाजतांच उठलो होतो. सर्व यात्रेकरूंनी स्नान करून ७ वाजता गुप्त काशी येथील मंदीरात जावयाचे होते म्हणून अंघोळीचे पाणी गरम करण्यासाठी स्टोव्ह पेटवला होता त्यावर पातेले ठेवले त्यात पाणी घालून गरम करावयास ठेवले होते बाहेर गार वारे वाहत होते त्यामुळे पाणी लवकर गरम होत नव्हते म्हणून प्रत्येक यात्रेकरूने दोन चार तांबे पाणी घ्यावे असे आम्ही म्हणत होतो. एक दोघाच्या आंघोळी झाल्या. तेवढ्यात एका यात्रेकरूने त्या पातेल्यावर ताबा मिळविला पाणी गरम झाले की त्या सर्व पाणी बादलीत ओतीत मी सूचना केली की सर्व पाणी ओतू नका एक दोन तांबे त्यात ठेवीत जा म्हणजे पुढचे पाणी जरा लवकर तापेल परंतु त्यांनी ऐकले नाही त्याचे पती पुढे आले मी विज्ञानाचा प्राध्यापक आहे मला विज्ञान समजते बोलून गेले. जरा वेळाने दुसऱ्या वृद्ध भगिनी आल्या पाणी घेऊ का? अजीजीने विचारले. "आमचे पाणी आहे" मघाच्याच बाई बोलल्या मी म्हणालो पाणी सर्वांचे आहे सर्वांसाठी तापत ठेवले आहे पत्नी म्हणाली भाडण नको त्याना आधी घेऊ द्या. मग आपण घेऊ त्या बाईंनी प्रथम आपल्या खोलीतील दोघाना पाणी दिले नतर पतीस दिले नतर स्वत घेतले मगच इतर यात्रेकरूना पाणी मिळाले पाण्याची बाब काय परतु मानवाच्या मनाचा कोतेपणा इथे दिसला पुढे हिमालयाचा प्रवास केल्यावर दिसले. निसर्गापुढे मानव हा क्षुद्र प्राणी आहे. विज्ञानाच्या कितीही गप्पा मारल्या तरी निसर्गावर, हिमालयावर मानव काबू पाउ शकला नाही

या प्रसगानंतर आम्ही प्रत्येक वेळी बाईंचे आधी होऊ द्या आपण नंतर अघोळ करू असे ठरविले केदारनाथला सुद्धा पूजा करताना मला निवांत पूजा करायची आहे म्हणाल्या. म्हणून आम्ही त्यांनी पूजा केल्यावर पूजा केली. देवाच्या दारी आल्यावर प्रथम शेजारच्याचा, दुसऱ्यांचा विचार करावा ही वृत्ती बळावणे आवश्यक होय रेल्वे, एसटी, दूधकेंद्र, स्थानिक बस सेवा, जिथे जिथे रांग आहे तेथे तेथे माणसे पुढे जाण्याचा, इतराना ढकलून, रांगा मोडून प्रयत्न करताना दिसतात मला आधी म्हणून एकमेकावर झडपा घालतात. त्यामुळे अपघात, मृत्यू ही घडतात. थोडे थाबायला शिकले पाहिजे. धीरे चले. सावधानीसे ले अशा पाट्या प्रवासात वळणावळणावर दिसत होत्या त्या जीवनास मार्गदर्शन करतात. परंतु आपल्या आचरणात ही गोष्टी येईल तेव्हा खरी. यात्रेमध्ये अनेक गोष्ट शिकायच्या असतात आचरणात आणायच्या असतात त्यापैकी ही एक

याउलट तेथील मुले मात्र आया बाबूजी, बल्ब लाया जी, कर रहेजी अशी अगत्यपूर्वक भाषा बोलत होते. या हगामातील आमचा पहिला मुक्काम म्हणून खोल्याना सफेती दिली होती पाण्याचे कनेक्शन नीट केले होते प्रवाशाची गैरसोय होऊ नये म्हणून ती लहान मुले काळजी घेत होती हेल काढून काही शब्दावर जोर देऊन बोलत होती.

गुप्त काशी हे ठिकाण एक विशाल पर्वताच्या सर्वांत उच भागावर वसले आहे येथून थोड्या अंतरावर चढले की या उत्तुग पर्वताचे शिखर गाठता येते खाली नजर टाकली की खूप खोलवरून मदाकिनी वाहताना दिसते मदाकिनीच्या दुसऱ्या तीरावर साधारण तितक्याच उंचीच्या पहाडावर उखी मठ वसलेले आहे गुप्त काशीच्या समोरासमोर उखीमठ दिसून येतो. मदाकिनीच्या पश्चिमेकडील पहाडाच्या खाद्यावर गुप्तकाशी व पूर्वेकडील खाद्यावर उखीमठ उखीमठाहून उत्तरेकडे नजर फेकली की केदारनाथची चिरतन हिममय पर्वतराजी डोळ्यात भरते केदारनाथचे महत येथे राहतात केदारनाथाला वाहिलेले अलंकार व इतर वस्तू येथे ठेवतात सहा महिने केदारनाथाची पूजा येथे होते येथून हिमालयाचे

जे अपार व सौंदर्यशाली दर्शन घडते त्यावरून मनात येते की, जणु विश्वराजाच्या अधीश्वराने जवळच आपली राजधानी वसवली आहे व तिथे तो सदासर्वदा विराजमान आहे. त्या विश्वराजधानीचे उखीमठ जणु प्रमुख महाद्वार आहे

**गुप्त काशी- विश्वनाथाचे मंदीर**

स्नान करून आम्ही विश्वनाथाचे मंदीरात दर्शनास गेलो रस्ते बारके आहे. पूजेच्या साहित्याची ताटे मिळतात येथे गुप्त दान देतात त्यासाठी नारळाचे वाळलेले गोटे १० रुपयाला एक याप्रमाणे मिळतात.

मंदीराचे आवार प्रशस्त आहे दगडी बांधकाम आहे येथे एक कुड आहे त्याला दोन मुखे आहेत. एकातून गंगा येते दुसऱ्यातून यमुनेचे पाणी येते. त्यात स्नान करतात पाणी ताब्यामध्ये भरून घेतात आणि महादेवाला अभिषेक करतात. जल चढाना असे म्हणतात

**माहात्म्य**

पाडवानी द्रोणाचार्यांना युद्धामध्ये मारून ब्रह्महत्या केली होती. त्याचे पातक त्यांना लागले त्यामुळे ते स्वर्गात जाऊ शकणार नव्हते. हे पातक जाण्यासाठी काय करावे म्हणून विचारणा केली भगवान शंकराची आराधना करा त्यांना शिवा असे सागितले त्यावेळी भगवान शंकर काशी येथे होते या पापी लोकांना कशाला भेटायचे म्हणून भगवान शंकर काशीहून गुप्त झाले आणि प्रस्तुत गुप्त काशी येथे गुप्तपणे राहू लागले. म्हणून या स्थानास पुण्यत्व प्राप्त झाले आहे शिवशंकरांचा निवास असलेले पवित्र तीर्थ

पंडे लोकानी हे माहात्म्य सागून या स्थानामध्ये नारळाचे गोट्यामध्ये आपली जी इच्छा असेल ती रक्कम, वस्तू दागिना घालून भटजींना द्यावयाची असते असे सागितले त्यानुसार आम्ही गुप्तदान केले सर्व जोडप्यांना एकत्र बसविले इतराना एकत्र बसविले पूजा अर्चा केली आशीर्वाद दिला आणि नतर आम्ही महादेवाचे दर्शन घेतले येथे अर्धनारीश्वर शकराचे मंदीर आहे त्यापुढे नदी आहे. त्याला दोन शिगे आहेत या दोन शिगांमधून दर्शन घ्यावयाचे अशी पद्धत आहे

भिंतीवर पाडवांच्या मूर्ती आहेत ते शकराच्या शोधात हिंडत आहेत

असे चित्र आहे

याप्रमाणे काशी विश्वनाथाचे दर्शन करून आम्ही परत गुप्त काशी येथे आलो. नतर नाश्ता चहा करून पुढच्या मुक्कामाला - रामपूरला - निघालो सामान बसच्या टपावर चढले जय केदारनाथ या घोषात बस निघाली

## रामपूर

अडीच तासानंतर रामपूर आले हे गौरीकुंडाचे आधी अर्ध्या तासाचे अतरावर आहे तेथील हॉटेलमध्ये आमची व्यवस्था केली होती. एका खोलीत दोन जोडपी मावली मोठ्या खोलीत एकटे जीव सदाशिव विश्रामले

हॉटेल मजेदार आहे रस्त्याचे वर त्याचा थोडा भाग एक मजला होता. पायऱ्या उतरून खाली जायचे तिथे एक मजला परत तेथून पायऱ्या उतरून आणखी खाली जायचे. तिथे काही खोल्या होत्या सिमेंटकॉंक्रीटच्या खोल्या होत्या. खोलीत ॲटॅचूड सडास बाथरूम होत्या. पाणी भरपूर होते. पंप लावला होता दिवे होते पण रात्री ९ नंतर मेणबत्याचे प्रकाशात विसावलो गौरीकुड येथे सीझनमध्ये अनेक यात्रेकरूच्या गाड्या प्रवास कपन्या घेऊन येतात त्यामुळे तेथे असलेली निवासव्यवस्था अपुरी पडते यासाठी काही यात्रा कंपन्या गौरीकुंडाचे अलीकडे रामपूर, सीतापूर येथे वास्तव्य करतात हॉटेल हाच एक मोठा व्यवसाय येथील लोकांचा आहे. सीमेंट कॉंक्रिटच्या खोल्या, आधुनिक सडास, बाथरूम, बेड, र[redacted] असलेली ही हॉटेल्स प्रवाशांना आवडतात. याउलट गौरीकुंड येथे जुनी हॉटेल्स, बारक्या खोल्यांची, अधारी, अशी आहेत.

## त्रियुगी नारायण मंदीर (२८२८ मीटर्स उंची)

रामपूरहून थोडे पुढे गेल्यावर डावीकडे त्रियुगी नारायणाकडे जाण्याचा रस्ता अथवा फाटा लागतो. तेथून १४ किलोमीटरवर हे मंदीर आहे फाट्याला वळताना शासकीय विश्रामधाम आहे. घोडेवाले पण आहेत हा सर्व भूप्रदेश घनदाट अरण्याने झाकलेला आणि अनेक धबधब्यानी न्हाऊ घातलेला आहे एका अत्यंत उच व प्रशस्त भूखंडावर त्रियुगीनारायण प्रतिष्ठित असून भोवती पाढऱ्या शुभ्र हिममय पर्वताच्या रागा आहेत.

या पर्वतांचा वरील भाग शुभ्र हिमराशींनी झाकला आहे आणि खालील अर्ध्या भागात नवी पालवी फुटलेल्या देवदार व तत्सम वृक्षांची दाटी झाली आहे स्वामी अखडानद म्हणतात, पर्वतराजींचे अर्धांग अतिधवल व अर्धांग घनश्याम वर्णाचे असल्यामुळे पुन माझ्या मनात आले की हरिहराच्या विराट मूर्तीच्या चरणाशी मी उभा आहे अखिल देवी देवतांचे हे एकत्र समेलन पाहूनच कालिदासाने "देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराज" असे म्हटलेले आहे. गिरीराज हिमालयाला इतक्या सुंदर अर्थपूर्ण नावाने सबोधन करणारा दुसरा कुणी अजून आढळला नाही. मदीर खोलगट भागात उभारले आहे. पायऱ्या उतरून आपण मदीराचे प्रांगणात उतरतो प्रांगण मोठे आहे. आम्ही बसलो. पंडे लोकांनी माहात्म्य सागितले


हे भगवान नारायणाचे पुराणे जुने स्थान/क्षेत्र आहे त्रिविक्रमा नदीचे किनाऱ्यावर हे वसले आहे येथे ब्रह्म आणि इतर देवतानी भगवान विष्णूची (हरीची) पूजा केली होती. येथे अग्नि देव सतत राहत असतो. हे शिव आणि पार्वतीचे विवाहाचे ठिकाण होय

मदीराचे आवार मोठे आहे त्यात अनेक कुण्डे, नारायणाचे मन्दिर आहे.

मंदीर सुदर आहे आणि मोठेही आहे मदिरात भगवान नारायणाची मूर्ती आहे. त्याचे बरोबर लक्ष्मी, सरस्वती, कुबेर आणि भैरव यांच्या मूर्ती आहेत या मूर्तींच्या मागे जगद्गुरू शंकराचार्यांची मूर्ती आहे

हवनकुंड

शिव पार्वतीच्या विवाहाचा साक्षी असलेला अग्नी अजूनही हवनकुडात धगधगत आहे. यापुढेही तो प्रज्वलित राहील म्हणून भाविक लोक त्यामध्ये काष्ठ/समिधा टाकतात त्याला लकडी चढाना म्हणतात. ५/१० रुपये द्यावयाचे प्रसाद म्हणून राख भस्म देतात युगयुगांतरापासून स्वत: भस्मीभूत होऊन हे अग्निकुड भक्तगणाच्या व यात्रेकरूच्या थडीला दूर पळवून नेते असे वाटते शिव पार्वतीचा विवाह तृतीयेला झाला होता (वाराह पुराण २२ वा अध्याय) म्हणून अर्धनारीश्वर पूजन तृतीयेला करतात




# त्रियुगी नारायण मंदीर

या देवळात ४ कुडे आहेत. ब्रह्म कुंड, रुद्र कुड, विष्णु कुंड व सरस्वती कुड. ब्रह्मकुंडात स्नान करून रुद्रकुडात सकल्प सोडतात विष्णुकुंडात आचमन करतात सरस्वती कुडामध्ये आपल्या पितराना तर्पण करतात. त्यामुळे त्यांना मोक्ष मिळतो. ते स्वर्गात सुखात राहोत ही शुभेच्छा असते. त्याला पितृतर्पण कुंड असेही म्हणतात

**ब्रह्मशीला**

या शीलेची पूजा करतात. शिवपार्वतीचा विवाह या शीलेवर झाला

असे सागतात येथून केदारेश्वराचे शिखर मनोहारी दिसते (३९१० मीटर उचीवरील)

**सौभाग्यदान**

शिवपार्वतीचा विवाह झाला त्या ब्रह्म शिलेवर बसून पूजा केली जाते ब्राह्मण पूजेची ताटे देतात त्यात पूजा साहित्य असते. यावेळी ब्राह्मण भोजन म्हणून १। किलो २॥ किलो तादूळ भेट म्हणून देतात. येथे पूजा केली असता सौभाम्य चिरतन चिर स्थायी होते अशी श्रद्धा आहे. सौभाम्य दान म्हणून ५ रुपये, ११रुपये, २५ रुपये, ५१ रुपये पडे लोकाना दक्षिणा म्हणून देतात

इथे पंडे लोकांनी यात्रेकरूच्या नावाची नोद केली. आपले नाव, मुलाची, सुनांची भावाची नावे लिहिली या वह्या शेकडो वर्षे त्यानी जतन करून ठेवल्या आहेत. माझी नोंद- महाराष्ट्र, पुणे-कोथरूड या शीर्षकाखाली केली नंतर हा मजकूर इतर वह्यात, आडनावाप्रमाणे शहर-शहरातील वस्ती वा पेठ या नावाने उतरून काढतात त्यामुळे ते यात्रेकरूच्या पूर्वजांचा शोध घेतात.

दर्शन करून आम्ही परत रामपूरला आलो जेवण केले विश्राती घेतली काहींनी धोबीघाट केला रात्री गावात हिंडलो शेकोट्या भोवती लोक बसले होते चहाचे आधण उकळत होते बिडी सिगरेट चालू होते यात्रेकरूचे उपयोगी साहित्याची दुकाने होती दुसरे दिवशी सकाळी लवकर उठून केदारनाथला जावयाचे होते. म्हणून १ दिवसासाठी आणि प्रवासासाठी लागणारे साहित्य घेऊन आम्ही बसमध्ये बसलो रामपूरहून गौरीकुड अर्ध्या तासात आहे

रामपूर आणि गौरीकुडाचे दरम्यान दोन प्रेक्षणीय ठिकाणे आहेत पहिले सोनप्रयाग येथे मदाकिनी आणि सोनगगा या नद्याचा सगम आहे सोनप्रयाग १८२९ मीटर उच आहे गुप्तकाशी ते रामपूर, सीतापूर, सोनप्रयाग, गौरीकुड हा प्रवास मार्ग आहे गुप्तकाशीहून सोनप्रयाग २८ किलोमीटर आहे

सोनप्रयाग आणि गौरीकुंडाचे दरम्यान मुडकटा गणेशजीचे मदीर आहे त्याची कथा पुढीलप्रमाणे आहे नेहमीप्रमाणे पार्वती कुडावर स्नानास

गेली. पाहऱ्यासाठी तिने गणेशाला ठेवले. कोणी आले तर पाठवू नको असे सांगितले एवढ्यात भगवान शकर आले. गणपतीने त्याना अडविले. दार उघडले नाही म्हणून शकराला राग आला रागाचे भरात त्याने गणपतीचे शीर उडवले तेवढ्यात पार्वती आली शकराने आपल्या मुलाला मारले हे पाहून ती दुःखी झाली शकराला तिने गणपतीला जिवंत करण्यासाठी प्रार्थना केली. शकर पस्तावले. ते बाहेर पडले त्याना प्रथम हत्ती दिसला त्याचे मुडके त्याने उडवले आणि गणपतीचे धडाला चिटकवले गणपती जिवत झाला. मुडकटा गणेशजीचे हे अनोखे मंदीर आहे इतरत्र सापडत नाही

**गौरीकुंड**

गौरीकुंड येथे बस थाबली येथे अनेक कपन्यांच्या बसेस आल्या होत्या त्याचे पार्किंग ही डोकेदुखी आणि वाहनचालकाची कौशल्याची परीक्षा अनेक जण गौरीकुंडात स्नान करीत होते. ती गर्दी पाहून आम्ही स्नान करण्याचा बेत रद्द केला


येथील एका हॉटेलात आम्ही उतरलो आमची बस आल्यावर दडीकंडी पालखी वाल्यानी आमच्या भोवती गराडा घातला. अभी कुछ नही म्हणून आम्ही बाहेर पडलो हॉटेलमध्ये विश्वासू एजटस्चे साहाय्याने माणसे हेरली व त्याचेकडे काम सोपविले घोडेवाले पण आले होते

मॅनेजरनी प्रत्येकास सागितले की आज नाश्त्याला ८/८ बिस्कीटे आहेत ही प्रत्येकानी खाल्लीच पाहिजेत. कारण उपाशी पोटी प्रवास करणे त्रासदायक होते. आम्ही चहा बिस्कीटे खाल्ली

प्रथम पायी चालणारे निघाले त्याना रामबाडा येथे हॉटेल राणा येथे थांबण्यास सांगितले केदारनाथाचे निम्म्या अतरावर ही जागा आहे जय केदारनाथ म्हणून प्रवासी निघाले

नतर घोडेवाले निघाले घोड्याचा दर येथे कमी हेता जाऊन येऊन ५०० रुपये नतर आम्ही पालखीवाले निघालो चार चार लोकाचा एक गट, त्याचा एक म्होरक्या प्रत्येकाची एक डोली या डोल्या यमुनोत्रीच्या डोलीचे मानाने अरुंद होत्या त्यामुळे मला बसायला त्रास वाटला परंतु दुसरा मार्ग नव्हता. दर ८८० रुपये आता पालखीचा

प्रवास सुरू झाला १० वाजले होते. त्यामुळे सूर्याचे उन छान पडले होते. परतु कानटोपी हवी होतीच




केदारनाथचे वैशिष्ट्य म्हणजे हा सर्व प्रवास चढणीचा आहे. फारसा कोठे उतार नाही दुसरा भाग म्हणजे येथील रस्ते यमुनोत्रीचे मानाने रुंद होते घोड्यांचे साठी एक रस्ता पायी चालणाऱ्याचे साठी एक रस्ता असे होते काही ठिकाणी तर परतणाऱ्या घोड्यांसाठीसुद्धा वेगळा रस्ता होता. चागल्या दगडानी हा रस्ता खालपासून वरपर्यंत बाधला आहे. उजवीकडे नदी वाहते आहे. समोर दऱ्या आहेत

अशा तऱ्हेने आम्ही १२ चे सुमारास रामबाडा येथे पोचलो राणा हॉटेलात आलो पालख्या विसावल्या मजूर डाळ भात खायला गेले. गाडीवान बिडया फुकत बसले किंवा चहा बिस्कुट खात बसत

आमचेसाठी साबुदाणेवडे आमचे समोर तळून दिले जात होते. चटणी छान झाली होती ३/४ वडे खाल्ले विश्रांती घेतली आणि परत प्रवासाला सुरुवात झाली

**पाऊस आणि बर्फ : आगळा अनुभव**

काही अंतर चालून गेल्यावर जोराने वारे वाहू लागले आणि पाऊस पडू लागला दुपारी १२ नतर हिमालयातील हवा बदलते याचा हा अनुभव होता लगेच आम्ही बरसाती (प्लॅस्टिकचे कापड-झल्यासारखे काढल्या. आणि डोक्यावर घेतल्या. वारा जोरात वाहत होता. त्यामुळे हे कापड सांभाळणे कसरतीचे काम होते आणि क्षणात बर्फ पडू लागले. हा वेगळाच आगळा अनुभव येथे आला. आतापर्यंत माझी कल्पना अशी होती की बर्फाचे खडे पडत असावेत. पण तसे नव्हते हे कापसासारखे किंवा बुढ्ढीचे बालासारखे भुसमूशीत बर्फ होते. कोटाचे बाहीवर पडत होते मजा वाटली परतु तसेच भीतीही वाटली निसर्गाचा हा खेळ २० मिनिटे चालला होता डोलीवाले म्हणाले घाबरू नका. आम्ही थाबणार नाही काही होत नाही लवकर पोहोचावयास हवे. काही यात्रेकरू चट्टीचे निवाऱ्याला थाबले येथे काळजी वाटते ती जोरदार वाऱ्याची हा वारा फार जोराचा असतो म्हणून आडोशाला थांबायचे

**केदारेश्वराला पोचलो**

अशा तऱ्हेने ही चढण चढून आम्ही दुपारी साडेतीनचे सुमारास केदारनाथ येथे पोचलो. विशिष्ठ अतराचे पुढे घोडेवाले जाऊ शकत नाहीत. म्हणून त्याची थाबण्याची जागा १/२ फर्लांग आधी होती समोर केदारेश्वराचे मदीर दिसत होते. त्यामागे हिमशिखरे. शेजारी मदाकिनी नदी वाहत आहे या प्रवासात एक नाविन्य आढळले ते म्हणजे हिमनग ते जास्त प्रमाणात आढळले. तीन चार ठिकाणी तर रस्त्यापासून वरती ५०० फूट बर्फ आणि रस्त्याचे खाली नदीपर्यंत बर्फ आणि मध्यभागी २० फूट रुदीचे बर्फावरून आम्ही ४०/५० फूट पायी गेलो. दगड गोटे असतात. डोंगरावरून पाण्याचा प्रवाह येतो त्या प्रवाहावर बर्फ साठते हा थर एक फूट दोन फूट जाड असेल त्यावरून चालताना मजा वाटते अर्थात् डोलीवाला आपला हात धरतो चुकून कोठे पडलो घसरलो तर, म्हणून दक्षता

नतर मंदीराचे पुढे थोडा चढ आहे तो चढताना त्रास वाटत

होता हवा विरळ होती तो चढून उजवीकडे वळून आम्ही पंजाब सिंध आवास या निवासाचे ठिकाणी आलो गरम कोळशाची शेगडी हात पाय शेकण्यासाठी तयार होती शेगडी भोवती बसलो. हात पाय शेकले. या अनुशगाने सप्टेंबर ९३मधील एक घटना सांगतो यात्रेकरूंनी रात्रीचे वेळी थडी निवारण्यासाठी शेगडी पेटवून ठेवली होती ऑक्सिजन कमी झाला परिणामी ६ यात्रेकरू झोपेत मृत्यूमुखी पडले. म्हणून रात्रीचे वेळी शेगडी पेटवून ठेवू नये केदारेश्वरास मला एक अनोखा अनुभव आला. आवासात दोन खोल्या शेजारी शेजारी होत्या. एका खोलीत ४ यात्रेकरू दुसरे आमचे खोलीत ४ यात्रेकरू (दोन जोडपी) एका खोलीत शेगडी पेटविली त्यामुळे धूर झाला. त्यामुळे खोलीतील ऑक्सिजन कमी झाला कपनीचे मॅनेजर आले. त्यांनी हे पाहिले आणि खोल्या उघडायला सांगितल्या. परतु बाहेर थंडी. शेवटी रजईचा आश्रय घेतला

सध्याकाळचे वेळी अलकारदर्शन आणि केदारनाथाचे आरती होते. त्यासाठी काही यात्रेकरू गेले होते. कॅसेट लाऊन लाऊड स्पीकरवर आरती ऐकू येत होती. या आरतीच्या कॅसेट्स विकत मिळतात मी मात्र थडीमुळे आरतीला गेलो नाही.

**सर घाबरू नका**

जरा वेळाने मी बाथरूमला निघालो परतु बाथरूममध्येच चक्कर येऊन पडलो. लोकानी खोलीत आणले याचे कारण म्हणजे येथे हवा विरळ असते त्यामुळे ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो म्हणून येथे आल्यावर एका ठिकाणी १/२ तास बसून राहण्यास सागितले होते या हवामानात रुळायला मला वेळ लागत होता. दुसरे कारण म्हणजे भूक लागली असावी सकाळी ३/४ साबुदाणे वडे खाल्ले होते त्याआधी ८ बिस्किटे खाल्ली. मला ॲसिडिटीचा त्रास होतो दोन्ही गोष्टी अपथ्यकर आणि जेवण मिळाले नव्हते त्यामुळे एखादेवेळा चक्कर आली असावी म्हणून मला जेवण आधी द्या सांगितले पोळी भाजी, कोशिबीर आवडली. भात मात्र खाल्ला नाही मग बरे वाटू लागले. यात्रेकरूंनी धीर दिला सर घाबरू नका. आम्ही आहोत,

चांगलेकर म्हणाले.

थोड्या वेळाने डॉक्टरांनी बोलावले. येथे प्रवाशाचे सोयीसाठी डॉक्टराची सोय केली आहे त्यानी तपासले ब्लड प्रेशर लो झाले होते. मळमळल्यासारखे वाटते, चक्कर येते म्हणून स्टिमेटिल Stemetil ची गोळी घ्यावयास सागितली. सॉर्बिट्रेटची गोळी माझ्या पिशवीत होती ती घेतली कारण मी हृदयविकाराचा पेशट. छातीत दुखत होते म्हणून डाव्या कुशीवर झोपण्यास सागितले. उताणे झोपायचे नाही हा येथील दडक.

औषधे घेतली. आडवा कुशीवर पडलो. सौभाग्यवती घाबरल्या होत्या. मुलाला फोन करून बोलवून घ्या. आणि विमानाने परत पुण्याला जाऊ या. तिचे कळकळीचे सांगणे. परंतु येथे फोन नाही तो लागत नाहीच फोन समजा मिळाला तर मुलगा पुणे-दिल्ली विमान प्रवास करील नंतर दिल्ली-केदारनाथ प्रवासाचे काय? त्याला पोचण्यास ५/६ दिवस लागणार. तर हा विचार बाजूला ठेवावा आणि परमेश्वराचा धावा करू लागलो. ओम् नमः शिवाय, जय शिवशकर चा जप सुरू केला. आणि हा जप उपयोगी पडला. केदारेश्वराने येथे बोलावले आहे. तोच साभाळील. त्याचे दर्शन करूनच जावयाचे हा निग्रह होताच परत ओम् नम. शिवाय जप सुरू केला सौभाग्यवती रोज गजानन महाराजांची पोथी वाचते तिने ती बरोबर आणली होती ती पोथी तिने मोठ्याने वाचली मी भक्तिभावाने ऐकली आणि तास दीड तासाने आराम वाटला. रात्रभर झोपेची चाळवाचाळव होती. उणे दोन तापमान होते. पहाटे ४॥ वाजता इतर यात्रेकरूंचे आवाजाने जागा झालो.

---

## संकटकाळी आठवतो देव

संकटकाळी भगवताची आठवण येते. यावेळी नामस्मरण, नामजप उपयोगी पडतो. जप, भगवताचे स्मरण माळेचे मणी ओढत जप करणे हे मनावरचा ताण, चिंता दूर करण्याचे, स्ट्रेस मॅनेजमेंटचे कार्य करतात. गगोत्रीला जाताना भैरवघाटी येथे थांबलो होतो पाऊस वारा सुरू झाला. थंडी वाढली. त्यावेळी भजने व

कीर्तने केल्यामुळे वेळ कसा निघून गेला हे कळले नाही येथे ते न केल्यामुळे "मन चिंती ते वैरी न चिंती" या म्हणीची प्रचीती आली. १८९७ साली प्लेगने हाहा·कार मांडला होता महाराष्ट्रात त्यावेळी ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अहवालाची मला आठवण झाली. प्लेग आला म्हणून लोक धार्मिक ग्रथ जास्त प्रमाणात वाचू लागले होते अशा वेळी देवाला न मानणारे ही देव मानू लागतात. ज्या वेळी माणसाचे प्रयत्न अपुरे पडतात. त्यावेळी माणसाचे नियत्रण नसणारी आणखी एक श्रेष्ठ शक्ती माणसाला जाणवते. ही माणसापेक्षा श्रेष्ठ शक्ती म्हणजे देव व निसर्ग होय. याची जाणीव या प्रवासाने निर्माण होते असा माझा अनुभव आहे.

---

**केदारनाथ : दर्शनाची आस**

आज अथरुणातून बाहेर पडावेसे वाटत नव्हते. एकतर वीज नव्हती आणि महत्त्वाचे म्हणजे थडी. उणे दोन डीग्री सेल्शियस तापमान होते सहाचे सुमारास उजेडासाठी खोलीची खिडकी उघडली. पाहतो तर तेथे बर्फाचे खडे. खोलीचे समोरही बर्फ होते. येथे सहा महिने बर्फ असते. राहिलेल्या सहा महिन्यांतही केदारनाथासमोर, मागे, पुढच्या क्षेत्रामध्ये बर्फ जमिनीवरून वर आलेले दिसते. ही थडी लक्षात घेऊन गरम पाणी तोंड धुण्यास दिले होते जरा वेळाने चहा झाला. श्रीकेदारनाथाचे दर्शन स्नानाविना करणे कोणालाच पसत नव्हते म्हणून यात्रेकरूचे आग्रहास्तव गरम पाणी प्रत्येकी अर्धी बादली स्नानासाठी दिले स्नान करून स्वच्छ कपडे परिधान करून उनी कपडे डोक्या खांद्यावर बाळगीत एक एक यात्रेकरू दर्शनास तयार होत होते. मी शेवटी पाणी घेतले त्यामुळे मला बादलीभर गरम पाणी मिळाले. परंतु त्यात थंड पाण्याची भर घालावी लागली नाही स्नान करून कपडे करून दर्शनासाठी निघालो मनात ओढ होती दर्शनाची.

**केदारनाथ मंदीर**

दर्शनासाठी मंदीरासमोर रांगा लावलेल्या होत्या हातात पूजेची ताटे

होती. पायांना गार लागते म्हणू रांगेच्या मार्गावर मॅटिंग घातलेले होते वृद्ध व आजारी व्यक्तींची बसण्याची सोय मदीराच्या ऑफिसमध्ये खुर्च्या टाकून केली होती. सामान सांभाळणे हा दुसरा उद्देश.

**केदारनाथ**

केदारेश्वराचे मदीर दगडी आहे. ते पुरातन आहे. मंदीरासमोर मोठा दगडी चौथरा आहे. त्यावर नंदी आहे नदीचे दर्शन करून मग केदारेश्वराचे दर्शन करावयाचे रांगेतील ६/८ माणसाना ते एका वेळी आत सोडीत प्रवेशद्वारात उजवीकडे श्री गणेशाची मूर्ती आहे. महागणपती/ गणेशाची पूजा अर्चा प्रथम होते. गणेशाला गगास्नान घालतात. फुले दुर्वा इत्यादी पूजा साहित्याने पूजा होते आरती होते सपत्नीक होते ३/४ जोडपी एका वेळी बसत. त्यांना दक्षिणा आशीर्वाद आणि प्रसाद घेऊन आपण मंदीरामध्ये पुढील भागामध्ये प्रवेश करतो

डाव्या बाजूने रांग असते प्रथम लक्ष्मी नारायणाची मूर्ती आहे त्याची पूजा केली ऐच्छिक दान ५ रु, ११ रु, १५ रु, २१रु, याप्रमाणे टाकावे म्हणून पुजारी आवाहन करीत असतात त्यानतर केदारेश्वर पूजा. आतील गाभाऱ्यात प्रवेश करावयाचा मदीराचे आतील भागात मध्यभागी श्री केदारनाथ शीलेच्या स्वरूपात विराजमान आहेत. त्यांचे तीनही बाजूला यात्रेकरूना दर्शन घेण्याची, पूजा करण्याची व्यवस्था आहे दाटीवाटीने बसावयाचे प्रत्येक बाजूला एक पुजारी असतात ते पूजा सागतात. केदारेश्वर म्हणजे पर्वताचे/पहाडाचा जमिनीवर आलेला त्रिकोणी भाग जमिनीचे वरचा भाग उची अदाजे चार फूट आहे लांबीरुंदी ४/६ फूट असेल. प्रथम फूल वाहणे नंतर गंगाजलाने अभिषेक करणे. नतर गध लावणे, साखरफुटाणे व हरभरा डाळ याचा प्रसाद दाखवितात. वस्त्र म्हणून भगवे वस्त्र अदाजे ४ इच बाय ४ इंच वाहायचे. नंतर केदारनाथाला तूप चोळावे. भैसाला भीमाने पृष्ठ भागावर गदा मारली. त्यामुळे तिथे जखम झाली. त्यावर तूप चोळले अशी कल्पना आहे. नंतर आरती होते प्रसाद देतात मनात जे संकल्प आहेत ते पूर्ण होवो पुत्र पौत्र सकल कुटुबाचे क्षेम होवो आणि व्यवसायामध्ये बरकत येवो हा आशीर्वाद गुरुजी देतात अर्थात भगवंताला

दक्षिणा द्यावी. त्यासाठी पेट्या आहेत. यात्रिकाचे मन प्रसन्न होते. कृतकृत्य होते. यात्रिक परत परत डोके भगवंताचे चरणावर ठेवण्याचा प्रयत्न करतो. परंतु आता पुरे या घोषणेने आपण पुढे चालू लागतो. नजर मागे वळते श्री केदारनाथाकडे

## गौरीपूजा

याप्रमाणे दर्शन केल्यानतर आपण देवळाच्या मूळ गाभ्याबाहेर येतो तेथे गौरीचे पार्वतीची मूर्ती सुशोभित करून 'प्रसन्न वदने देवी' आपणाला दर्शन देते. जेथे शिवशकर तेथे पार्वती आणि त्याचा मुलगा गणपती. बगाली यात्रिक या मूर्तीपुढे जास्त वेळ थांबत नमस्कार, दक्षिणा देऊन आम्ही बाहेर आलो. तेथे केदारनाथ मदिर समितीतर्फे देणग्या स्वीकारल्या जातात व पावती दिली जाते आम्ही देणगी दिली पावती घेतली. प्रसाद घेतला आणि मदीराचे बाहेर पडलो

या देवळाचा प्रवेश दक्षिणेला आहे बाहेर शनीचे देऊळ आहे. त्याचेही दर्शन घेतले.

## हिमशिखरे

आता फोटोग्राफर्सचा गराडा पडला या ठिकाणी तीन ठिकाणचे दृश्य छान दिसतं. केदारनाथ मदीर, त्यावरील हिमशिखरे हे दृश्य छान दिसते त्याचप्रमाणे मंदीरासमोर उभे राहून त्याठिकाणी यात्रेकरू, मदीर, त्यावरील हिमशिखरे हे दृश्य छान दिसते.

## पूजा

श्री केदारनाथाला विविध प्रकारच्या पूजा असतात अभिषेक असतात. प्रसाद असतात त्याचे दर मंदीर समितीने ठरवून दिले आहेत आम्ही श्रावण महिन्यामध्ये ब्रह्म कमळाची पूजा करावी सागून १५० रुपये दिले श्रावण महिन्यात पूजा करून प्रसाद पोस्टाने पाठवला जातो सकाळी ४ ते ७ वेगवेगळ्या दराच्या पूजा असतात. केदारेश्वराचे मुख्य गाभ्याचे पुढचे भागात नदी आहे. हुडी पेटी पण आहे शिवाय प्रवेशद्वाराचे चबुतऱ्यावर मोठा नदी आहे. त्याची पूजा अर्चा सर्व करतात

सकाळी ७ नतर सामान्य जनाना प्रवेश असतो. त्याची दक्षिणा

५१ रुपये असते दुपारी १ ते ४ दर्शन बद असते म्हणून त्या आधी दर्शन करून यात्रेकरू परततात दुपारी १ नंतर आलेले यात्रेकरू रात्रीचा मुक्काम करून दुसरे दिवशी परततात.

**श्री शंकराचार्य स्मारक**

केदारनाथ मंदीराचे मागचे बाजूला आद्य जगद्गुरु श्री शंकराचार्य याचे स्मारक आहे. तेथे त्यांचा पूर्णाकृती पुतळा आहे सभा मडप आहे. श्री शंकराचार्य येथे येऊन राहिले होते त्यांचा दंड पण आहे. मंदीराचे मागचे बाजूला हिमशिखरे सूर्यप्रकाशामुळे तळपत होती. येथून शंकराचार्य हिमालयात गेले आणि मृत्यू पावले असे सागतात

**परतीचा प्रवास तयारी**

दर्शन, पूजा, प्रसाद, फोटो झाल्यावर परत निघालो वाटेत दुकाने होती. त्यात बद्रीनाथाच्या केदारनाथाच्या ताब्याच्या प्रतिकृती वेगवेगळ्या आकाराचा मिळत होत्या. इतर वस्तूही होत्या पुस्तके, रगीत चित्रे, फोटोफ्रेम्सही होत्या. खरेदी झाल्या पंजाबसिंध आवासामध्ये येऊन नाश्ता चहा केला आणि परतीच्या प्रवासाची तयारी झाल्या. परत उनी कपडे परिधान केले शाली पांघरल्या आणि पिशवी घेऊन डोलीत बसलो जय केदारनाथ म्हणून जयजयकार करत डोली आता गौरीकुडाकडे निघाली सकाळचे १० वाजले. उन्हे वर आली होती तसा उशीर झाला होता. आता डोलीवाले झपाझप खाली उतरू लागले श्री केदारनाथ येथे मला श्वासोच्छ्वासाचा त्रास झाला. त्यातून निभावून आघोळ करून दर्शन पूजा झाली म्हणून कृतार्थतेने मन भरून आले श्री केदारनाथाची इच्छा होती त्याने दर्शन घडविले या आनदमय वातावरणात मी होतो. आता राहिले बद्रीनाथ आणखी एक अनोखा अनुभव

१५ ते २० मिनिटाला १ किलोमीटर अंतर डोलीवाले कापत होते मध्ये परत तोच ग्लेशियर लागला. तेथे फोटो काढले येथे पायी चालत गेलो.

११॥ चे सुमारास हवा बदलली. आकाशात ढग जमा झाले थड वारा वाहू लागला. पाऊस येणार अशी चिन्हे दिसू लागली

परतु विश्राती हवी होती रामबाडा आला राणा हॉटेलमध्ये थाबलो आडवा पडलो पाठीला रग लागली होती माझ्यानाही रग लागली होती कारण ही डोली बारक्या आकाराची होती चहा बिस्किटे खाल्ली आणि परत प्रवास सुरू झाला काहींनी थड पेये घेतली

आता १-१॥ किमी सखल भाग होता डोलीवाले झपझप निघाले १० किमी चालून आलो होतो आणि पाऊस सुरू झाला आम्ही आडोशाला उभे राहिलो बरसाती काढल्या कानटोपी घातली १५ मिनिटानी पाऊस थाबला परत झपाझप पावले पडू लागली. आणि डोली ३-१५ चे सुमारास गौरीकुडाला पोहोचलो. पूर्वीच्या हॉटेलामध्ये एका खोलीत यात्रेकरू जसजसे येत होते तसतसे आपल्या पिशव्या टाकून आडवे झाले होते मी पाय ताणून दिले.

जरा वेळाने चहा सामोसे आले. खाऊन ताजेतवाने झालो

यात्रेकरू येत होते. जय केदारनाथ म्हणून स्वागत होई आणि प्रवासी आपले अनुभव सागत असत घोड्यावरचे लोकाचे अनुभव. एक घोडेवाला यात्रेकरूस सोडून दुसऱ्या गिऱ्हाईकाचे मागे गेला होता. आणि घोडा तसाच चालला होता. त्यामुळे त्यावर बसणाऱ्या बाईचे भवितव्य हवेत होते दुसऱ्या प्रवाशानी त्या घोडेवाल्याला चागले फैलावावर घेतले कडीमधील एक बाई असेच पडल्या कडीवाल्याचा पाय घसरला त्यामुळे तो पडला. कडीतल्या बाईंनी लोटागणे घातली त्याना पाठीला, पायाला लागले होते पाऊस आला त्यावेळचा अनुभव मजेदार होता वारे जोरात वाहू लागले बरसातीत वारे घुसले आणि बरसातीच उडते का वाटू लागले

परतु केदारनाथचे उतरणीचे वेळी तसे अडथळे आले नाहीत कारण रस्ते मोठे आहेत काही ठिकाणी घोडेवाल्यांचे रस्ते मोठे आहेत काही ठिकाणी घोडेवाल्याचे रस्ते पण शॉर्ट कटचे वेगळे होते सर्वात शेवटी पायी चालणारे एक एक जण आले चव्हाण व सौ चव्हाण पण आले

आम्ही मग गौरीकुड पाहून आलो कारण काल येथून जाताना गौरीकुडावर आम्ही अघोळी केल्या नव्हत्या येथे पार्वती माता शिवशकराची

आराधना करीत होती. शिवशंकर प्रसन्न झाले. दोघांचा विवाह झाला. हे गरम पाण्याचे कुंड आहे. स्त्रियांसाठी वेगळे पार्टिशन होते. शिवाय बाथरूम्स होती.

याशिवाय येथे आणखी कुडे आहेत. गौरीमाता म्हणजे पार्वतीचे मदीर आहे. तेथे नमस्कार करून आम्ही गाडीत बसलो.

**केदारनाथ कथा**

पाडवांनी ब्रह्महत्या केली होती. त्या पातकातून मुक्त होण्यासाठी पांडव शिवशंकरांची आराधना करू लागले. पाडव काशी येथे येत आहेत हे पाहून शंकर गुप्त काशी येथे निवास करू लागले. परंतु तेथेही पांडव शोध घेत आले पाडव तेथे येत आहेत हे पाहून शिवशकर केदार पर्वतावर गेले. तेथेही पांडव शोध घेत आले. शंकरांनी पापी पांडवांचा स्पर्श होऊ नये म्हणून भैशाचे रूप घेतले आणि मायावी स्वरूपात अनेक भैसे निर्माण केले व त्यात मिसळून गेले. पाडवानी ही माया ओळखली. शिवशंकरांना ओळखण्यासाठी पाडवांनी युक्ती योजली भीम दोन पर्वतावर दोन पाय रोवून उभा राहिला आणि नकुल सहदेवाना त्याचे पायाखालून एक एका भैशास घालवण्यास सागितले याप्रमाणे दहा वीस भैसे पायाखालून गेले. भीमाला माहीत होते की शिवशंकर त्याचे पायाखालून जाणार नाहीत शकरांनी आता आपली पाळी येणार हे पाहून भीमाचे पायाखालून जाण्याचे टाळले आणि पर्वतात मुसंडी मारली. तेवढ्यात भीमाने भैशाची शेपटी पकडली व शिवशंकराना वंदन केले. परतु हे करताना भैशाच्या पाठीवर गदा लागली. त्यातून रक्त वाहू लागले. शिवशंकरांनी पाडवांची भक्ती पाहून त्यांना ब्रह्महत्येच्या पातकामधून मुक्त केले. केदारनाथ येथील मंदिरात भैशाचा पृष्ठभाग जमिनीवर आलेला आहे. त्याला यात्रेकरू तूप चोळतात भैशाचे धड नेपाळमध्ये पशुपतीनाथ येथे आहे. तेथे जाऊन दर्शन घेतल्याशिवाय केदारनाथाचे दर्शन पूर्ण होत नाही म्हणून नेपाळमध्ये जाऊन पशुपतीनाथाचे दर्शन घ्यावयाचे असते शिवशकराचे इतर अवयव म्हणजे पंचकेदार. ते केदारनाथाचे परिसरात आहेत.

## गौरीकुंड ते रामपूर

आमची गाडी १ तासात रामपूरला पोचली तेथे सर्वजण आपल्या खोल्यात गेले. रजई अंगावर घेतली. काहींनी तेवढ्यात धोबीघाट केला. सर्वजण केदारनाथाच्या दर्शनाचे अनुभव एकमेकांना सागत होते. रात्री जेवणे झाली मेणबत्त्या होत्या. त्यामध्ये जेवणे केली आणि निद्राधीन झालो उद्या सकाळी लवकर उठायचे म्हणून.

## जीवन यात्रा आणि डोली यात्रा

जीवन ही लबी प्रवास यात्रा आहे. त्या यात्रेत प्रवास कसा करावा याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ही डोली। पालखीचा प्रवास.

डोली नीट असली पाहिजे हलकी परतु भक्कम असली पाहिजे त्याचे लाकूड उत्तम चिवट हवे

डोलीवाले चार होते पुढे दोन डोलीवाले मागे दोन डोलीवाले त्याचे पाय एकमेकांना जुळले पाहिजेत पायाची गती पण जुळली पाहिजे म्हणून दोन डोलीवाल्यांचे पुढचे बाजूचे आणि मागचे बाजूचे पाय सारखे जमले पाहिजे पुढचा व मागचा डोलीवाला यातील अंतर लय एकमेकांना सांधणारे तोलणारे हवे डोलीचे दाडे एकदा डाव्या खाद्यावर त्याला रग लागली म्हणजे खांदा बदल करावयास हवा आणि त्याचे वर भार ठेवलेला डोलीतील माणूस त्यालाही तोल सांभाळावयास हवा डोलीवाला डावीकडे कलला तर बसणाऱ्या माणसाने उजवीकडे कलले पाहिजे हे नियम आहेत डोलीत बसणाऱ्याची नजरही डोलीवाल्यावर, पुढून येणारे घोडेवाले, पायीवाले, डोलीवाले यांचेवर हवी त्याच वेळी रस्ता रस्त्यावरील खडक आणि पायाखालचे दगडगोटे याचेकडेही नजर हवी. संसार यात्रा ही अशी अनेक डोलीवाल्याचे साहाय्याने करावी लागते सर्वांचा ताल, लय, अंतर, वेग, कोन साधावयास हवा तर ही यात्रा पुढे जाते न थाबता, न अडखळता. हा बोध या डोलीच्या प्रवासात मिळाला जीवन नौका प्रवासात या बोधाचा उपयोग होणार ही यात्रा म्हणून बोधयात्रा आहे

श्री शिवशंकराची आरती येथे यात्रेकरू म्हणतात आपणही ती म्हणू या.

जय भोलेनाथ  जय हो भण्डारी
जयजय कैलाशपति जय हो त्रिपुरारि
बम भोला  बम भोला  बम भोला ॥

दुखियों के तूने कष्ट निवारे
जो भी आया शम्भु तेरे द्वारे
कर दिया कल्याण तुमने कल्याणकारी
जय भोलेनाथ  जय हो भण्डारी ॥

तेरी जटा ओमे गगा का पानी
गंगा के पानी मे शक्ति तुम्हारी
मस्तक पे चन्द्रमा पीड हरे सारी
जय भोलेनाथ  जय हो भण्डारी ॥

तनमे विभूत रगी नागों की माला
नैनों मे मस्ती तीसरे मे ज्वाला
दर्शन की भीरव माँगे तेरे भिखारी
जय हो भोलेनाथ  जय हो भण्डारी ॥

हंस हस के धरती का विष पीनेवाले
महादेव नीलकंठ जग से निराले
कैसे करू मै बा उपमा तुम्हारी
जय हो भोलेनाथ  जय हो भण्डारी ॥

प्रकरण ५

# बदरी विशाल की जय

१३ मे १९९३

आज सकाळी लवकर उठलो. कारण आज दिवसभर बराच लांबचा प्रवास करावयाचा होता. म्हणून लवकर उठून जितक्या लवकर आम्ही प्रवास सुरू करू तितके आवश्यक होते. बद्रीनाथला रात्री पोचावयाचे होते. त्याआधी जोशी मठ येथे शेवटले गेट दुपारी साडेतीन वाजता उघडते. नतर ते बंद होते उशिरा पोचल्यास जोशी मठ येथेच मुक्काम करावा लागतो म्हणून ही दक्षता घ्यावी लागते हॉटेलवाल्याने ५ रुपयाला एक बादली या दराने गरम पाणी आणून दिले. स्नान केले. कपडे केले. सामानाची बाधाबाध केली बॅगा कपनीचे सेवकाचे ताब्यात दिल्या आणि चहा घेऊन जय बद्रीनाथ म्हणून बसमध्ये बसलो. सकाळी ६ वाजता बस निघाली. शेजारचे हॉटेलातील यात्रेकरूनी पाच वाजताच रामपूर सोडले होते. त्याचे पेक्षा आम्ही उशिरा निघालो परंतु प्रवासात घेतलेले स्वयपाकासाठीचे रॉकेल सपले होते ते पुढील एका गावी घेतले. त्यासाठी वीस मिनिटे गेली. परंतु ते आवश्यक होते परत प्रवास सुरू झाला

थोडा वेळ गेल्यावर आम्ही आरत्या म्हणण्यास सुरुवात केली. आणि या भगवताच्या प्रार्थनेमध्ये पुढचा दीड तास कसा निघून गेला कळले नाही. पुढचा मुक्काम आला काका उतरा नाश्ता करा सेवक विनवू लागले.

**प्रवासमार्ग**

आजचा प्रवास मार्ग वेगळा होता. रामपूर परत गुप्तकाशी तेथून तीन प्रयाग लागले रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग आणि नंदप्रयाग त्यानतर श्रीनगर हे तालुक्याचे ठिकाण तेथून चढ सुरू झाला चमोली, पीपल कोटी, जोशी मठ, विष्णुप्रयाग, गोविंदघाट, पांडुकेश्वर मार्गाने बद्रीनाथला पोचलो

**केदारनाथ ते बद्रीनाथ (रुद्रप्रयाग मार्गे)**

| **समुद्रसपाटीपासून उंची** | **उंची मीटरमध्ये** | **अंतर दोन स्थानांमधील** | **अंतर सुरुवातीपासून** |
|---|---|---|---|
| श्री केदारनाथ | ३५८३ | - | - |
| गरुडचट्टी | ३२६५ | ३ | ३ |
| रामबाडा | २५९१ | ४ | ७ |
| गौरीकुड | १९८२ | ७ | १४ |
| सोनप्रयाग | १८२९ | ५ | १९ |
| रामपूर | १६४६ | ३ | २२ |
| फाटा | १६०१ | ९ | ३१ |
| नारायणपोटी नाला | - | ११ | ४२ |
| गुप्त काशी | १४७९ | ३ | ४५ |
| कुड | ९७६ | ५ | ५० |
| अगस्त्यमुनि | ७६२ | १५ | ६५ |
| तिलवारा | ६७१ | १० | ७५ |
| रुद्रप्रयाग | ६१० | ९ | ८४ |
| घोलतीर | ६४५ | १० | ९४ |
| गौचर | ७९० | १० | १०४ |
| कर्णप्रयाग | ७९५ | ११ | ११५ |
| नदप्रयाग | ९१४ | २२ | १३७ |
| चमोली | १०६९ | १० | १४७ |
| पीपलकोटी | १३११ | १७ | १६४ |
| गरुडगगा | १३७२ | ५ | १६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| टंगानी | १६७७ | ६ | १७५ |
| हेलंग | १५२४ | ६ | १८१ |
| जोशीमठ | १८९० | १४ | १९५ |
| विष्णुप्रयाग | १३७२ | १० | २०५ |
| गोविंदघाट | १८२९ | १० | २१५ |
| पाडुकेश्वर | १८२९ | ४ | २१९ |
| हनुमानचट्टी | २२८६ | ९ | २२८ |
| देव दर्शनी | ३१०१ | १३ | २४१ |
| **श्री बद्रीनाथ** | ३११० | २ | २४३ |

पीपल कोटी येथे आम्ही थांबलो आणि एका हॉटेलात जेवण घेतले. जेवण कंपनीने केले होते पराठा, मटारउसळ, भात, भाजी आमटी हा मेनू. येथील हे मोठे हॉटेल आहे. डॉर्मिटरीमध्ये एका वेळी ३०हून अधिक बिछाने आहेत शिवाय स्वतंत्र खोल्या पण आहेत. अनेक जण येथे रात्रीचा विश्राम करतात

दुपारी २ वाजता निघालो. साडेतीन पर्यंत जोशी मठ येथे पोहोचायचे होते. १५ मिनिटात ५ किलोमीटर एवढा प्रवास होत होता

येथे व्हेली ऑफ गॉड्स असे फलक लावले होते. ही देवभूमी आहे तपोभूमी आहे त्यात स्वागत असो. निसर्ग प्रकृतीका आनद ले।

यापुढच्या प्रवासात आम्हास जाणवलेले हे की हिमनग असलेली स्थाने थोडक्या थोडक्या अंतरावर मिळाली येथील पत्थर तसा कडक म्हणून पाणी कमी म्हणून झाडेही लहान खुरटी होती गंगेच्या खोऱ्यात व यमुनेच्या खोऱ्यात झाडे उंच उच आहेत तशीच वनश्री भरपूर आहे. परतु येथे झाडी कमी आहे झाडे खुरटी आहेत

**जोशी मठ**

जोशी मठ हे या प्रवासातील महत्त्वाचे ठिकाण येथे बद्रीनाथला जावयाचे गेट खोलले जाते. जोशी मठ ते बद्रीनाथ हा एकेरी मार्ग आहे प्रत्येक प्रवासाचा वेळ दर दोन तासानी असतो. पहिले गेट

सकाळी ६/३० वाजता उघडले जाते. शेवटचे गेट दुपारी ३-३० वाजता असते. त्यानंतर येथे कोणासाठीही प्रवेश मिळत नाही. तो त्यावेळी गेट खोलण्यास वेळ होता म्हणून आम्ही हॉटेलमध्ये जाऊन चहा घेतला. येथील हॉटेलवाल्याचे मेनूकार्ड पाहिले डिश/प्लेट बेसिसवर सर्व दर होते. हे दर मात्र त्यांनी स्वीकारले आहेत येथे विविध प्रकारची हॉटेल्स विश्रामगृहे आहेत. पुस्तके विकतात फोटो, नकाशे विकतात येथे आयुर्वेदी औषधी/वनस्पती मिळतात. बद्रीनाथला ज्यावेळी बर्फ असते त्यावेळी तेथील लोक येथे येऊन राहतात. येथे नृसिंहाचे मंदीर आहे.

## सायंकाळी ७ वाजता बद्रीनाथला पोचलो

बद्रीनाथला जाताना विविध हिमनग पाहिले शेवटी बद्रीनाथ आले. प्रवेशद्वार बांधले आहे. यात्रेकरूचे स्वागत ते करते. नंतर बसेस थांबल्या. आम्ही तेथून जवळच बालाश्रम येथे गेलो तेथे आमच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आश्रमावर जी पाटी आहे ती बंगाली मध्ये आहे अनेक बंगाली गृहस्थानी हा आश्रम बांधण्यास देणग्या दिल्या आहेत. त्यांनी आम्हाला तळमजला आणि पहिला मजला दिला काही स्वतंत्र खोल्या होत्या काहीमध्ये दोन जोडपी राहिली एक हॉल होता एकएकटे जे प्रवासी आले त्यानी तेथे निवास केला.

## स्वास्थ्य सांभाळले

केदारनाथसारखाच अनुभव येथे आला येथे हवा विरळ आहे मला त्याचा अनुभव आला. बसमधून बाहेर आल्यावर मला चक्कर यावयास लागली. तळमजल्यावरील खोलीत मी विसावलो. रजई अंगावर घेतली. डाव्या कुशीवर झोपलो. रात्री ९ वाजता मी या हवेशी रुळलो म्हणून खोलीतच जेवण घेतले.

त्यानतंर येथील आश्रमाचे महत यांनी बद्रीनाथ स्थान माहात्म्य, विविध ठिकाणे, त्याचे महत्त्व आणि इतर ऐतिहासिक कथा सागितल्या उद्या सकाळी ८ वाजता जायचे हा निरोपही सागितला.

रात्री ९ वाजता भोजन उरकल्यानतर निद्राधीन झालो आज दिवसभर प्रवास केला. सर्वजण थकले होते त्यामुळे अथरुणावर अंग टाकल्याबरोबर

निद्राधीन झाले. पहाटे जाग आली ती बद्रीनाथ मदीरामधले घटानाद आणि लाऊड स्पीकरवर लावलेली आरती यामुळे नतर हाक आली ती 'गरम पानी, गरम पानी' या पाणीवाल्याचे ओरड्याने. एक मोठा डबा पाच रुपयाला एक याप्रमाणे आणला होता तो बादलीत ओतून घेतला. दुसरा डबा पण आणावयास सागितला. आणि स्नानही उरकून घेतले नंतर चहावाला आला चहाही घेतला. हा चहा होता बाहेरच्या चहावाल्याचा.

यात्रेकरू हळुहळु उठले. कंपनीचा चहा आला. नंतर नाश्ता पण झाला. ८ वाजता सर्वांनी दर्शनासाठी जावयाचे असे आदल्या दिवशी सांगितले होते. तेथे गरम पाण्याचे कुडात स्नान अनेक यात्रेकरू करतात म्हणून काही यात्रेकरू हॉटेलमध्ये स्नान न करता अघोळीचे कपडे घेऊन निघाले.

मदीराकडे जाण्याचा रस्ता एकच आहे जाताना उतार आहे. रस्त्यावर विविध दुकाने होती. ती पाहत पाहत निघालो नतर पूल लागला त्या खालून अलकनंदा नदी वाहते. पूल ओलांडला आणि उजवीकडे गरम पाण्याचे कुड लागले. स्त्रियांची आणि पुरुषाची वेगवेगळी सोय आहे. पाणी गंधकमिश्रित आहे.

स्नाने झाल्यावर तेथील प्रशस्त घाटावर सतरंजी घालून बद्रीनाथ क्षेत्रामध्ये केली जाणारी पूजा अर्चा झाली. महाराष्ट्रीय पुजारी तेथे आहेत. पॅंट शर्ट घालून पूजा सागतात येथे पूजेची ताटे मिळतात. दर ५० रु १०० रु. १५० रु होते १५० रुपयाचे ताटात साडी, धोतर असते ब्राह्मणाला वस्त्र म्हणून धोतर देतात श्री बद्रीनाथ क्षेत्रातील पूजा पती पत्नींनी मिळून केली.

**बद्रीनाथ दर्शन**

यानतर आम्ही बद्रीनाथचे मदीरात दर्शनासाठी गेलो पादत्राण स्टॅंड मोठा आहे फुले पण विकत मिळतात प्रसादासाठी फुटाणे, लाह्या घेतात दर्शनासाठी रागा होत्या.

मदीर उचवट्यावर आहे. वर जाण्यास १०/१५ पायऱ्या आहेत तेथे मोठा चौथरा आहे नतर प्रवेशद्वारातून आत जावयाचे नंतर रांगेत

उभे राहावयाचे लोखडी नळाचे कठडे आहेत त्यानंतर सभामंडप लागतो. तेथून उजव्या बाजूने आत जावयाचे. या मडपात ३०/४० यात्रेकरू मावतात. दर्शन करून प्रसाद घेऊन आम्ही बाहेर पडलो. मदीराचे प्रवेशद्वाराला रंगरंगोटी केली आहे.


**नारायणाची मूर्ती व बदरीनाथ पंचायतन**

गाभाऱ्यात सिंहासनावर शाळिग्राम शिळेची नारायणाची मूर्ती आहे बदरीनारायण यांनाच म्हणतात. मूर्ती पद्मासनावर ध्यानमुद्रेत विराजित आहे. तिला चार हात आहेत. उंची अडीच तीन फूट आहे दोन हात जोडलेले असून दोन हातात शंख चक्र आहेत. नारायणाला सुवर्णाचा मुखवटा चढविलेला असतो मुकुटही सुवर्णाचा असून हिरेजडित आहे नारायणाच्या डाव्या हाताला लक्ष्मी चवरी ढाळीत आहे तिच्या पलीकडे नर नारायणांच्या शंख-चक्र-पदम्-गदाधारी मूर्ती आहेत. उजव्या बाजूला कुबेर व गणपती आहेत. या मूर्तीच्या खालच्या पायरीवर उजव्या बाजूला गरुड, डाव्या बाजूला नारद व मध्ये उद्धव आहे. गाभाऱ्यात अक्षय्य नंदादीप तेवत असतो.

**मंदीराचे प्रांगण**

बाहेर आल्यावर मदीराचे प्रागणामध्ये हिंडलो उन होते विविध प्रांतामधील यात्रेकरूचे समेलन येथे भरले होते. हा महाराष्ट्रीय, हा बंगाली, हा केरळीय हा भेदभाव येथे नव्हता भाषेचे भाडण तर कोठेच नव्हते. परमेश्वराची आराधना करण्यास भक्तीची भाषा सर्वांना समजते परमेश्वराचे दर्शन करण्याची उत्कंठा, दर्शन झाल्यावर प्रसन्न मुखकमल आणि एखादी योजना पार पाडल्याचे समाधान पर्व यात्रेकरूंचे चेहऱ्यावर सारखेच आढळते. काळा, गोरा, पुरुष, स्त्री, गरीब, श्रीमंत कोठलाच भेदभाव येथे नाही येथे सर्व देवाची मुले

प्रथम लक्ष्मीजींचे मदीर आहे. तिचे दर्शन घेतले नतर आद्य जगद्गुरु शकराचार्य यांची गद्दी म्हणजे गादी आहे तिला प्रणाम केला नतर श्री शकराचार्य दालन आहे. ही मोठी ओसरी अथवा सोपा आहे त्यावर गालिचे घातले आहेत. येथे शंकराचार्यांचा मठ होता. कोपऱ्यामध्ये शकराचार्यांचे मोठे सहा फुटी रेखाचित्र आहे त्यापुढे त्याचे शिष्यांच्या




## बदरीनाथ मंदीर आराखडा.

मूर्ती आहेत त्याचे बाजूला भिंतीवर शंकराचार्यांचे मठ कोठे आहेत, त्याचे आचार्य, त्याना दिलेल्या पदव्या आदि माहितीचा तक्ता दिला आहे. (पृष्ठ ९७ वर दिला आहे) या दालनात शंकराचार्यांनी जे विविध ग्रंथ लिहिले ते वाचण्याची प्रथा आहे त्या जागी बसून

विष्णु सहस्त्रनाम, गीतगोविंद नामावली, अष्टोत्तरी, वगैरे ग्रंथाचे वाचन करायचे वा पारायण करायचे. त्या पलीकडे मंदीराचे कार्यालय आहे. विविध प्रकारच्या पूजा, भोग, प्रसाद आदींचे दर ठरले आहेत. त्यानुसार पैसे भरून पावत्या दाखवून प्रसाद घ्यावयाचे सध्याकाळचे अलंकार दर्शनाचे पासेस पण मिळतात.

त्यापुढे हनुमानजींचे मंदीर आहे. वैशिष्ट्य म्हणजे त्यापुढील घंटा मोठमोठ्या आहेत. त्यानतर कथा, कीर्तन एवं सत्सग कक्ष आहे. आम्ही गेलो होतो त्यावेळी काही यात्रेकरू पेटीसह भजन म्हणत होते देवाला आळवीत होते येथे रोज दुपारी साडेचार ते साडे पाच हरिकथा चालते. त्यापुढे क्षेत्रपालाचे मंदीर आहे.

अशा तऱ्हेने ही प्रदक्षिणा पुरी होते आणि मंदीराचे देवडीतून आपण बाहेर पडतो बाहेर मोठा दगडी चबुतरा आहे. त्यावर उभे राहून यात्रेकरू फोटो, मदीरासह काढून घेतात. नतर पादत्राणे स्टँड आहे तेथून चपला घेऊन आम्ही निघालो दुपारचे बारा वाजून गेले होते

## आद्य जगद्गुरू श्री शंकराचार्य

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चार मठ | गोवर्धन मठ | शृंगेरी | शारदा | ज्योतिर्मठ |
| क्षेत्र | पुरुषोत्तम | रामेश्वर | द्वारिका | बदरिकाश्रम |
| समादाय | भोगवार | भूरिवार | कोटवार | आनन्दवार |
| आचार्य | पद्मपाद | सुरेश्वर | हस्तामलक | तोटक |
| पदवी | वन, अरण्य | सरस्वती भारती, पुरी, | तीर्थ, आश्रम | गिरि पर्वत |
| देवी | विमला | कामाक्षी | भद्रकाली | पूर्णागिरि |
| देवता | जगन्नाथ | आदिवाराह | सिद्धेश्वर | नारायण |
| तीर्थ | महोदधि | तुंगभद्रा | गोमती | अलकनंदा |
| वेद | ऋग्वेद | यजुर्वेद | सामवेद | अथर्ववेद |

हा तक्ता बद्रीनाथचे आवारामध्ये भिंतीवर लावलेला आहे

## बद्रीनाथ

हे स्थान समुद्रसपाटीपासून १०२४४ फूट उंच आहे. बदरी म्हणजे बोर पुरातन काळी येथे बोराच्या झाडांचे मोठे वन होते. हे क्षेत्र अलकनदा नदीच्या तीरावर वसले आहे अलकनंदेच्या उजव्या तीरावर गावाच्या मध्यभागी बद्रीनाथाचे मदीर आहे. बदरीनारायणापासून सहा मैलावर लक्ष्मीवन आहे त्याच्या जवळ अलकापुरी आहे. तिथे सतोपथ पर्वतातून आलेले हिमप्रवाह एकत्र मिळतात त्यातून अलकनंदेचा उगम होतो हे स्थान १४४०० फूट उंचीवर आहे. अलकनंदेच्या उजव्या तीरावर ब्रह्मकपाल नावाचा एक प्रशस्त भुईसपाट खडक आहे. त्या ठिकाणी जाऊन पितरांचे श्राद्ध अवश्य करावे असे सांगितले असून. बदरीमाहात्म्यात त्याचे फळ सांगितले आहे ते असे, "पुत्राने अथवा दुसऱ्या कोण्या आप्तस्वकीयाने ब्रह्मकपाळावर पितरांना पिंड द्यावा. ज्याच्या नावाने तो पिंड दिला असेल, तो सनातन अशा ब्रह्मलोकाला जातो "

त्यामागची एक कथा सागतात. ब्रह्माची मुलगी सरस्वती. ती स्वरुपवान होती तिचे सौंदर्य पाहून ब्रह्माचे मनात वाईट भावना निर्माण झाली या घोर अपराधाबद्दल शिवशंकराला क्रोध आला आणि रागाचे भरात त्याचे शिर तोडले परंतु ते शकराच्या हाताला चिकटले ते सोडवण्यासाठी बदरीनाथाला जा आणि तेथे तपश्चर्या कर म्हणून सांगितले. बदरीनाथाला आल्यावर अलकनदेच्या तीरावर या ब्रह्मकपाल तीर्थ जिथे आहे तेथे ते मुडके गळून पडले. येथे पिंडदान केले असता पितर मोक्षाप्रद जातात ही श्रद्धा आहे. ब्राह्मणाने आम्हास भाताची १६ पिंडे करावयास सागितली. ती १६ पितराचे नावाने अलकनंदेमध्ये सोडली. येथे पिंडदान केल्यावर १००० वर्षे श्राद्ध पक्ष करावी लागत नाहीत असे सागतात

या क्षेत्रात पाच तीर्थे असून त्यात स्नान करावे असे सांगतात. १) ऋषिगगा, २) कूर्मधारा, ३) प्रल्हादधारा, ४) तप्तकुड व ५) नारदकुड परतु सर्वसाधारणपणे यात्रेकरू तप्तकुंडामध्ये स्नान फक्त करतात कारण ते पाणी गरम असते स्त्रियांसाठी स्वतत्र स्नानाची सोय तेथे आहे

या कुडाच्या खालच्या अंगाला गरुडशिला, नारदशिला, मार्कंडेय

शिला, नरसिंह शिला व वाराही शिला अशा पाच शिला आहेत

यात्रेकरू दर्शन करताना प्रथम केदारनाथचे करतात. मग बद्रीनाथाचे करतात. याविषयी खालील कथा गढवाली लोकगीतामध्ये मिळते.

शिवशकर बदरी वनात पार्वतीसह राहत होते एकदा ऋषिगंगेच्या दक्षिण तीरावर पार्वतीला एक नवजात बालक रडत असलेले दिसले. ते नारायणाचे बाल रुप होते. पण पार्वतीला ते कळले नाही शिवाने बालकाकडे लक्ष देऊ नये असे सांगितले परंतु पार्वतीला मातेचा कळवळा आला आणि त्या रडणाऱ्या बालकाला उचलून शात केले आणि आश्रमातील गुहेत नेऊन झोपवले. नंतर शिव पार्वती तप्तकुडावर स्नान करण्यास गेले. परत येतात तो गुहेचे दार आतून बद. पार्वतीने बरेच प्रयत्न केले. दार उघडले नाही. शंकराने सागितले की या बालकाच्या मोहात तू पडू नकोस. ऐकले नाही. पार्वतीला पश्चात्ताप झाला. एवढ्यात गुहेतून गंभीर वाणी उमटली, "शिवमहाराज, हाताला मुंडके चिकटले म्हणून तुम्ही इथे आला होता आता ते गळून पडले आहे तुमचा कार्यभाग झाला आहे. तुम्ही परत केदारनाथ मुक्कामी जावे माझे भक्त प्रथम तुमचे दर्शन करतील. मग माझे दर्शन करतील"

## श्री बदरीनारायण स्तुती

पवन मन्द सुगन्ध शीतल, हेम मंदिर शोभितम्।
निकट गगा बहत निर्मल, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम्॥१॥
शेष सुमिरन करत निशिदिन, ध्यान धरत महेश्वरम्।
श्री वेद ब्रह्मा करत स्तुति, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम्॥२॥
इन्द्र चन्द्र कुबेर, दिनकर, धूप दीप प्रकाशितम्।
सिद्ध मुनिजन करत जयजय श्री बद्रीनाथ विश्वम्भरम॥३॥
शक्ति गौरी गणेश शारद, नारद मुनि उच्चारणम्
योग ध्यान अपार लीला, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम्॥४॥
यक्ष किन्नर करत कौतुक, ज्ञान गन्धर्व प्रकाशितम्।
श्री लक्ष्मी कमला चवर डोले, श्रीबद्रीनाथ विश्वम्भरम्॥५॥
कैलाशमे एक देव निरंजन, शैल शिखर महेश्वरम्।

राजा युधिष्ठिर करत स्तुति, श्री बद्रीनाथ विश्वम्भरम्॥६॥
श्री बद्रीनाथजी की करत स्तुति, होत पाप विनाशनम्।
कोटि तीरथ भयो पुण्य, प्राप्त ये फल दायकम्॥७॥

या क्षेत्रामध्ये हिवाळ्यामध्ये दहा ते पंधरा फूट उंचीचे बर्फ पडते म्हणून मार्गशीर्ष ते वैशाख देऊळ बंद करून नारायणाची उत्सवमूर्ती खाली जोशी मठात आणून ठेवतात. व पूजा अर्चा करतात वैशाखात बर्फ वितळून गेल्यावर उत्सवमूर्ती परत बदरीनाथाला नेतात. त्या दिवसापासून बदरीनाथाची यात्रा सुरू होते.

बदरीनाथापासून काही मैलावर भारताची सीमा संपून तिबेट/चीनची सीमा लागते. म्हणून या रस्त्यांना बॉर्डर रोडस् असे म्हणतात व त्याची देखभाल सीमा सडक संघटन मत्रालयातर्गत संघटनेतर्फे चालते. म्हणून हे रस्ते चांगल्या तऱ्हेने साभाळलेले दिसतात

**बद्रीनाथाहून परत**

बद्रीनाथ आम्हाला सकाळी ६ वाजता सोडावयाचे होते म्हणून आज लवकर उठलो. आजही ४। वाजता 'गरम पाणी' म्हणून माणसे आली होती. ५ रुपये डबा याप्रमाणे पाणी घेतले. नंतर कळले की हे लोक बद्रीनाथाचे मंदीराखालचे तप्त पाण्याचे कुडामधून हे डबे भरून आणतात. परतु आमची सोय झाली अघोळ झाली. कपड्यांची/सामानाची परत बाधाबांध झाली एवढ्यात चहा आला. घेतला आणि बसमध्ये बसलो.

येथे गेटस् आहेत. पहिले गेट ६-३० वाजता उघडतात म्हणून मोटारीचा नंबर लावायचा होता. या अर्ध्या तासात अनेक विक्रेते विविध वस्तू विकण्यासाठी येतात. अनेकांनी सिनेमा म्हणजे येथील विविध चित्र डोळ्यांना लावून दिसतात ते घेतले ८ रुपये किंमतीला. मी काही पुस्तके विकत घेतली. काहींनी कागद झाडाची साल असलेल्या त्यावर लिहितात तो घेतला. भूर्जपत्र, ताडपत्र, नकाशे घेतले, माळा, मणी घेतले, रुद्राक्ष माळा विकत घेतल्या यात्रेकरूनी अशा वस्तू विकत घेतल्या की विक्रेत्यांच्या पोटाला मिळते म्हणून माझी आता

खात्री झाली आहे की अशा लोकांकडून वस्तू जरूर पण पारखून घ्याव्यात. येथे अर्थशास्त्र मला दिसते. जीवो जीवस्य जीवनम्।

**नीलकंठ पर्वत**

येथील सर्वात मनमोहक दृश्य म्हणजे नीलकंठ पर्वताचे दर्शन. हे शिखर सदैव बर्फाच्छादित असते तो बदरीनाथाच्या पश्चिमेस पाच मैलावर २१४६० फूट उचीवर आहे. दोन्ही बाजूला पर्वत. मध्यभागी हा पर्वत. हिमशिखरांनी समृद्ध दिसला नीलकठासारखा शकरपाळ्यांसारखा तिरका आयताकार. हिमालयाच्या कठामध्ये हा नीलकंठ शोभून दिसतो. परत परत पाहावे, डोळ्यांत आजन्म साठवावे असे हे दृश्य आहे. नजर काढावीशीच वाटत नव्हती शेजारी नर पर्वत आणि समोरील नारायण पर्वत आहे हा दोन्ही पर्वतांच्या मध्यभागी अलकनंदेच्या किनारी बद्रीनाथ वसले आहे.

येथून या तीर्थाचा देखावा छान दिसतो समोर बद्रीनाथाचे मंदीर. त्याशेजारी तप्तकुंडे. सर्वात उजव्या बाजूला ब्रह्मकपाळ आणि मध्यभागी पूल आणि त्या अलीकडे छोटी दुकाने- काही हॉटेल्स. असे हे छोटे गाव वसले आहे. रस्त्याच्या बाजूस अनेक आश्रम, धर्मशाळा आणि उत्तरप्रदेश सरकारच्या पर्यटन विभागाचे यात्री विश्राम धाम

या छोट्या ब्रह्मनगरीचा निरोप घेताना मनात रूखरूख वाटत होती. यात्रा परिपूर्ण झाली. परंतु आता आपल्याला परत यायला मिळेल का? का ही पहिली आणि शेवटचीच भेट? पढरपूरची यात्रा पुरी झाल्यावर वारकरी पंढरपूरच्या मंदीराचे शिखराकडे वळून वळून पाहतात. त्याची आठवण झाली.

बदरीनाथहून आम्ही परत निघालो. प्रथम रडाग हिमनग लागला नतरच्या २० मिनिटाचे प्रवासात १५/२० हिमनग लागले. नतर हनुमानचट्टी लागले. तेथपासून दीपमाळेसारखे असंख्य वृक्ष दिसत होते लंबागड येथे नदीचे पात्र व रस्ता एकाच पातळीमध्ये दिसले. येथे नदीचे पात्रात मोठ मोठे ३० फूटी पहाड दगड दिसले. पांडुकेश्वर येथे गेट उघडण्यास वेळ होता म्हणून थांबलो. येथपर्यंत १०४० मीटर आम्ही ५० मिनिटात खाली आलो होतो विचार सुरू झाला. आयुष्यात



प्रयास

प्रगती करायची असेल, चढण चढण्यासाठी खूप वेळ श्रम लागतो. परंतु उतरण लागली की माणूस थोडक्या वेळात गडगडतो. अधोगती व्हावयास वेळ लागत नाही. या प्रवासात अनेक प्रकारचे पूल लागले. Bailey Bridge, Inglis Bridge, Taya Bridge ही पुलाच्या प्रकाराची नाव. थोडक्या जागेमध्ये तरगते पूल बाधणे हे तत्र येथे अवगत असावे लागते.

**प्रयाग**

यात्रेमध्ये दिसणारे नद्यांचे संगम अथवा प्रयाग .- बद्रीनाथचे प्रवासात आपणास विविध नद्यांचे संगम पाहावयास मिळतात. दोन नद्यांचा संगम पाहावयास मिळतात. दोन नद्यांच्या संगम आपणास खालील ठिकाणी दिसतो.

त्यात एक मोठी नदी असते. तिला छोटी नदी मिळते. छोटी नदी मोठ्या नदीला मिळाल्यावर छोट्या नदीचे अस्तित्त्व सपते. नावही विलीन होते

देवप्रयाग गगोत्रीहून निघणारी भागीरथी आणि बद्रीनाथावरून येणारी अलकनंदा याचा संगम येथे होतो. येथून भागीरथीला गंगा म्हणतात

रुद्रप्रयाग केदारहून निघणारी मदाकिनी व बदरीनाथ येथून निघालेली अलकनदा यांचा संगम येथे होतो

कर्णप्रयाग पिंडरी नदी आणि अलकनदा याचा संगम येथे होतो

नंदप्रयाग . मंदाकिनी आणि अलकनंदा यांचा सगम येथे होतो

विष्णुप्रयाग : अलकनंदा आणि धौली गंगा याचा संगम

पाण्याचे रगही वेगळे दिसतात. हे सर्व संगम अलकनदा नदीशी होतात.

सर्वात मोठा सगम म्हणजे प्रयागराज अलाहाबाद जवळील येथे गगा, यमुना व अदृश्य सरस्वती या तीन नद्याचा संगम होतो येथपासून गंगा ही महानदी वाहते. यमुना आणि सरस्वती या नद्याचे अस्तित्त्व सपते.

**श्रीनगर**

अलकनंदा नदीच्या तीरावर वसले आहे. ही पूर्वी गढवाल प्रदेशाच्या

राजाची राजधानी होती. गढवाल विद्यापीठ तेथे आहे ऋषिकेश, कोटद्वार, टिहरी गढवाल आणि बद्रीनाथ येथे जाणारे रस्ते येथे मिळतात.

बद्रीनाथहून परत येताना आम्ही श्रीनगर येथे रात्रीचा विश्राम घेतला हे मोठे ठिकाण आहे येथे मोठमोठ्या धर्मशाळा, आश्रम आणि हॉटेल्स, लॉजेस आहेत आम्ही शासकीय यात्री भवनामध्ये थाबलो होतो. येथे डॉर्मिटरी आहेत. एका हॉलमध्ये ८/१२ बिछाने मावतात. त्यांना जवळच भरपूर संडास, बाथरूम, वीज, पाणी, आरसे, पंखे आहेत. स्वच्छता छानपैकी आहे. येथे जेवणाची पण सोय आहे ऑर्डरप्रमाणे पदार्थही करून मिळतात आधी रिझर्वेशन करून जागा राखून ठेवता येते

तेथेच खालच्या बाजूस उत्तर प्रदेश सरकारचे पर्यटन विभागाची कचेरी आहे. यात्रेकरूना येथे विविध प्रकारची माहिती, माहिती पुस्तिका मिळतात आम्ही गेलो तेव्हा तेथे गढवाल विकास निगमातर्फे कपड्यांचे व इतर वस्तूचे प्रदर्शन भरविले होते. प्रदर्शन रात्री १० पर्यंत उघडे होते याशिवाय समोरच्या पायऱ्यावर तिबेटी विक्रेते ऊनी शाली, स्वेटर्स, टोप्या, कानावर गुंडाळण्याच्या पट्ट्या इत्यादी साहित्य विकीत होते. घासाघीस केल्यानंतर किंमती ३० ते ४० टक्के कमी होत होत्या. ज्याला बाजाराची माहिती असेल त्याने जरूर खरेदी करावी. बद्रीनाथला जाताना आम्ही येथे थोडा वेळ भोजनासाठी थाबलो होतो. डालमिया शेठजींची धर्मशाळा मोठी आहे. स्वस्त आहे. खोलीमध्ये दोन बेड, पलग आहेत. खाली मॅटिंग जवळ सडास बाथरूम, मोठमोठ्या रजया व अथरूण भाड्याने मिळतात

## हिवाळ्यामध्ये उत्सव मूर्तींची स्थापना

चारीधाम दहा हजार फूट उंचीवर आहेत त्यामुळे तेथे सहा महिने बर्फ असते. सहा महिने बर्फ नसते. म्हणून या कालखडात यात्रेकरू येत असतात. साधारणत मे ते ऑक्टोबर हा कालखड यात्रेचा असतो बर्फ पडायला लागले म्हणजे हिवाळ्यात मदीराचे दरवाजे बंद करतात. आणि उत्सव मूर्ती खाली आणून ठेवतात पूजा अर्चा करतात. त्यांची जागा खालील प्रमाणे आहे.

यमुनोत्री खरसाली (जानकी चट्टीसमोरचे गाव)

| | |
|---|---|
| गंगोत्री | मुखवा खाली उतरल्यावर हे गाव आहे. |
| केदार | उखीमठ येथे (गुप्तकाशी समोर) मूर्तीस्थापना करतात. |
| बद्रीनाथ | जोशी मठ येथे मूर्ती स्थापना करतात. |

हरिद्वार ते हरिद्वार : हा १५०० किलोमीटरचा प्रवास आहे. दररोज अदाजे १५० किलोमीटर प्रवास होतो.

**प्रकरण ६**

# ऋषिकेश व हरिद्वार दर्शन

श्रीनगर ते ऋषिकेश हे ३ तासांचे अतर. आम्ही ऋषिकेशला ११। चे सुमारास पोचलो तेथे भगवान आश्रम हरिद्वार रोडवर आहे. तेथे उतरलो येथे यात्रा कंपन्यानी स्वत: स्वयपाक करून यात्रेकरूना भोजन देण्याची सोय आहे.

यात्रेकरू त्रिवेणी घाटावर स्नानासाठी गेले आणि तासभरात परत आले. तोपर्यंत स्वयपाक होत होता. आमच्यातील एक यात्रेकरू श्री प्रभाकर कुलकर्णी याचे लग्नाचा वाढदिवस त्या दिवशी होता त्यांना आम्ही शुभेच्छा दिल्या त्यांनीही स्वीट डिश म्हणून गुलाबजाम आणले. ताटे वाढली. त्याचे ताटाभोवती सौ. ठाकरे आजींनी रांगोळ्या काढल्या. श्री व सौ कुलकर्णी यांना आपल्या लग्नाचा वाढदिवस सर्व यात्रेकरू उत्साहाने साजरा करीत आहेत हे अप्रुप वाटले. आनदाश्रू दाटले. आनदले काकडे पतीपत्नींचा लग्नाचा वाढदिवस ३ मे रोजी होता. त्यांनाही रांगोळ्या काढून शुभेच्छा दिल्या. जोडप्यांची नावे घेण्याचा

उखाण्याचा कार्यक्रम झाला.

**नीलकंठ महादेव दर्शन**

ऋषिकेशमधील जरा बाजूला असलेले ठिकाण म्हणजे नीलकंठ महादेव. यांचे दर्शन दुपारी केले येथे जाण्यासाठी जीप गाड्या व टॅक्सी मिळतात. जाऊन-येऊन येथून २४ किलोमीटरवर डोंगरात आहे. चढ आहे. परंतु एक तासात पोचलो. फुले पूजेचे ताट घेतले. १५ पायऱ्या चढून गेल्यावर मंदीर लागते. प्रथम नदी नंतर नीलकंठ महादेव याचे मंदीर आहे. जमिनीतून शिवलिंग बाहेर आले आहे त्याची पूजा करतात.

पूजा अर्चा करून आम्ही परत निघालो. आणि ४० मिनिटात परत ऋषिकेश येथे आलो. प्रवासात ड्रायव्हरशी गप्पा झाल्या त्याने सांगितले की श्रावण महिन्यात येथे फार गर्दी होते. एकट्या हरयानातून येथे ४/५ लाख यात्रेकरू येतात. अनेकजण हा प्रवास पायी करतात इतर प्रातातूनही हजारो यात्रेकरू येतात कल्याणसिंग सरकारची त्याने स्तुती केली. त्याचे सरकारने गुंडगिरी कमी केली. अनेक गुंडाना त्यांनी गजाआड केले. नियम केले त्यानुसार काम होई. त्यामुळे प्रजा कल्याणसिंग सरकारवर खूष आहे परत निवडणूका झाल्यावर कल्याणसिंग जिंकतील असे त्याने छातीठोकपणे सांगितले.

**स्वर्गाश्रम**

ऋषिकेशला पाहण्याची खूप ठिकाणे आहेत. स्वर्गाश्रम हे असेच स्थान. येथे बाबा काली कमलीवाले यांचे वास्तव्य होते. आज तेथे मोठा ओटा आहे. त्यामध्ये बाबांचा फोटो, पुतळा, इतर फोटो आहेत खाली मॅटिंग आहे. सर्वजण तेथे विश्रांती घेतात. समोर थंड पाणी पिण्याची सोय आहे आत विश्रामाची सोय आहे. येथे भजन, कीर्तने, प्रवचने चालू असतात. गर्दीही भरपूर असते. अन्नछत्रे चालू असतात

**बाबा काली कमलीवाले**

यांचे पूर्वीचे नाव स्वामी विशुद्धानंद. यांनी सन १८८४ मध्ये उत्तराखंडातील यात्रा केल्या. यात्रेमध्ये अनेक अडचणी आल्या पाणी नाही निवारा नाही. आजारी पडले तर दव्याची सोय नाही खूप हाल झाले. हे हाल यापुढील यात्रेकरूंना होऊ नये म्हणून प्रथम कलकत्ता येथे

जाऊन पैसे जमा केले. नंतर आयुष्यभर पैसे जमा करत यात्रेकरूच्या सोयीसाठी जागजागी धर्मशाळा, मोफत निवारा, पाण्याची सोय, दवाखाने यांची स्थापना केली. स्वामीजींनी १८९७ मध्ये देह ठेवला. त्यावेळी नऊ सदावर्ते चालू होती. अन्नछत्रे सुरू केली. त्यांचे नतर बाबा रामनाथ यानी हे काम चालू ठेवले - २९ वर्षे त्याचेनतर १९२६ मध्ये बाबा मणीराम यानी याचा विस्तार केला. नंतर त्यांनी हा कारभार विश्वस्त मंडळाकडे सुपूर्त केला मुख्य कचेरी कलकत्ता येथे आहे. स्वामीजी अगावर एक लंगोटी व एक काळ्या कबळ्याची कफनी वापरीत. म्हणून त्याना बाबा काली कमलीवाले म्हणत. या धर्मशाळेमधून सर्वांना मोफत निवारा, अन्न, पाणी, कांबळे मिळतात.

**गीता भवन**

गीता भवनामध्ये सर्व गीता भिंतीवर कोरली आहे. तेथे निवास, तपस्या, भजन, भोजन यांची व्यवस्था आहे विविध खोल्या आहेत अनेक जण येथे येऊन बराच काळ राहतात याचे वैशिष्ट्य म्हणजे गीता प्रेस, गोरखपूर यांची प्रकाशने येथे विक्रीस ठेवली आहेत. गीता प्रेसचे वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या अक्षरांची व स्वस्त किंमतीची शेकडो प्रकाशने.

**परमार्थ निकेतन**

हे असेच एक प्रेक्षणीय स्थान झाले आहे विष्णूच्या विविध अवतारांच्या मूर्ती येथे विविध हॉलमध्ये आहेत त्यामुळे भारताच्या महान परपरेचे स्मरण होते. येथे राहणे, भोजन, कीर्तन, प्रवचन, सत्सग यांची व्यवस्था आहे

**बारा ज्योतिर्लिंग भवन**

भारतामध्ये बारा ज्योतिर्लिंगे आहेत प्रत्येक मजल्यावर एका ज्योतिर्लिंगाची माहिती दिली आहे. अर्थात् आम्ही सर्व मजले पाहिले नाहीत. तळमजल्यावरच हिंडलो कारण पाय दुखायला लागले.

लक्ष्मण झूल्याच्या उत्तरेस अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत मदीर आहेत. तसेच खाण्यापिण्याची दुकाने आहेत

### चारी धाम

त्यासमोर मोठी इमारत आहे. एका मजल्यावर चारी धामांची प्रतिकृती आहे. उत्तराखडाचा नकाशा आहे.

### मार्केट

येथे अनेक दुकाने आहेत. त्यात विविध प्रकारच्या शाली, स्वेटर्स, कपडे, साड्या, विविध प्रकारचे शर्ट कापड विकत मिळते अनेकांनी लोकांना भेट देण्यासाठी भेट वस्तू विकत घेतल्या

### लक्ष्मण झूला

जवळच लक्ष्मण झूला आहे. त्यावरून अनेक प्रवासी चालत जातात

येथून परत आम्ही स्वर्गाश्रम येथे आलो बोटींमधून पलीकडले किनाऱ्यावर गेलो तेथून टेंपो करून भगवान आश्रमाला गेलो. तेथे इतर यात्रेकरूचे बरोबर हरिद्वार येथे परत कणखल येथे पोचलो रात्री भोजन झाले. सर्वांना खोल्या दिल्या होत्या. निद्राधीन झालो.

### ऋषिकेशचे महत्त्व

ऋषिकेशाचे महत्त्व म्हणजे गंगा. येथे ती हिमालायातून येऊन स्थिरावते. पठारावर धावू लागते. त्यामुळे गगेचे पात्र मोठे आहे प्रवाहात मोठाले दगड गोटे फारसे नाहीत. तसा प्रवाह हिमालयाचे मानाने सथ. आपल्याबरोबर येताना ती वाळू आणि माती घेऊन येते. त्यामुळे ऋषिकेशचा विस्तार या नदीचे दोन्ही तीरावर झालेला आढळतो. लक्ष्मण झूला हे एक टोक आणि नव्याने झालेला राम झूला हे दुसरे टोक. या टोकामध्ये अंदाजे १५ किलोमीटर अतर आहे. मुबई शहर जसे सरळ वाढले आहे तसे ऋषिकेशही वाढले आहे.

ऋषिकेश हे असे स्थान आहे की एका दिवसात घाईघाईने येथील आश्रम, भवने आणि स्थळे पाहता येत नाहीत. त्यासाठी सवड काढून ४/५ दिवस येथे जरूर राहावे येथे सत्संग चांगला लाभतो ज्याला काही धर्म, तत्वज्ञान, योग, अध्यात्म या प्रागणात अधिक अभ्यास, श्रवण, मनन, चितन करावयाचे असेल त्याने येथे अवश्य ८/१५ दिवस, महिना मुक्काम करावा. ससारातील दैनंदिन पाश बाजूला ठेवून भगवताचे चिंतन करता येते. स्वत.चे मनाची मशागत येथे करता

येते. सात्विक आहार, थंड हवा, पाचक पाणी आणि गोंगाट, रोजच्या कामातील धावपळ त्यामुळे मनावर पडणारा ताण बाजूला करण्याचा मार्ग येथे सापडतो. डॉक्टर व इस्पितळ येथे जाऊन खर्च करण्याऐवजी ऋषिकेशला मुक्काम केल्यास आरोग्य-शारिरिक आणि मानसिक-प्राप्त होईल. असे अनेक जण सध्या ऋषिकेशला जाऊन राहत असतात निसर्गोपचार अनायासे येथे मिळतो.

**हरिद्वार दर्शन**

आज सर्व दिवसभर हरिद्वार येथे घालवावयाचा होता. चारी धाम यात्रा सुरू करताना येथे आलो होतो. आणि सकाळी हरीकी पायरी येथे गंगास्नान केले होते आणि संध्याकाळी मार्केटमध्ये हिंडून प्रवसासाठीची खरेदी, सायकाळची गगामैयाची आरती पाहायची होती. परंतु हरिद्वारला पाहण्याची आणखी बरीच ठिकाणे आहेत म्हणून एक दिवस हरिद्वारला आणखी राहून तेथील काही तीर्थस्थळे पाहिली.

**कणखल**

कणखल यालाच मायापुरी म्हणतात. प्रथम आम्ही कणखल येथील गंगेच्या तीरावर गेलो. तिला घाट आहे. तेथे स्नान करतात. आम्ही फक्त पाद प्रक्षालन केले आणि तेथील प्रजापती दक्षचे यज्ञकुंड आहे दक्षेश्वर महादेवाचे मंदीर आहे. तिचे दर्शन घेतले.

**प्रजापती दक्ष आणि सतीची कथा**

कनखल हरिद्वार पासून दोन मैल दूर आहे येथे नील धारा आणि भागीरथी याचा संगम आहे. दक्ष प्रजापती याची ही राजधानी होती. ते ब्रह्माचे पुत्र होत त्याची मुलगी सती तिचा विवाह हिमालयाचे अधिपती शकराशी झाला. एकदा दक्ष महाराजाने राजसूय यज्ञ केला यासाठी त्याने राजेमहाराजे, देव, ऋषिगण याना बोलावले परंतु या समयी त्याने आपली मुलगी सती आणि जावई शिवशंकर यांना बोलावले नाही. कारण त्याचे असे आहे की एकदा दक्ष राजाने ऋषींची सभा बोलाविली होती परंतु शकराने दक्षास नमस्कार केला नाही. त्यामुळे दक्ष राजास राग आला म्हणून बोलावले नाही. राजे महाराजे देवता वडिलांच्या यज्ञामध्ये भाग घेण्यासाठी जात असताना सतीने पाहिले.

म्हणून ती शकरासह यज्ञात भाग घेण्यासाठी निघाली. शंकराने आमत्रण नाही म्हणून जाण्यास नकार दिला आपल्या वडिलांच्या आणि गुरुच्या घरी जाण्यासाठी आमत्रण लागत नाही असे सतीने सागितले. म्हणून शकराने तिला जाण्यास संमती दिली परंतु स्वत. गेले नाही. सती यज्ञात भाग घेण्यासाठी गेली परतु तिचा आदर सत्कार दक्ष राजाने केला नाही. आपल्या नवऱ्यालाही बोलावले नाही हा तिने अपमान समजला. यास्तव तिने यज्ञकुण्डात उडी टाकून आहुती दिली. शिवशंकरास ही बातमी समजली. तो रागावला. त्याने आपला मुलगा वीरभद्र यास यज्ञ नष्ट करण्यास सागितले त्याने दक्ष राजाचे शीर तोडून ते यज्ञकुंडात टाकले हे पाहून देवता आणि ऋषींनी महादेवाची क्षमा मागितली. आणि प्रार्थना केली की यज्ञ थाबवणे अशुभ आहे. तो पुरा व्हावयास हवा. म्हणून शंकराने दक्ष राजास जिवत केले. आणि तेथे असलेल्या बकऱ्याचे शिर त्याला जोडले आणि त्यास जिवंत केले. त्यानतर दक्ष राजाने बकऱ्याच्या भाषेत बम्-बम् शब्द उच्चारून शंकराची स्तुती केली. आणि प्रसन्न होऊन यज्ञ पुरा करू दिला. याची स्मृती म्हणून दक्षेश्वर महादेव याचे मदीर उभे केले आहे गंगेतील पाणी लोट्यात घेऊन महादेवाचे पिंडीवर जल चढाना घालतात. कनखल-ज्वालापूर मार्गावर सतीचे कुड आहे. कोठलेही धार्मिक कृत्य पतीशिवाय करता कामा नये ही जाणीव सतीने निर्माण केली आहे. सतीचा घाट पण गगेवर आहे.

दक्षेश्वर मंदिरात एका ठिकाणी यज्ञकुंड आहे. येथे सतीने प्राणाहुती दिली. दुसऱ्या भागात शिवलिग आहे. त्यावर भक्त गंगेचे पाण्याने अभिषेक करतात मदीराचे भितीवर शिवशंकर आणि दक्ष प्रजापती यांचे संबंधित रगीत चित्रे रेखाटली आहेत

### सतीकुंड आणि सतीघाट

या मदिराचे थोडे जवळ सतीचे कुण्ड आणि सतीचा घाट आहे. यात्रेकरू शेजारील गंगा घाटावर स्नान करतात नंतर सतीकुण्डावर पुष्पे वाहतात.

या समोर एक भिंत आहे तिच्या वीटा फार पुरातन आहेत असे

सागतात.

**शक्तिपीठ आणि सतीचा पुनर्जन्म**

सती दहन झाली शिवजी व्याकुळ झाले आणि तिचे शरीर घेऊन हिंडू लागले. विष्णूने तिचे तुकडे करून ते भूमीस अर्पण केले हे ५१ ठिकाणी पडले त्यांना शक्तिपीठे म्हणतात.

सतीला परत महादेवाशी विवाह करावयाचा होता. म्हणून तिने पुनर्जन्म घेतला या जन्मात सतीचे मातेचे नाव मेनका होते. तिच्याप्रमाणे ही मुलगी पण रुपवान होती. तिला पार्वती म्हणतात. तिला आजही जगज्जननी, आदिशक्ती म्हणतात. तिची पूजा भारत वर्षात आजपर्यंत केली जात आहे.

**हरिहर आश्रम, कणखल**

**रुद्राक्षाचे झाड**

या आश्रमामध्ये रुद्राक्षाचे झाड आहे. भगवान शकराच्या डोळ्यातून जे अश्रू पडले ते तारण्यासाठी आहेत हे अश्रू म्हणजे रुद्राक्ष. रुद्राक्ष अनेक मुखाचे असतात. रुद्राक्षाचे मणी असतात. याच्या मण्याला खरबुजाच्या फाकेप्रमाणे रेषात्मक भाग असतात. त्याना मुख असे म्हणतात या मण्यांना एकापासून चौदापर्यंत मुखे असू शकतात योगसारात या मुखांना विविध देवताची प्रतीके मानली आहेत॰ एक मुखी रुद्राक्ष शिवाला प्रिय असतो तो शुभ मानतात हा रुद्राक्ष असेल तर तिथे लक्ष्मीचा स्थिर निवास असतो अशी समजूत आहे नेपाळमध्ये हे सर्व राजाचे मालकीचे असतात महाशिवरात्रीचे वेळी पशुपतीनाथ मदीरात तीन दिवस पूजा पाठ चालतो. शेवटचे दिवशी प्रसाद म्हणून खिचडी देतात त्यामध्ये एक मुखी रुद्राक्ष घालतात या प्रसादात ज्याना एकमुखी रुद्राक्ष मिळतात ते भाग्यवान होत एकमुखी दुर्लभ असतात. दोन मुखी द्विमुखी रुद्राक्ष शिव आणि शक्ती याचे प्रतीक आहे. त्रिमुखी रुद्राक्ष त्रिदेव (ब्रह्मा, विष्णु आणि महेश) यांचे प्रतीक वेदत्रय, लोकत्रय, आश्रमत्रय यांची प्रतीके चार मुखी चतुर्मुखी चतुर्ब्रह्म स्वरुपी आहेत पचमुखी शिवस्वरुप आहे सहामुखी कार्तिकियाला, सातमुखी आदिशेषाला, अष्टमुखी गणेशाला, नवमुखी भैरवाला, दशमुखी विष्णुला, एकादशमुखी

एकादशरुद्राला, बारामुखी सूर्याला, तेरामुखी कामदेवाला आणि चौदामुखी शिवाला प्रिय असतो रुद्राक्ष चार रंगाचे असतात पांढरा रंग सर्वात चांगला. त्या खालोखाल तांबडा, नंतर पिवळा, काळा रुद्राक्ष सर्वात हीन होय रुद्राक्षाच्या माळा अंगावर धारण करणे शुभ मानतात. मंत्रजपासाठी एकशे आठ मण्यांची माळ असते.

रुद्राक्षाचे झाडाला एप्रिल मे महिन्यात फुले येतात. त्याची फळे वाळली म्हणजे रुद्राक्ष मिळतात. या रुद्राक्षाच्या माळा विकत मिळतात. नकली रुद्राक्ष शोधावे लागतात.

## पारद शिवलिंग

जगातील सर्वात मोठे १५० किलो वजनाचे पाऱ्याचे शिवलिंग येथे आहे. त्याचे उद्घाटन त्यावेळचे राष्ट्रपती श्री झैलसिंग यांनी केले.

## पावन धाम

हे मजेदार मंदीर आहे हे शीखानी उभे केले आहे. सगळीकडे रंगीत चित्रे आहेत आणि आरसे आहेत आरशामध्ये एका चित्राच्या अनेक प्रतिकृती दिसतात. भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन याचे रथावर आरुढ मोठे चित्र आहे. महाभारतामधील हे दृश्य आहे हस्तिनापूर कुरुक्षेत्री ज्यावेळी पांडव कौरवाच्या सेना एकमेकासमोर उभ्या ठाकल्या आणि समोर गुरू द्रोणाचार्य, भीष्म पितामह आणि बंधू पाहिले त्यावेळी अर्जुन शंकाकुल झाला. त्यावेळी श्रीकृष्ण त्यास उपदेश करतो हे दृश्य मोठे भव्य आहे. त्याच्या अनेक प्रतिकृती आरशामध्ये दिसतात. कलाकार रमेश कुन्दसिंह, शीशेवाले, १६ E ४४० बापानगर, पदमसिंह रोड, करोलबाग, नवी दिल्ली, ११०००५.

याशिवाय खालील चित्रे आहेत. लक्ष्मीनारायण, भगवान गोपाळ कृष्ण, नटराज, गणेश, शिवपार्वती, संतोषी माता, सिंहासनस्थ दुर्गा, सरस्वती, महावीर, हनुमान, शंकर पार्वती.

## कथा

कथा अशी सांगतात की एका राजाने अप्रतिम मंदीर उभे करावे म्हणून दोन कलाकाराना सांगितले. कलाकाराने रात्रंदिवस, खपून मंदीर उभे केले. त्यामध्ये ही विविध चित्रे होती दुसऱ्या कलाकाराला विचारले,

तुझी कला कोणती ती दाखव. त्याने पडदा वर केला. त्यापुढे आरसे होते. त्याने म्हटले पाहा हे चित्र. आरशामध्ये मूळ चित्राच्या अनेक प्रतिकृती दिसत होत्या. राजाने दुसऱ्या कलाकारालाही बक्षीस दिले.

या पावन धामाचे भिंतीवर विचार करायला लावणारी सुवचने लिहिली आहेत. त्यातील काही येथे देत आहे.

**पावनधाम, सप्त सरोवर मार्ग, हरिद्वार, यू. पी.**

**आरसे महालाचे भिंतीवरील सुभाषिते**

१ कबीरा यह मन लालची, समझे नही गँवार
भजन करने को आलसी, खाने को होशियार ॥

२. रहिमन धागा प्रेम का, मत तोडो चटकाय
टूटे से पुनि न मिले, मिले गाँठ पड जाय ॥

३. काम अच्छे कर लो । अच्छी जिंदगी आपकी ।
लोग भी सीखे सबक, सुनकर कहानी आपकी ॥

४. चीडी चोच भर ले गई, नदी न घटियो नीर
दान दिये धन ना घटे, कह गये दास कबीर ॥

५. मुस्कराके जिनको गमका जहर पीना आ गया
यह हकीकत है जहाँ में, उनको पीना आ गया ॥

या धाममधील काही चित्रे येथे १० रुपयाला विकत मिळतात. पावनधाम या नावाचे मासिकही ते काढतात

एक लक्षात घेण्यासारखे आहे प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी एखादी वास्तू, संस्था उभी केली की तेथे अनेक प्रवासी तर येतातच. परंतु त्याबरोबर अनेक दुकाने पण येतात आणि हजारो लोकांना पोटापाण्याला मिळते. येथे थड पेयांची दुकाने आहेत खाण्याची दुकाने आहेत तसेच अनेक वस्तू विकण्याची दुकाने आहेत. यात्रेकरूंकडील पैसा याप्रमाणे दुसऱ्याच्या खिशात जातो. पैसा खेळता राहिला पाहिजे हे खरे. आपल्या लहान मोठ्या शहरामध्येही अशी प्रेक्षणीय स्थळे आपण जरूर उभी केली पाहिजेत त्यांना प्रोत्साहन द्यावयास हवे.

## मन्सादेवी आणि उडन खटोला

हरिद्वारचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे रोप वे हिंदीमध्ये त्याला उडन खटोला म्हणतात. येथे एका डब्यामध्ये एकावेळी चार माणसे बसतात त्यामध्ये बसून तारांचे साहाय्याने येथील डोंगरावर असलेल्या मनसादेवी या देवीचे मदीरापर्यंत जातात तेथे यात्रेकरू उतरतात. देवीचे दर्शन घेतात आणि मग या रोपवेच्या डब्यातून परत हरिद्वार येथे तळाशी येतात १० रुपये तिकीट असते दुपारी १ ते २ या वेळात भोजनाची सुटी असते. त्यामुळे १२॥ वाजता तिकीट विक्री बंद असते. १५/२० डबे या मध्ये असतात ३/४ मिनिटात आपण डोंगरावर पोचतो. त्यामधून हरिद्वारचे दर्शन देखावा छान दिसतो मन्सादेवीसाठी पूजासाहित्य पाच रुपयात मिळते.

## मन्सादेवीचे माहात्म्य व कथा

ही मनोकामना पूर्ण करणारी देवी मानली जाते प्रथम श्रीकृष्णाचा फोटो आहे. त्यापुढे पैसे टाकावयाचे. नतर कुड आहे. नतर अनेक देव आहेत. देवीचे चागले दर्शन घेण्यासाठी देवीसमोरून बाहेर जावयाचे व मागे मोठी जागा आहे तेथे उभे राहावयाचे ही एक चागली व्यवस्था येथे केली आहे त्यामागे झाड आहे. झाडाचे फादीला दोरा बाधतात

संध्याकाळी आम्ही परत हरिद्वारचे बाजारात गेलो. घरच्या माणसासाठी आणि इतरासाठी भेटवस्तू घेतल्या. घरी परत गेल्यावर ''मला काय आणले?'' असा प्रश्न मुले, मुली, सुना, जावई, बहीण आणि नातवंड करणार? त्यासाठी ह्या भेटवस्तू घ्यावयाच्या असतात नतर गगाजीची आरती पाहिली. दीप असलेला द्रोण सोडला. आणि कणखल येथे परत आलो. आता घरचे वेध सुरू झाले. घरी कोण काय करीत असेल याची चौकशी करू लागलो.

ऋषिकेश प्रमाणेच हरिद्वार येथे अनेक आश्रम, मंदीरे आणि प्रेक्षणीय स्थळे आहेत हरिद्वारच्या परिसरातही ५/१० मैलाची अनेक नयनमनोहर ठिकाणे आहेत त्यासाठी ५/६ दिवस सवडीने राहावयास हवे ती सवड यात्रेकरूना नसते. त्यामुळे यात्रा कपन्या जेवढी स्थळे जेवढा

वेळ दाखवतील तेवढेच पाहावे लागते. त्याला उपाय नाही. काहीच न पाहण्यापेक्षा काही निवडक स्थळे पाहणे चांगले शितावरून भाताची परीक्षा करता येते.

**कृतज्ञता**

आम्ही वर्गणी जमा केली आणि यात्रा कंपनीचे मॅनेजर, ड्रायव्हर, क्लीनर, आचारी, कंपनीचे इतर सेवक याचा सत्कार केला काहींनी प्रश्न केला. त्याना काम केल्याबद्दल पगार मिळतो मग हे कशाला? पगारा व्यतिरिक्त माणूस जे करतो, जिव्हाळा निर्माण होतो त्याबद्दलची ही कृतज्ञता असते. कृतज्ञता हे मानवतेचे लक्षण.

**गुरूचा संदेश**

आम्ही ज्या ठिकाणी उतरलो होतो तेथील महंतांनी दोन शब्द सांगितले. ही यात्रा आयोजित केली आणि यात्रेकरूची मनोकामना पूर्ण केली म्हणून त्यांनी यात्रा कंपनीचे अभिनंदन केले आम्ही यात्रा पुरी केली म्हणून आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, ''मानवाचे जीवन ही एक लबी यात्रा आहे. या यात्रेमध्ये अनेक अडचणी येतात, सकटे येतात. या यात्रेमध्ये गुरू महत्वाचे कार्य करतो यात्रेकरूने जीवनामध्ये कोणत्या मार्गाने जावे, योग्य आणि अयोग्य मार्ग कोणता हे दाखवण्याचे कार्य सद्गुरू करतात. या तीर्थक्षेत्री आपणास अनेक सद्गुरु, साधु, महत भेटतात त्याचा सग घडतो. कीर्तन, प्रवचनाद्वारा आपल्याला मार्गदर्शन मिळते. म्हणून या तीर्थयात्रा कराव्यात अनेक वेळा कराव्यात आणि जीवन यात्रा योग्य मार्गाने करावे असा सदेश दिला

प्रकरण ७

# यात्रेचा संदेश

## पिकनिक आणि तीर्थयात्रा या मधील फरक

या यात्रेमध्ये आम्ही बडकोटला प्रथम मुक्काम केला त्यावेळी आम्ही दोन कुटुबे एकत्र एका खोलीमध्ये होतो बँकेतील एक अधिकारी व त्याच्या पत्नी आणि आम्ही पती पत्नी. तेथे गेलो तर वीज गेली. काही वेळाने पाणी पण सपले. त्यामुळे आमचे सहनिवासी रागावले अस्वस्थ झाले. आणि म्हणाले हे काय आहे? आम्ही एवढे पैसे भरले तर आम्हाला या सुविधा नको का पुरवायला? अहो हे पिकनिक आहे. मी ते शातपणे ऐकून घेतले. आणि नतर दोन आठवडे यात्रा आणि पिकनिक यामधील फरक शोधू लागलो अर्थात मी त्याना काही वेळाने उत्तर दिले. मी असे ठरविले आहे की यात्रेमध्ये कशाबद्दलही कुरकुर करायची नाही. भगवत जसे ठेवील तसे राहायचे त्यात सुख आहे समाधान आहे.

## पिकनिक म्हणजे काय ?

शब्दकोशामध्ये अर्थ दिला आहे. Pleasure party including meals out of doors पिकनिक म्हणजे दोन घटका करमणूक मजा. त्यात जेवण चहा नाश्ता ही बाहेरचाच एक उदाहरण देतो. गेल्या महिन्यात गुरुवारी मुलाला सुटी होती म्हणून त्याने गाडी बाहेर काढली म्हणाला, चला भुशी डॅमला. लोणावळ्याजवळ आहे अगे भिजली जलधारानी हा लेख सकाळमध्ये आला होता बरोबर खाण्याचे पदार्थ घेतले. खेळण्यासाठी

पत्ते घेतले. शिवाय गाण्याच्या कॅसेट्स घेतल्या मुबई पुणे रस्त्यावरून लोणावळा लागले तेथे डाव्या बाजूला वळून आम्ही भुशी डॅम बधाऱ्याकडे गेलो. तेथे अनेक कुटुबे मुबईहून मोटर कार, मधून काही स्कूटरवरून तर काही रेल्वेने आली होती. तेथे काय होते? पाण्याचा प्रवाह अडवला होता. त्याला वाट दिली होती ४०/५० फूटाची वाट वाटेच्या खाली २५/३० पायऱ्या होत्या त्यावरून पाणी खाली वाहत होते प्रवासी मंडळी त्या पाण्यात भिजत होती. एकमेकांचे अगावर पाणी उडवीत होते काही पायऱ्यावर आडवे पडून पाण्याशी धुसळण घेत होते भिजल्यावर कोणी कॉफी, चहा, वडापाव, मक्याची कणसे खात होती. काही थंड पेये घेत होती एकमेकांना म्हणत होते, "काय मजा आला" गुरुवारची सुटी मजेत गेली केवळ मजा, टाइम पास म्हणजे पिकनिक. प्रवास करून आल्यावर शिल्लक काय? शून्य.

**तीर्थयात्रा म्हणजे काय?**

मग तीर्थयात्रा म्हणजे काय? यात्रा ही पवित्र तीर्थांची असते. त्याना धार्मिक महत्व असते पवित्र तीर्थे कोणाला म्हणतात? जेथे देवाचा देवताचा वास असतो, होता त्याना पवित्र तीर्थ मानतात हिमालयाला देव लोक म्हणतात. म्हणून बदरीनाथाला जाताना फलक लागतात देवभूमीमे आपका स्वागत हो! Welcome to the valley of Gods देवभूमी ही तपोभूमी असते. अनेक ऋषि, मुनी संत माहात्मे यानी जगाचे भले होण्यासाठी अनेक वर्षे तपस्या केलेली असते. भगवंत प्रसन्न झाले वर माग म्हणाले आणि वर काय मागितला. तर 'जनजनका उद्धार', 'प्राणिमात्रका उद्धार.' भारतातील अनेक पवित्र तीर्थे नद्याच्या काठावर आहेत. यमुना आणि गगा या त्यांच्या सर्वोत्कृष्ट प्रतिनिधी नद्या म्हणजे लोकमाता जीवनदायिनी नद्या. जीवन प्रवाह वाहता हवा हे दर्शवणाऱ्या नद्या प्रवाहाचे दोन्ही काठावरील लोकांना जीवनदान देणाऱ्या नद्या. वृक्ष, लता, वेली याना जीवनदान देणाऱ्या नद्या, वृक्षाना फूले येतात, त्याना फळ येते परत त्याचे बीजापासून नवीन वृक्षांची उगवण. हे आनदचक्र चालू ठेवणाऱ्या नद्या या नद्याचा उगम, सगम, तटाकी असलेली मंदीरे. हे निसर्गाचे वैभव दाखवणाऱ्या

नद्या. त्यांचे दर्शन यात्रेमध्ये मिळते त्याचे पासून स्फूर्ती मिळते आपला जीवन प्रवाह प्रवाही रहावा. शुद्ध रहावा दुसऱ्यांवर उपकार करावा. आणि समाज प्रवाहाबरोबर मिळून मिसळून वागावे हे शिकवण देणाऱ्या.

काही पवित्र तीर्थे डोंगर, पर्वत माथ्यावर आहेत. शिव शकराची स्थाने अशा निसर्गरम्य डोंगरमाथ्यावर आपणाला आढळतात तेथे पोचण्यासाठी कष्ट घ्यावे लागतात अनत अडचर्णीना तोंड द्यावे लागते. परंतु तेथे पोचण्याची आस हवी. श्रद्धा हवी. निष्ठा हवी. आणि अशा अनंत अडथळ्यांना ओलांडून ज्यावेळी भगवंताचे दर्शन होते त्यावेळी आनंद होतो कृतकृत्यता वाटते. धन्यता वाटते काय पहा ही स्थाने उंचावर का निवडली. ती प्रदूषणापासून दूर आहेत. शांत आहेत, स्वच्छ आहेत तेथे संग्रह कशाचा नाही त्यामुळे मोह नाही. मोहामुळे येणारे काम क्रोधादि षड्रिपुंना तेथे स्थान नाही शांत, सथ, शुद्ध, निर्मल जीवनाचा आस्वाद देणारी ही तीर्थस्थाने आहेत. त्यामुळे समाधान मिळते. मनाची मशागत होते.

यात्रेमध्ये चिंतन होत गंगोत्रीला गेल्यावर गुरु कमलेश्वरची यानी यात्रा का करावी याविषयी मार्मिक विवेचन केलं. ते मी गंगोत्री या प्रकरणामध्ये दिल आहे त्या विवेचनाचे परत स्मरण करावं. प्रथम आपण गत आयुष्यात काही पाप केलं आहे का याचा शोध घ्यावा. आपण चुका काय केल्या याचे ज्ञान होण आवश्यक भविष्यकाळात त्या घडणार नाहीत हा संकल्प करण्यासाठी. यात्रेमध्ये आयुष्याचे स्वयमूल्यांकन आपण करतो. दुसरे म्हणजे पापबुद्धी विनाशाय यात्रा करावी. तिसरा हेतू आपले कर्तव्य काय याचा विसर पडू देऊ नये. कर्तव्यपरायण होना हे महत्त्वाचे चवथा हेतू परोपकार करावा. पाचवा हेतू दान करावा समाजऋण फेडणं आणि सहावा हेतू चांगले करण्याचा सकल्प सोडावा. या आश्वासनांची पूर्ती केली का नाही याचा आढावा घेण्यासाठी परत परत तीर्थयात्रा करावी हा सागावा आहे. म्हणून पढरपूरच्या यात्रेला दरवर्षी जातात. यात्रा पुरी झाली म्हणजे अत्यत समाधान वाटते. जसे गगोत्री येथे भागीरथीच्या थंड प्रवाहात स्नान केल्यावर मला वाटलं. आपली वर्षोनूवर्षेची मन:कामना फलद्रूप झाली, पूर्ण

झाली म्हणून मन उचंबळून येत. पिकनिक मध्ये अस मन उचंबळून येतं का? धन्यता वाटते का? यात्रा आणि पिकनिक यामधील हा फरक लक्षात घ्यावा.

यात्रेमध्ये आपल्या शरीर प्रकृतीची परीक्षा होते म्हणून आपली शरीर प्रकृती ठणठणीत हवी. पायी चालण्याचा सराव हवा. यात्रेत अडचणी आल्या. गैरसोय झाली म्हणून कुरकूर करावयाची नाही हा दंडक पाळावा लागतो. भगवताने जसे ठेवले तसे राहावयाचे. त्यात सुख मानावयाचे. हा स्वभाव बनवणेसाठी यात्रा हवी. हे प्रात्यक्षिक आहे. त्यामुळे इंद्रियाला वळण लागते. इतराचे बरोबर जुळवून घेणे. इतरांचा विचार आधी करावा ही शिकवण मिळते.

स्वामी अखंडानंद म्हणतात एखादे तीर्थक्षेत्र वा पवित्र स्थान पाहिले की भक्तिमान हिंदूला तेथे भगवताच्या अस्तित्वाचा अनुभव येतो आणि तसे झाले म्हणजे तत्क्षणी या क्षुद्र देहाविषयी त्याला कमालीची अनास्था वाटू लागते त्याला मृत्यू ही क्षुल्लक गोष्ट वाटते. तो आत्मसमर्पण करण्यास तयार होतो. त्याचप्रमाणे गंगा-यमुनेचा संगम लहरीमध्ये असीम शक्ती भरलेली आहे या क्षेत्री मोठमोठी पावन कार्ये पार पाडली. समाजोपयोगी महान कार्य करण्याची स्फूर्ती तीर्थक्षेत्रे देतात. तीर्थक्षेत्रे तपस्या तसेच वैराग्य शिकवतात.

माझे एक मित्र आहेत सरकारी अधिकारी म्हणून खूप वर्षे सेवा केली या कालखंडात त्यांनी तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या पूजा अर्चा केल्या. परंतु ते म्हणतात मला यात्रेचे समाधान मिळाले नाही. यात्रा करण्यासाठी माणसांनी स्वतंत्रपणे निघावे. सरकार, कंपनीच्या खर्चाने झालेला प्रवास यात्रा मानता येणार नाही परिषद, सभा, संमेलनाच्या वेळी दिलेली भेट ही यात्रा या सदरात मोडणार नाही. शक्यतो सपत्नीक यात्रा करावी पती पत्नी व कुटुंबियासमवेत केलेली यात्रा ही फलदायी मानतात म्हणून निदान प्रौढपणी यात्रा करावी

**यात्रेमध्ये काय पाहायला मिळालं?**

१) नगाधिराज हिमालयाच्या अंगाखांद्यावर आम्ही विहरलो, बागडलो हिमालयाची मानवाला देणगी म्हणजे तेथील अप्रतिम निसर्गसौंदर्य. मोठमोठे

चीड, देवदार वृक्ष, त्याची पाने फुले फळे यांचा स्वाद यात्रेकरू घेतो. असख्य जलधारा पर्वतावरून उडी मारत असतात. त्याचे नृत्य मनमोहक वाटते. त्याचा आवाज गंभीरता आणि भीषणता प्रत्ययास आणून देते. दऱ्याखोऱ्यातील कडे, कपारी, वाटा सर्वच अपरूप हिमालयाची सर्वांत महत्त्वाची देणंगी म्हणजे हिमशिखरांच्या राशी. शुभ्र, धवल, हिमशिखरे. सूर्य उगवला म्हणजे ती कांचनमय होतात. अवर्णनीय रूप. त्यावरून वाहणारे ढग, पाऊस, बर्फाचा पाऊस. हिमालयाची ही विविध रूपे डोळ्यात आयुष्यभर साठवून ठेवण्यासारखी असतात. हिमालय कशासारखा आहे ? हिमालयासारखाच

२) दुसरी गोष्ट म्हणजे निसर्गाचे श्रेष्ठत्व. मानवाने विज्ञानात कितीही प्रगती केली असली तरी ती हिमालयापुढे ठेंगणी आहे. मानवाला हिमालयावर, तेथील निसर्गावर अजूनपर्यंत स्वार होता आले नाही. म्हणून नम्र होऊन, लवूनच हिमालयावर चढावे लागते तो सागतो. बापुड्या, गर्व करू नको आपल्या पायाखालचे गोटे केव्हा घसरतील ते सांगता येत नाही म्हणून नीट पायाखाली पाहून चाल. तसेच डोंगरावरचे पत्थर केव्हा पडतील याचा नेम नाही म्हणून धीरे चल, सावधानीसे चल. सकाळी स्वच्छ उन तर दुपारी आकाश केव्हा भरून येईल आणि जोराचा वारा वाहून वर्षाव होईल हे सांगता येत नाही निसर्गाचा हा लहरीपणा जाणून घे म्हणून सतत सावध राहा त्यास तोंड देण्याची तयारी ठेव. तसेच निसर्गाची किमया पण जाणून घे. थकलेल्या यात्रेकरूंना स्नानासाठी सदैव गरम पाणी देण्यासाठी तप्तकुंडे निर्माण केली आहेत.

३) निसर्गरम्य परिसरात या चार पवित्र धाम वसले आहेत हे चार धाम जीवनाचे टप्पे आहेत, असं वाटतं. सर्व धाम दहा हजार फूट उंचीवर आहेत. जाण्याचा रस्ता दुर्गम आहे. यमुना ही लोकमाता आयुष्यभर सतत वाहत राहते. भरपूर पाणी जीवनासाठी देते. परोपकारार्थ सतां विभूतय' म्हटले आहे. यमुनोत्रीला जाण्याचा मार्ग अरुद आणि बिकट आहे. महादेवशास्त्री जोशींनी यमुनेला षोडसवर्षीय नाचणारी बागडणारी अवखळ मुलीची उपमा दिली आहे ती हुंदडत बागडत उड्या मारत

पठाराकडे धावते आहे मानवाचे हे बालजीवनाचे प्रतीक आहे बालपणात आपण शिक्षण घेतो, शरीर कमावतो अनेक सस्कार करून घेतो यमुना हे बाल जीवनाचे प्रतीक मानू या.

४) त्यानंतर जीवनाचा दुसरा टप्पा म्हणजे विवाह आणि त्यानंतरचे जीवन. गगा ही यमुनेच्या मानाने शांत, प्रौढ, संथ जीवनाची प्रतीक. विवाहानंतर मुले बाळे होतात. त्यांची बाललीला पाहण्यात आई वडिल रंगून जातात आणि माणूस या जीवनात स्थिरावतो. त्याच्या जीवनाला मुले, मुली, सासू, सासरे, नणद, भावजया या रूपाने अनेक उपनद्या मिळतात आणि जीवनौघ भरघोस होतो. फळतो, फुलतो.

५) जीवनाचा तिसरा टप्पा केदारनाथद्वारा प्रतीत होतो. केदारनाथ हे या चार धामातील अत्युच्च शिखर त्याचप्रमाणे जीवनाचे अत्युच्च ध्येय आपण ठरवावे. हे शिखर जीवनाच्या तिसऱ्या टप्प्यात ५० ते ७५ वयात प्राप्त होते. केदारनाथ सांगतो जीवनामध्ये अत्युच्च ध्येय समोर ठेवावे. ते साकार करण्यासाठी धडपडावे, धीमेपणाने चढ चढावा. थोडे पुढे गेल्यावर विहंगमावलोकन करावे. खाली घसरले तरी परत पुढे जाण्याचा प्रयत्न करावा. अपयशाने नाऊमेद होऊ नये परत पुढे जावे. हे मार्गक्रमण करताना ताल आणि तोल साभाळावा जमाखर्चाचा ताळेबद करून शिल्लक टाकण्यास शिकावे. त्या ध्येयावर श्रद्धा हवी पार्वतीने जसे उग्र तप करून भगवान शकराला, पृथिवीपतीला, कैलासनाथाला आपलेसे करून घेतले.

६) बदरीनाथ हे जीवनाच्या चवथ्या टप्प्याचे प्रतीक वाटते. बद्रीनाथ हे उच्च शिखर परतु शांत वातावरण. तप करण्यासाठी उत्तम जीवनामध्ये अनुभव गाठीशी असलेल्या तपस्वी, ज्ञानी लोकाच्या ज्ञानाचा, अनुभवाचा समाजाने फायदा करून घ्यावा हे सांगते. तप याचा आणखी अर्थ सखोल ज्ञान सारासारविवेकाचे ज्ञान जगात नित्य काय आणि अनित्य काय याचे ज्ञान. स्वार्थ आणि परमार्थ यामधील फरकाचे ज्ञान येथे नारदाने तपाचर्या केली. येथे श्री शंकराने तपश्चर्या केली. येथे व्यास मुनींनी महाभारत लिहिले श्री गणेशजींनी त्यांना साहाय्य केले येथे नर आणि नारायण वास करीत आहेत. ते विष्णुचे, श्रीकृष्णाचे अवतार.

नराचा नारायण करण्याची प्रेरणा देतात नर आणि नारायण पर्वताचे कुशीत तप्त कुंडात स्नान करून शरीर, मन पवित्र होते. त्याचे सानिध्यात राहून सतत धवल दैदीप्यमान नीलकंठ पर्वताचे नयनमनोहर दर्शन दैवदुर्लभ दर्शन. आपल्याला जीवनाचे सार्थक कशात आहे हे सांगते. बाबारे, आयुष्यभर जमा केलेले धन, संपत्ती, घरे दारे कुटुबीय हे सर्व नश्वर आहेत ते आपल्या बरोबर येणार नाहीत. त्यांचा मोह धरू नको. या सचयाचे सत्पात्री दान कर. आपल्या बरोबर निरतन आनद देणारे काय बरोबर येणार आहे त्याचा विचार कर. आणि त्या परमात्म्याला शरण जा. त्याचे नामस्मरण कर. त्यात विलीन हो त्या सन्यस्त वृत्तीने राहणाऱ्या ३२ वर्षे फक्त जीवन जगणाऱ्या आचार्य आद्य शकराचार्यांचे स्मरण कर. त्यानी आयुष्यभर भारत भ्रमण केले विरोधकांना विचाराने वश केले आणि ही भारतमाता अखड करण्याची पराकाष्ठा केली. या भारतमातेचे गायन, पूजन, सेवा कर. त्यात तुझे, तुझ्या कुटुबाचे, समाजाचे, राज्याचे, मानवतेचे कल्याण आहे

तव स्मरण संतत. स्फुरणदायी आम्हा घडो।
त्वदीय गुणकीर्तनी तनुही देशकार्यी पडो॥

या स्वातंत्र्यवीर सावरकराच्या शब्दात हा संदेश देत आहे

७) असे हे जीवनाच्या चार टप्पे/कालखंड दर्शविणारी, त्या प्रत्येक टप्प्यात करावयाची कर्तव्ये याची जाणीव देणारी, ही चारी धाम यात्रा आहे ही यात्रा प्रत्येक हिन्दूमात्राने आयुष्यातून एकदा तरी करावी. या नगाधिराज हिमालयाच्या सान्निध्यात राहून आपल्या पूर्वपरंपरा, इतिहास, सस्कृती यांचा परिचय करून घ्यावा. आणि आयुष्याचे सार्थक कशात आहे याचा शोध घ्यावा. त्यासाठी जमल्यास परत परत ही यात्रा करावी. प्रत्येक वेळा निराळा अनुभव आणि अनुभूती प्राप्त होईल. जीवनानंद मिळेल हा आनंद ही प्रचीती ही समाधी प्राप्त करण्यासाठी, बापुड्या - तू हिमालयात ये हिमालय नतमस्तक व्हायला शिकवतो. नम्रता, मधुर सभाषण, धीरे चलना, सावधानीसे चलना आयुष्यात मार्गदर्शन करतात

८) गगोत्रीचे ठिकाणी गुरु कमलेश्वरजी यानी मला उपदेश केला.

त्यावेळी त्यांनी चौकशी केली. मला दोन मुलगे आहेत. हे त्यांना सागितले. त्यापैकी एक मुलगा तरी बरोबर आणायचा होता, ते म्हणाले. खरे आहे. पूर्वीच्या काळी यात्रा खडतर होती यात्रेमध्येच पित्याचे निधन झाल्यास त्याला पाणी पाजण्यासाठी, उत्तरक्रिया करण्यासाठी पुत्राची गरज होती. परंतु आता आई वडिलाबरोबर यात्रा करण्यासाठी वीस दिवस घालवण्यास कोणत्या मुलाला वेळ आहे वेळ नाही. त्यांना दोष देण्यात अर्थ नाही परतु आता प्रवासी यात्रा कंपन्या आणि त्यांचे मॅनेजर हेच पुत्राचे ठिकाणी आहेत. त्यांचेमुळे या दुर्गम यात्रा पूर्ण करता येतात. यात्रा कंपन्या हे पुण्यकर्म करीत आहेत. त्यांना मी हार्दिक धन्यवाद देतो. त्यांनी हे कार्य असेच जोमाने चालवावे अशी मी प्रार्थना करतो.

९) यात्रेमध्ये लागलेल्या पाट्या मार्गदर्शक ठरतात त्या परिशिष्ट ७ मध्ये देत आहे

परिशिष्ठ १

## संयुक्त रोटेशन यातायात व्यवस्था समिती, चन्द्रभागा, ऋषिकेश – किराया तालिका

| धाम | अंतर कि.मी. | भाडे प्रत्येक यात्रे करूस | |
|---|---|---|---|
| १. ऋषिकेश ते हनुमानचट्टी | २२० | ७७ | हनुमानचट्टी ते यमुनोत्री पायी प्रवास १३ कि.मी. |
| २. हनुमानचट्टी ते गगोत्री | २३० | ८० | - |
| ३. गगोत्री ते गौरीकुण्ड | ३४२ | ११८ | पायी प्रवास १४ किमी गौरीकुण्ड - केदारनाथ |
| ४ गौरीकुण्ड ते बद्रीनाथ | २३३ | ८१ | - |
| ५ बद्रीनाथ ते ऋषिकेश | ३०१ | १०४ | - |
| ६. ऋषिकेश ते गगोत्री | २६२ | ८९ | - |
| ७. ऋषिकेश ते गौरीकुण्ड | २१६ | ७६ | - |
| ८ ऋषिकेश ते गोविंदघाट (हेमकुण्ड) | २७९ | ९४ | पायी प्रवास १९ कि.मी. गोविंदघाट ते फूलों की घाटी |

ज्याना स्वतत्रपणे जावयाचे असेल, काही ठिकाणी २/४ दिवस राहावयाचे असेल आणि निवास, भोजन, बिछाना ही व्यवस्था स्वत करणे शक्य असेल त्यानी याप्रमाणे प्रवास जरूर करावा परतु कनेक्टिंग बस मिळण्यास वेळ लागल्यास थाबण्याची तयारी ठेवावी तरुण माणसानी याप्रमाणे जरूर प्रवास करावा कमी खर्चामध्ये यात्रा होईल निसर्ग सौंदर्य मनमुरादपणे पाहता येईल.

परिशिष्ठ २

# चारी धाम यात्रा - वेळापत्रक/कार्यक्रम

**पुणे - दिल्ली - हरद्वार - मसुरी - यमुनोत्री - गंगोत्री - त्रियुगीनारायण - केदारनाथ - बदरीनाथ - ऋषिकेश - नीलकंठ - हरद्वार - दिल्ली - पुणे यात्रा**

| दिनांक (१९९३) | यात्रा सहल कार्यक्रम |
| --- | --- |
| १ मे | पुणे सोड ४६७७ डा. झेलम एक्सप्रेसने सायकाळी ५.४० वाजता |
| २ मे | नवी दिल्ली पोच रात्रौ ९ ०० वाजता व हरद्वार साठी प्रयाण |
| ३ मे | हरद्वार पोच पहाटे स्थलदर्शन व मुक्काम गगास्नान/ रात्री आरती |
| ४ मे | हरद्वार सोड मसुरी दर्शनोत्तर बडकोट साठी प्रयाण व मुक्काम |
| ५ मे | बडकोट सोड हनुमान चट्टी साठी प्रयाण व हनुमानचट्टी ते जानकीचट्टी (४ मैल पायी) व मुक्काम. |
| ६ मे | जानकीचट्टी सोड यमुनोत्री साठी प्रयाण (४ मैल पायी) यमुनोत्री दर्शनोत्तर हनुमानचट्टी साठी प्रयाण (८ मैल पायी प्रवास) हनुमानचट्टी पोच व बसने बडकोट साठी प्रयाण व मुक्काम पौर्णिमा |
| ७ मे | बडकोट सोड गंगोत्री साठी प्रयाण व मुक्काम भैरवघाटी येथे |
| ८ मे | गगोत्री दर्शन पूजनोत्तर उत्तरकाशी साठी प्रयाण व मुक्काम |
| ९ मे | उत्तरकाशी सोड गुप्तकाशी साठी प्रयाण व मुक्काम |
| १० मे | गुप्तकाशी सोड त्रियुगीनारायण दर्शनोत्तर रामपूर पोच व मुक्काम |
| ११ मे | रामपूर सोड गौरीकुड पोच (बसने) व गौरीकुड ते केदारनाथ (८ मैल पायी प्रवास) व मुक्काम |
| १२ मे | केदारनाथ दर्शन पुजनोत्तर गौरीकुंड साठी प्रयाण (८ मैल पायी प्रवास) गौरीकुड सोड बसने रामपूर मुक्काम |
| १३ मे | रामपूर सोड बद्रीनारायण साठी प्रयाण व मुक्काम |
| १४ मे | बद्रीनारायण दर्शन पूजन व मुक्काम |
| १५ मे | बद्रीनारायण सोड श्रीनगर (गढवाल) साठी प्रयाण व मुक्काम |
| १६ मे | श्रीनगर (गढवाल) सोड ऋषिकेश व नीलकठ महादेव दर्शन हरद्वार साठी प्रयाण व मुक्काम |

१७ मे हरद्वार दर्शन व हरद्वार सोड रात्रौ दिल्ली साठी प्रयाण/ पोच

१८ मे दिल्लीदर्शन बसचे तिकीट काढून काहींनी दिल्ली पाहिली. काही आग्रा पाहून आले. काहींनी स्वतंत्र टॅक्सी करून आग्रा -मथुरा पाहिले. खर्च ज्याचा त्यानेच करावयाचा

१९ मे दिल्ली (ह निजामुद्दीन) सोड २७०२ एक्सप्रेसने दुपारी १२.२५ वाजता

२०मे पुणे पोच २७०२ एक्सप्रेसने दुपारी ३.०० वाजता

वरील कार्यक्रम गुरुनाथ ट्रॅव्हेल्स ३, बुधवार पेठ, विश्रामबागवाड्या समोर, पुणे २ याचा आहे

## मुक्कामाच्या जागांचे पत्ते

रुडी टूरिस्ट हॉटेल
मु पोस्ट बडकोट
जि उत्तरकाशी
फोन. २४९, २२१

अरविंद आश्रम
मु. पोस्ट जानकी चट्टी
यमुनोत्री मार्ग,
जि उत्तरकाशी.

टूरिस्ट बगलो
गढवाल मडल विकास
निगम लि.
मु पो भैरवघाटी,
जि उत्तरकाशी

जोशी हॉटेल
पेट्रोल पपासमोर
मु पो. उत्तरकाशी

हॉटेल त्रिवेणी टूरिस्ट
लॉज,
मु पो गुप्तकाशी
जि चमोली गढवाल.

पजाब सिंध आवास
गृह
पोस्ट ऑफिसजवळ,
मु.पो. केदारनाथ, जि.
चमोली गढवाल

बालाश्रम
(परमार्थ धाम निकेतन)
मु पो. बद्रीनाथ धाम,
जि चमोली गढवाल
(उ प्र ).

अलकनदा टूरिस्ट बगलो,
गढवाल मडल विकास
निगम लि
मु.पो. श्रीनगर, जि.
चमोली गढवाल.

लिला यात्री भवन
निरजनी आखारा
बाग,
मु पो. हरिद्वार

श्री भगवान आश्रम
हरद्वार रोड,
ऋषिकेश.

सच्चिदानद आश्रम,
सन्यास मार्ग,
कणखल, हरिद्वार

परिशिष्ठ ३

## चावला ट्रॅव्हल्स

घाट रोड, ऋषिकेश- २४६२०१

☎ Office- 170, Resi- 670

(टैक्सी कार एव डीलक्स बसें उपलब्ध है)

### यात्रा कार्यक्रम विवरण

**१ - बदरीनाथ धाम यात्रा :**

प्रथम दिन - ऋषिकेश से जोशीमठ (रात्रि विश्राम)

दूसरा दिन - जोशीमठ से बद्रीनाथ धाम (रात्रि विश्राम)

तीसरा दिन - बद्रीनाथ से पीपल कोटि (रात्रि विश्राम)

चौथा दिन - पीपल कोटी से ऋषिकेश। यात्रा सपूर्ण

**२ - बद्री-केदार यात्रा :**

प्रथम दिन - ऋषिकेश से गौरी कुण्ड बस द्वारा (रात्रि विश्राम)

दूसरा दिन - गौरी कुण्ड से केदारनाथ (रात्रि वि ) (१३ कि पैदल यात्रा)

तीसरा दिन - केदारनाथ से गौरी कुण्ड (पैदल यात्रा) (रात्रि वि. रुद्रप्रयाग)

चौथा दिन - रुद्रप्रयाग से बद्रीनाथ (रात्रि विश्राम)

पाचवा दिन - बद्रीनाथ से पीपल कोटि (रात्रि विश्राम)

छटवा दिन - पीपल कोटि सें ऋषिकेश/यात्रा सम्पूर्ण

**३ - चारों धाम यात्रा :**

प्रथम दिन - बडकोट या हनुमानचट्टी

दूसरा दिन - (१) हनुमान चट्टी से यमुनोत्री दर्शन तथा वापसी (१३ कि मी पैदल यात्रा)

(२) यमुनोत्री से जानकी चट्टी (रात्रि विश्राम) (६ कि मी. पैदल यात्रा)

तीसरा दिन - (१) जानकी चट्टी से हनुमान चट्टी (८ कि.मी पैदल यात्रा).

(२) हनुमान चट्टी से उत्तरकाशी (रात्रि विश्राम).

चौथा दिन - उत्तरकाशी से गगोत्री (बस द्वारा) तथा वापसी उत्तरकाशी (रात्रि विश्राम)

पाचवा दिन - उत्तरकाशी से गौरी कुण्ड (रात्रि विश्राम)

छटवा दिन - गौरी कुण्ड से केदारनाथ (रात्रि वि.) (१३ कि. पैदल यात्रा)

सातवां दिन - (१) केदारनाथ से गौरी कुण्ड (१३ कि.मी. पैदल वापसी).
(२) रात्रि विश्राम रुद्रप्रयाग

आठवा दिन - रुद्रप्रयाग से बद्रीनाथ धाम दर्शन (रात्रि विश्राम)

नौवा दिन - बद्रीनाथ से वापसी (१ बजे दिन) रात्रि विश्राम पीपलकोटि।

दसवा दिन - पीपलकोटि से ऋषिकेश। यात्रा सपूर्ण।

## परिशिष्ठ ४

### गढवाल मंडळ विकास निगम, ऋषिकेश - यात्रा/ पॅकेजटूर्स

प्रवास १ — ऋषिकेश -केदारनाथ -बद्रीनाथ (बसने) सात दिवस रु १६०१. बालक १२५१. दररोज

प्रवास २ — दिल्ली -केदारनाथ -बद्रीनाथ (बसने) सात दिवस रु १८०१ बालक १४५१ (सोमवार सोडून दररोज)

प्रवास ३ — दिल्ली -केदारनाथ -बद्रीनाथ आठ दिवस डीलक्स १९ सीटवाली बस २८०१ बालक २५०१ दर सोमवारी

प्रवास ४ — ऋषिकेश -यमुनोत्री -गगोत्री -केदारनाथ - बद्रीनाथ (बसने) १२ दिवस २६०१ बालक २२५१. दररोज

प्रवास ५ — दिल्ली -यमुनोत्री -गगोत्री -गौमुख -केदारनाथ -बद्रीनाथ (बसने) १३ दिवस रु २८०१ बालक २४०१ (शुक्रवार सोडून दररोज)

प्रवास ६ — दिल्ली -यमुनोत्री -गगोत्री -केदारनाथ -बद्रीनाथ १९ सीटवाली बस १२ दिवस. रु ४१५१ बालक रु ३६५१ दर शुक्रवारी

| | |
|---|---|
| प्रवास ७ | ऋषिकेश -बद्रीनाथ (३ x २ कोचने) चार दिवस १००१ बालक ८५१. (दर मंगळवारी) |
| प्रवास ८ | ऋषिकेश -यमुनोत्री -गंगोत्री -गौमुख (३ x २ बसने). सात दिवस रु. १७५१ बालक १५०१. दर शुक्रवारी |
| प्रवास ९ | ऋषिकेश -केदारनाथ -बद्रीनाथ (टॅक्सीने). सहा दिवस रु २९०१. दररोज. |
| प्रवास १० | दिल्ली -केदारनाथ -बद्रीनाथ (टॅक्सीने) सात दिवस रु. ३३०१. दररोज. |
| प्रवास ११ | ऋषिकेश -यमुनोत्री -गंगोत्री -केदारनाथ -बद्रीनाथ (टॅक्सीने) दहा दिवस रु ४४५१ दररोज |
| प्रवास १२ | दिल्ली -डेहराडून -यमुनोत्री -गंगोत्री -केदार -बद्रीनाथ (टॅक्सीने) ११ दिवस रु ४७५१ दररोज. |
| प्रवास १३ | ऋषिकेश -बद्रीनाथ (टॅक्सीने) चार दिवस रु १७०१ रविवार, मंगळवार, शुक्रवारी. |
| प्रवास १४ | ऋषिकेश -व्हॅली ऑफ फ्लॉवर्स -हेमकुंड -बद्रीनाथ (बसने) सात दिवस रु १८०१ बालक १४५१. सोमवार, गुरुवार |

## नियम

पूर्ण रकमेचा डिमांड ड्राफ्ट Garhwal Mandal Vikas Ltd या नावाने काढावा तो Asstt General Manager (Tourism) Yatra Office Garhwal Mandal Vikas Ltd, MUNI-Ki-RETI (RISHIKESH) या पत्त्यावर पाठवावा म्हणजे आरक्षण होते बसमध्ये किमान २० सीटस आणि टॅक्सीमध्ये किमान चार यात्रेकरू आल्याशिवाय पॅकेज टूर्स सुरू करत नाहीत. आवश्यक तेवढे यात्री न मिळाल्यास पुढच्या टूरमध्ये व्यवस्था करतात अथवा रक्कम परत करतात प्रवासाचे आधी एक दिवस ऋषिकेशला जाणे रास्त होय. यात्रेकरूची राहण्याची व्यवस्था मुनी -की -रेती येथील कचेरीमध्ये वरील रकमेमध्ये करतात या रकमेमध्ये प्रवास, निवास, बेडिंग आणि स्नान व्यवस्था आणि मार्गदर्शक याचा समावेश होतो चहा, नाश्ता, जेवण, डोली, घोडे, भटजी, दक्षिणा व्यवस्था ज्याचे त्याने करावयाची

परिशिष्ठ ५

## चारी धाम यात्रेला आलेला खर्च
## (प्रमुख खर्च) (रुपयामध्ये)

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रवासखर्च | १७,५०४ = ०० |
| १ | यात्रा कपनी चार्जेस | ६२७२ प्रत्येकी |
| २ | डोली खर्च यमुनोत्री | १२०० + २०० प्रत्येकी |
| ३ | डोली खर्च केदारनाथ | ८८० + २०० प्रत्येकी |
| ब | पती-पत्नी मिळून खर्च | २५९० |
| ४ | श्री भटजी दक्षिणा व दान<br>हरिद्वार-(८०), यमुनोत्री-(६०),<br>गगोत्री-(११०), गुप्त काशी-(४५),<br>केदारनाथ-(१५०), उत्तर काशी-(१५),<br>बद्रीनाथ-(१५०), पिंडदान-(५०),<br>त्रियुगीनारायण-(३०), ऋषिकेश-(३०),<br>इतर स्थाने, नद्या, सगम | ६१५ |
| ५ | फोटो<br>मसुरी-(१५०), केदारनाथ-(२५), दोन<br>रोल (२००), ७२ फ्रेम्स, डेव्हलपमेंट<br>प्रिंटिंग (१५०) | ५२५ |
| ६ | इतर खर्च<br>औषधे (२००), बूट, मोजे, गरम कपडे,<br>बरसाती, कपाळपट्टी,<br>माकडटोपी (४५०), वाहनखर्च,<br>इनॉक्युलेशन, डॉक्टर तपासणी (१००),<br>खाण्याचे पदार्थ (१००), ग्रथ, नकाशे,<br>यात्रावर्णन पुस्तके (४००), एअर बॅग,<br>शबनम, पर्स (४००). | १४५० |
| क | खरेदी भेटवस्तू | १५०० |

टीप : दानधर्मासाठी एक, दोन, पाच रुपयाच्या १०० नोटा बरोबर घ्याव्यात.
सुटी नाणी पण बरोबर घ्यावीत.

परिशिष्ठ ६

## प्रवासात लागलेली औषधे

१. जुलाब व डिसेंट्री साठी

Tab Lomotil रोज २ x ४ दिवस

लोमोटिल, एटरो क्विनोल (Intamizol / Entero -quinol)

रोज ३ x ४ दिवस

२. उलटी, मळमळणे साठी

Tab Reglan 10 mg

रेग्लान रोज २ x ४ दिवस

३. कबरदुखीसाठी

Tab PARIBU = BRUFAMOL

पारिबू रोज २ x ३ दिवस

४ आम्लपित्त, ॲसिडिटीसाठी

Tab Ranitidine 150 mg

रानिटिडिन रोज २ x ४ दिवस

५. झोप न आल्यास

Tab Calmpose 5 mg

काम्पोज रोज १

६. पडसे आल्यास

Tab Celestamine 2 mg

सेलेस्टामाइन रोज १

७. चक्कर येत असल्यास

Tab Stemetil 3 mg

स्टिमेटिल रोज ३

८. पोटात कळ येत असल्यास

Tab Cyclopam

सायक्लोपाम रोज २

९. ग्लुकोज, इलेक्ट्राल, अमृताजन, व्हिक्स

परिशिष्ठ ७

## प्रवासात दिसलेल्या पाट्या

(जीवन यात्रा करताना मार्गदर्शक ठरतात )

आपकी यात्रा मंगलमय हो।
आपकी यात्रा सफल हो।
यात्रा सफल एवम् सुखद हो।

देवभूमि गढवाल मे आपका स्वागत है।
देवभूमीमे आपका स्वागत।
Welcome you to valley of Gods

वन ही जीवन है।
वन ही आत्मा है।
राष्ट्रीय सपत्ती की रक्षा करे।
एक पेड दस पुत्र समान।
प्रकृतीका आनद लीजिये।
देखिये हिमश्रृंग।

चढाईपर रुक रुक कर चले।
मोडों पर सतर्कता रखिये।
आराम से चले।
मोडोंपर सावधानीसे चले।

पत्थर गिरने का भय है।
मार्ग तग है, खतरा है।
कष्ट के लिए खेद है।

खाली पेट यात्रा न करे।
यात्रा मे हलका तथा सुपाच्य भोजन ले।


उत्तराखंड यात्रा
गोमुख
गंगोत्री
भैरवघाटी
हरसील
सुखी
गंगनानी
भटवाड़ी
उत्तरकाशी
धरासू
टिहरी
यमुनोत्री
जानकी चट्टी
हनुमान चट्टी
बड़कोट
नौगाँव
यमुना ब्रिज
केम्प्टी फॉल
मसूरी
देहरादून
ऋषिकेश
देवप्रयाग
श्रीनगर
रुद्रप्रयाग
तिलवाड़ा
केदारनाथ
रामबाड़ा
गौरीकुंड
सोम प्रयाग
सीतापुर
गुप्तकाशी
बद्रीनाथ
हनुमान चट्टी
गोविंद घाट
विष्णु प्रयाग
जोशीमठ
पिपलकोठी
नंदप्रयाग
कर्णप्रयाग
Valley of Flowers.
जिम कॉर्बेट
नैशनल पार्क..

धीरे चलने मे सफर की सफलता है।
धीरे चलने मे भी सफर का आनद है।

सावधानीसे चलाने मे ही चालक की कुशलता है।
दुर्घटना से देर भली।
नजर हटी दुर्घटना घटी।

सावधान, खतरनाक मोड
सावधान, पूल कमजोर है।
धीरे चलो।
आगे मोड है, धीरे चलिये।

लापरवाही इन्सान का शत्रु है।

Life is short, Don't make it Shorter

Be gentle on curves

मधुर वचन और व्यवहार सज्जनता है।

शिक्षार्थ आइये सेवार्थ जाईये।

सीमा सडक सघटन राष्ट्र की सेवामे।

सुपथगामिनी - एका बसचे नाव

परिशिष्ठ ८

## निवडक यात्रा कंपन्यांचे पत्ते

१) गुरुनाथ ट्रॅव्हल्स, ३ बुधवार पेठ, विश्रामबागवाड्या समोर, विठ्ठल मंदिर, पुणे ४११००२. तार: गुरु ट्रॅव्हल. फोन: ४५१८७०. सोमवारी सुट्टी. वेळ ९॥ ते १२॥, ५॥-८॥.

२) दत्त-दिगंबर यात्रा कंपनी, श्रीदत्त निवास, गोखले हॉल समोर, लक्ष्मी रस्ता, पुणे ४११०३०. तार. प्रवासी, पुणे. फोन. ४५४३९०.

३) जयश्री ट्रॅव्हल्स, ५४ बुधवार पेठ, गणपती चौक, काकाकुवा मॅन्शन, पुणे ४११००२. फोन ४५३८२५. सोमवारी सुट्टी सकाळी ९ ते रात्री ८.३० स्थापना: १९६८

४) सौ बेलसरे याची श्री ट्रॅव्हल सर्व्हिसेस, १८० कसबा, नवग्रह शनी मंदिराजवळ, पुणे ४११०११. फोन. ४३०२१८.

५) दीपक पुजारी याची विहार ट्रॅव्हल्स, ७०४ नारायण, पुजारी भवन, कॉमनवेल्थ इमारतीसमोर, लक्ष्मी रोड, पुणे ४११०३०. फोन ४५३२६२

## काही वाचनीय ग्रंथ

(१) Esctatic flight into Himalayas- Char Dham Yatra by GR Venkatraman. Bharatiya Vidya Bhavan, Bombay 1988 Rs.60/-

(२) हिमालयाच्या कुशीत -स्वामी अखडानद, तिसरी आवृत्ती रामकृष्ण मठ, नागपूर. रु. १०/-

(३) हिमाईच्या कुशीत -प्र के घाणेकर. स्नेहल प्रकाशन पुणे १९९३ रु १००/-

(४) रणधीर बुक सेल्स प्रकाशन, हरद्वार यानी प्रसिद्ध केलेली पुस्तके हरिद्वार, ऋषिकेश येथे विकत मिळतात. त्याची नावे, गगाकी कथाए और प्राचीन इतिहास रु. ३/- हरिद्वार, कनखल, ऋषिकेश, रु.४/- भारतदर्शन- चारों धाम सप्तपुरीयात्रा और महात्म्य रु २०/- जय बदरी विशाल रु १०/- गगा की महिमा रु १०/-. प्रजापति दक्ष की कथा कनखलका इतिहास रु ४/-
Call of Uttarakhand- Badrinath, Kedarnath, Gangotri, Yamnotri, Hemkunt and Flower Valley Rs 20/-

(५) पडित महादेवशास्त्री जोशी, रमेश मत्री, दाते याची पुस्तके

(६) मराठी विश्वकोश, भारतीय सस्कृती कोश यामधील नोंदी

(७)The Garhwal Himalayas· Ramparts of heaven. Photographs Ashok Dilwali Text Pushpesh Pant. Foreword Sir Edmund Hillary Lustre Press, New Delhi, 1987 Rs 360/-

भू-प्रवास
क्रं. ४६९
२०५६५

REFBK-0027477